आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ ऑक्टोबर २०११ | वर्ष २८ | अंक १४

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०

## 'पीक बहिष्कारा'चे नवे आंदोलन!!

आंध्रातील 'कोनसीमा रयतु परिरक्षण समिती'च्या आंदोलनाचा
धनंजय कुलकर्णी यांनी घेतलेला आढावा.

आंध्र प्रदेशातील पूर्व-पश्चिम गोदावरी जिल्ह्यांतील दोन लाख एकर
शेतजमिनीवर यंदा तांदळाची लागवडच होणार नाही.



# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १४ । २१ ऑक्टोबर २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


मुद्दा
**'पीक बहिष्काराचे' नवे आंदोलन**
धनंजय कुलकर्णी ........ ३

आजकाल
**शेतीचे कोलमडते अर्थकारण आणि बहुराष्ट्रीय कंपन्या**
ज्ञानेश्वर शेलार ........ ६

दिशा
**अजूनही वेळ गेली नाही**
मा. रवी देवांग ........ ८

आठवण
**गेला मोहन कुणीकडे!**
मा. रवी देवांग ........ १०

कॉमन नॉन सेन्स
**दारिद्र्य रेषेची दरिद्री चर्चा**
सुधाकर जाधव ........ १२

स्वातंत्र्य
**स्वच्छ समृद्ध जीवन- पूर्वार्ध**
विनय हर्डीकर ........ १५

ललित
**सिंदखेडच्या ओव्यांमधील जिजाऊ**
श्रीकांत देशमुख ........ २१

मिरचीचे खळे
**सौ सौ चुहे खाय के!**
बाबू सोंगाड्या ........ २६

अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर ........ २८

**शेतकरी संघटना वृत्त** ........ ३२

संपादकीय * श्रीकांत उमरीकर

# शेतात वीज, सरकारला नीज

विजेच्या टंचाईने महाराष्ट्रच नाही तर अख्खा देश हैराण झाला आहे. ही टंचाई खरी असो कृत्रिम असो, नियोजनाची असो, की अजून कशाची असो... टंचाई आहे हे मात्र खरं! वेगवेगळी कारणे, या टंचाईसाठी दिली जातात. आपण ती सारी खरी मानूत. प्रश्न असा उभा राहतो, ही टंचाई दूर करण्यासाठी काय करायचं? भरपूर प्रमाणात झालेल्या पावसामुळे, सध्या सर्वत्र शेतात मोठ्या प्रमाणात पीक उभे आहे. ऊर्जेचं हे जे हिरवं रूप मोठ्या प्रमाणात शेतात उभं आहे त्याच्याबद्दल काहीही विचार करण्यास सरकार तयार नाही. महाराष्ट्रापुरतं बोलायचं झाल्यास. उसाचे उत्पादन प्रचंड प्रमाणात होण्याची शक्यता आहे. आतापासूनच या उसाच्या भावाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. शेतकऱ्यांनी केलेली मागणी पुरवणं कदापीही शक्य नाही. हे कारखानदारांना पक्कं माहीत आहे. खरं तर उसापासून साखर न काढता, इथेनॉल काढून त्यापासून ऊर्जेचे पर्यायी स्रोत किती निर्माण होतात हे पाहणे जास्त गरजेचे आहे. पेट्रोलचे दर प्रचंड वाढलेले आहेत. मग, पेट्रोलमध्ये तुलनेने स्वस्त आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेले इथेनॉल मिसळण्यास परवानगी का नाही? सध्या फक्त इथेनॉल (५%) मिसळण्यास परवानगी आहे; ही मर्यादा वाढवली का जात नाही. नेमकी कुठली आडकाठी यामध्ये आहे. पाण्यासाठी जे पंप चालवले जातात. ज्या मोटारींचा उपयोग होतो, यासाठी डिझेलचा वापर होतो. मग आतापर्यंत असे संशोधन की ज्याद्वारे या मोटारी इथेनॉलवर चालतील का पुढे येऊ दिले गेले नाही. यावर का संशोधन होत नाही किंवा करू दिले जात नाही. ज्या पद्धतीने छोट्या मोठ्या गोष्टींसाठी शहरी भागात प्रचंड प्रोत्साहन देऊन मदत केली जाते. याच्या नेमकं उलट ग्रामीण भागात या सगळ्या गोष्टी का मारल्या जातात. आज तर परिस्थिती अशी आहे, पिकांच्या रूपाने शेतामध्ये हिरवी वीज उभी आहे आणि इकडे प्रचंड वीजटंचाईला तोंड द्यावे लागते आहे. साखरेचा भाव घसरलेला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेला किंमत नाही. साखर तयार झाली तरी, तिला किंमत मिळण्याची शक्यता आज तरी नाही. मग कशाच्या आधारावर उसाला भाव मिळू शकतो. दुसरीकडून ऊसतोड कामगारांसाठी नेते आंदोलन करीत आहेत. ऊसतोड कामगारांचे प्रश्न जर सोडवायचे असतील, तर त्यासाठी परत उसाच्या भावाशी येऊन थांबावं लागतं. ऊसतोडणीसाठी यंत्रांचा उपयोग करून घ्यावा, असं आता सगळ्यांनाच वाटत चाललं आहे. ऊसतोडणी ही अतिशय जिकीरीची बाब आहे. ऊसतोडणी करणारा मजूरही हे काम नाखुशीनेच स्वीकारतो. आपले घरदार सोडून चिल्ल्यापिल्ल्यांना पाठीशी घेऊन ऊसतोडणीसाठी भटकत राहणे हे कोणालाच नको आहे. त्यामुळे जर ऊसतोडणीची यंत्रं आली, तर ती सगळ्यांनाच हवी आहेत. बरं ज्याला ऊसतोड कामगार म्हणतात, तो तरी कोण आहे? तर तो अल्प भूधारक शेतकरीच आहे. जमिनीचे तुकडे होत आकार छोटा झाला. जमीन कसणं परवडेनासं झालं. सिंचनाची कुठलीही सोय आजही महाराष्ट्राच्या सत्तर टक्के शेतजमिनीला उपलब्ध नाही. मग हे सगळे शेतकरी शेतमजूर बनतात आणि त्यातलाच एक वर्ग ऊसतोड कामगार म्हणून गणल्या जातो. स्वाभाविकच हा प्रश्न अप्रत्यक्षरीत्या परत शेतीचाच होऊन बसतो. मग शेतीचा प्रश्न न सोडवता ऊसतोड कामगाराचा प्रश्न सुटणार कसा? आज सगळ्यात पहिल्यांदा गरज आहे - महाराष्ट्राच्या छातीवरती बसलेल्या सहकार नावाच्या राक्षसाला उठवून लावायची! दसऱ्याच्या मुहूर्तावर ज्या रावणाचा पुतळा जाळल्या जातो, तसं आता शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या आणि त्यांच्या नावाखाली शासनाची प्रचंड सबसिडी लुटणाऱ्या सहकाररूपी रावणाचे शिल्लक अवशेषही जाळून टाकण्याची नितांत गरज आहे. जेव्हा शेतीतून शासन आणि पर्यायाने सहकार पूर्णपणे हद्दपार होईल तेव्हाच, मोठ्या प्रमाणावर शेतीत भांडवल येईल. शेती ही फक्त अन्नधान्याची न राहता, इतरही गोष्टींसाठी म्हणून सिद्ध होईल. विजेसाठी शेती ही वेगळी कल्पनाही राबवल्या जाईल. ज्याच्यातून खऱ्या अर्थाने शेतीचा म्हणजेच पर्यायाने ग्रामीण भागाचा आणि एकूणच महाराष्ट्राचा समप्रमाणात आणि समतोलपणे विकास साधल्या जाईल! ज्या शहरांना प्रचंड प्रमाणात वीज लागते, त्यांतील कवडीचाही भाग त्या शहरात तयार होत नाही आणि याच शहरांना अतिशय कमी प्रमाणात विजेच्या टंचाईला तोंड द्यावे लागते. याच्या नेमके उलट ज्या ठिकाणी ऊर्जेची निर्मिती होऊ शकते. त्या सगळ्या ग्रामीण भागाला ऊर्जा निर्माण करण्याचं पाप म्हणून अंधाराला तोंड द्यावं लागतं. ऊर्जेच्या बाबतीत जर खेडी स्वयंपूर्ण होऊ शकली, तर फार वेगळे चित्र स्पष्ट होईल. आज एक मोठा भ्रम असा पसरविला जातो आहे, की सगळे शेतकरी फुकट वीज वापरतात, त्यांच्या वीज पंपांना मीटर नाही. आकडे टाकणे हा खेड्यातल्या लोकांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. शेतकरी आणि सगळाच ग्रामीण भाग म्हणजे सरकारचे जावई आहेत. असं शहरातल्या लोकांना वाटते. हा भ्रम दूर करण्यासाठीही ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण खेड्यांचा निर्णय योग्य ठरेल. जर शेतीतील हिरव्या ऊर्जेचे रूपांतर विद्युत ऊर्जेमध्ये करून त्याचा वापर शेतकरी करू लागला किंवा त्याला करू दिल्या गेलं तर ती एक फार मोठी क्रांती ठरेल. आज शेतकऱ्याला त्याच्या जवळील संसाधनांचा वापर पुरेसा करू दिल्या जात नाही. त्याच्या मार्गात येणारे अडथळे हे प्रचंड आहेत. इतकंच नाही, तर आज देखील शेतकऱ्याला सूडबुद्धीने वागवले जाते. शेतकऱ्यांचे पुत्र म्हणवून घेणारे दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिलेले, सध्या केंद्रात मंत्री असलेले विलासराव देशमुख आपल्या लातूरच्या कृषि उत्पन्न बाजारसमितीमधील हमाल, अडते आणि व्यापाऱ्यांच्या दादागिरीला अजूनही रोखू शकलेले नाहीत. आमच्या माहितीप्रमाणे, विलासराव देशमुखांचे वडील दगडुजीराव देशमुख हे आडते किंवा व्यापारी नसून शेतकरीच होते. बाभूळगावला त्यांची आडत नसून शेतीच होती. कदाचित ही माहिती विलासराव देशमुखांनाच सांगायची गरज आहे. हा प्रश्न फक्त लातूरचाच नसून अख्ख्या महाराष्ट्राचीच हीच परिस्थिती आहे. ज्याच्यावरती अन्याय आपण करत आहोत त्याच्याच हातात आपल्या समस्यांची गुरूकिल्ली आहे हे कदाचित इतर नागरिकांना कळत नसावे.



# 'पीक बहिष्काराचे' नवे आंदोलन

आंध्रातील 'कोनसीमा रयतु परिरक्षण समिती'च्या आंदोलनाची खबरबात!!

**[ देशाचं तांदळ कोठार मानलेल्या आंध्र प्रदेशातील काही भागांतील शेतकऱ्यांनी शेतमालास मिळणाऱ्या सुमार मूल्याच्या निषेधाचा आगळाच मार्ग निवडलाय. आंध्रातील काही प्रांतांपुरतं मर्यादित 'पीक बहिष्काराचं' लोण उद्या देशात इतरत्र पसरल्यास मोठाच अनर्थ ओढवेल. ]**

देशाचं तांदळ कोठार मानलेल्या आंध्र प्रदेशातील काही भागांतील शेतकऱ्यांनी शेतमालास मिळणाऱ्या सुमार मूल्याच्या निषेधाचा आगळाच मार्ग निवडलाय. त्यांनी खरीप हंगामात तांदळ लागवडीलाच सुटी दिलीय! शेती उत्पादनातला खर्च आणि उत्पन्न यातील तफावतीच्या विरोधात राज्याच्या पूर्व गोदावरी जिल्ह्यातील हतबल शेतकरी यंदा तांदळाचं पीकच घेणार नाहीत! आंध्रच्या लहान व मध्यम शेतकऱ्यांनी अवलंबिलेली 'क्रॉप हॉलिडे'सारखी कल्पना नजीकच्या भविष्यात राष्ट्रीय कृषि संकटाची चाहूल ठरू शकते.

शेतमालाच्या किमान आधारभूत मूल्याच्या मागणीवरून देशभरातील शेतकऱ्यांमार्फत आंदोलन-मोर्च्यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन होते; पण राज्याच्या जलसमृद्ध पूर्व गोदावरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोसमी पीक लागवडीसच सामूहीक नकार द्यावा, यावरून प्रश्नाच्या तीव्रतेची कल्पना यावी. 'कोनसीमा रयतू परिरक्षण समिती' या चळवळीचं नेतृत्व करतेय. या जिल्ह्यातील एका छोट्या शेतकरी मेळाव्यात 'पीक सत्याग्रहा'ची कल्पना पुढं आली. शेजारच्या पश्चिम गोदावरी प्रांतांतील शेतकऱ्यांनीही ती उचलून धरली. त्यामुळं पूर्व-पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील दोन लाख एकर शेत जमिनीवर यंदा तांदळाची लागवडच होणार नाही. आता तेलंगण-रायलसीमा भागांतील काही शेतकरीही आंदोलनात सामील झाले आहेत. जमीन कसणारा बळिराजाच कर्जात बुडून संपतोय, या भावनेतून आंध्र शेतकऱ्यांनी ही टोकाची भूमिका घेतलीय. कर्जबाजारी होण्यापेक्षा हमाली अधिक सोपी असल्याची शेतकऱ्यांची भाषा त्यांची अगतिकताच प्रकट करते. राज्यातील ८४ टक्के शेतकरी कुटुंबांभोवती कर्जाचा विळखा आहे, हे यासंदर्भात लक्षात ठेवायला हवे.



आंध्र शेतकऱ्यांच्या या निर्णयाचे निश्चित परिणाम लवकरच स्पष्ट होतील; पण त्याचा तत्काळ फटका राज्यातील काही हजार शेतमजुरांना बसून किमान तीन लाख टन तांदूळ उत्पादनावर राज्याला यंदा पाणी सोडावे लागेल. आंध्रतील तांदूळ लागवडीखालील क्षेत्रात गतवर्षी १८ टक्के घट झाली होतीच.

'पीक सत्याग्रह'सारखा गंभीर प्रश्न एका रात्रीतून तयार झालेला नाही. शेती उत्पादन-विक्री प्रक्रियेबाबत शासकीय-प्रशासकीय-राजकीय स्तरावरील दीर्घकालीन उदासीन धोरणांचा तो परिपाक होय. किंबहुना, तांदूळ लागवडीस 'सुट्टी' देत निषेध नोंदविणाऱ्या आंध्र किसानांच्या समस्या इतर राज्यांतील शेतकऱ्यांपेक्षा निराळ्या नाहीत.



शेतीवरील वाढता खर्च, शेतमालाचे अत्यल्प विक्री दर व सावकारी पाश हे प्रश्न भारतीय कृषिव्यवस्थेचे केंद्रबिंदू होत. आंध्रतील ज्या प्रांतांतील दोन लाख एकर शेतजमीन तांदूळ लागवडीविना सध्या रिकामी आहे, तो भाग जलसंपन्न आहे; पण तिथंही बी-बियाणे-खतांच्या वाढत्या किमती, आकाशाला भिडलेले शेतमजुरीचे दर आणि सावकार व लघुवित्त संस्थांनी मांडलेला उच्छाद, या प्रातिनिधिक समस्या आहेतच. जोडीला आसमानी संकटाचे दणके. त्यामुळं एकरी १० ते १५ हजार रुपयांचं नुकसान सोसावं लागतं, असा राज्यातील तांदूळ उत्पादकांचा दावा आहे.

गेल्या वर्षी एक क्विंटल भात पिकावर १३०० रुपयांचा खर्च आला आणि हाती आलेलं उत्पन्न होतं ९०० रुपये! आंध्र व इतरत्रही शेती हा असा आतबट्ट्याचा व्यवहार ठरतोय. तांदळासाठी मिळणारं किमान आधारभूत मूल्य हा या प्रक्रियेतला मुख्य घटक. आज ७५ किलोच्या तांदळाच्या पोत्याचा राज्यातील आधारभूत भाव आहे रु. १११०! त्याऐवजी स्वामिनाथन समितीनं निर्धारित केलेला दर (रु. २०४२) लागू व्हावा, ही राज्यातील शेतकऱ्यांची मागणी आहे. पतपुरवठा हे या प्रश्नाचं दुसरं अंग. एकूण उत्पादन खर्चातील कर्जापोटी मिळणाऱ्या रकमेचं प्रमाण ३० टक्केच असतं. त्यामुळं खर्च मिळवणीसाठी सावकार वा लघुवित्त संस्थांना जवळ केल्या शिवाय शेतकऱ्यांना पर्याय नसतो. शिवाय, शेतमजुरांची सार्वत्रिक वानवा आहेच. केंद्राच्या राष्ट्रीय ग्रामीण सुरक्षा सेवा योजनेमुळे शेतमजूर मिळणं कठीण होतंय. धान्याच्या अतिरिक्त उत्पादनामुळं कृषिव्यवस्थेवर ताण निर्माण होतोय. यंदा मार्चपर्यंतच्या १२ महिन्यांच्या काळात आंध्रमध्ये १४.३ दशलक्ष टन तांदळाचं उत्पादन झालं. गेल्या वर्षापेक्षा ते १/३ पटीनं अधिक आहे! राज्यातील सगळ्या तांदळाची खरेदी शासकीय संस्थांकडून होत नाही. त्यामुळं आंध्र तांदूळ उत्पादकांना मालाच्या उठावासाठी राइस मिलर्सवर अवलंबून राहावं लागतं. मिलर्सकडून शासन निर्धारित किमान आधारभूत मूल्य तांदूळ उत्पादकांना मिळत नाही. परिणामी, शेतीपेक्षा हमाली परवडली, अशी राज्यातील शेतकऱ्यांची मनोवृत्ती बनलीय.

तांदूळ लागवडीस नकार देणाऱ्या आंध्रतील शेतकऱ्यांच्या निर्धाराची म्हणूनच गांभीर्याने दखल घ्यायला हवी. केंद्र शासनाचं एक विशेष प्रतिनिधी मंडळ गोदावरी जिल्ह्याचा दौरा करून गेलं. या प्रश्नाच्या अभ्यासासाठी राज्य सरकारनं निवृत्त मुख्य सचिव मोहन कांडा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीनं तातडीनं सादर केलेला अहवाल राज्य शासनाने नुकताच स्वीकारलाय. त्यात स्वामिनाथन आयोगानं तांदळासाठी निर्धारित केलेलं किमान आधारभूत मूल्य देण्याची शिफारस आहे. पीकपद्धतीत बदल, सरकारी संस्थांकडून तांदूळ साठ्यांची खरेदी, आधारभूत मूल्य न देणाऱ्या मिलर्सवर कारवाई, अशा सूचनाही अहवालात आहेत. त्यांची अंमलबजावणी कशी व केव्हा होणार, हा प्रश्न आहेच; पण कांडा समितीच्या शिफारसींनंतरही खरीप हंगामात तांदूळ लागवडीस सोडचिठ्ठी देण्याच्या निर्णयावर शेतकरी ठाम आहेत. तांदळानंतर ऊस शेतीवरील खर्च-उत्पन्नातील तफावतीमुळे उसाचं पीक न घेण्याचा निर्णय राज्यातील एका संघटनेने नुकताच जाहीर केलाय. सध्या राज्यातील काही प्रांतांपुरतं मर्यादित 'पीक बहिष्काराचं' लोण देशात इतरत्र पसरल्यास मोठाच अनर्थ ओढवणार.

आंध्र प्रदेशातील पीक बहिष्काराने केंद्र व राज्य शासन; कृषि तज्ज्ञ आणि कृषि अर्थ संस्था यांच्यापुढे गंभीर आव्हान उभे केलेलं आहे. त्याच बरोबर, सध्या आंध्रातील काही प्रांतांपुरतेच मर्यादित





असलेलं हे संकट इतरत्र पसरण्यापूर्वीच त्याचा बंदोबस्त होणं आवश्यक आहे. त्या दृष्टीने या प्रश्नाची व्याप्ती आणि समग्रतेच भान ठेवणं आवश्यक होय. राज्यातील ही समस्या एकूणच केंद्र व राज्य शासनांच्या कृषिविषयक सदोष धोरणांचा परिपाक आहे. किंबहुना, आपल्या कृषिविषयक धोरणांच्या अपयशाचं ते ठळक, प्रातीनिधिक उदाहरण ठरावं.

आज भारतीय कृषि संशोधन संस्था किंवा राष्ट्रीय स्तरांवरील अनेक नामवंत कृषि तज्ज्ञ आंध्रातील पीक बहिष्काराबद्दल जाहीर चिंता व्यक्त करीत आहेत. ते अर्थातच योग्य आहेच; पण साताठ महिन्यांपूर्वी राज्याच्या किनारी भागांतील शेतकऱ्यांकडून या बहिष्कार योजनेचे सुतोवाच झाले तेव्हा राज्य वा केंद्रातील जबाबदार संस्था वा व्यक्तींना या प्रश्नाचे स्वरूप जाणून त्यावर तत्काळ उपाय योजण्याएव्हढी उसंत होतीच कुठं!

तरीही, एक गोष्ट वादातीत आहे. राज्य व केंद्र शासनांतील कृषिविषयक धोरणांत सुसूत्रता आणल्याविना हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. उदाः सरकार वा सरकारी संस्थांकडून धान्य वसुलीची हमी आणि योग्य आधारभूत मूल्यांची निश्चिती, हा इलाज या बाबत तज्ज्ञांमार्फत सुचविला जातोय. धान्य वसूली आणि आधारभूत मूल्यांची हमी हे दोन विषय अनुक्रमे राज्य व केंद्राच्या अखत्यारीत येतात. आधारभूत मूल्य निश्चिती केंद्रीय धोरणाचा भाग होय. तर धान्य वसुलीबाबत प्रत्येक राज्याचे स्वतंत्र धोरण आहे. पंजाब व छत्तीसगडसारख्या राज्यांत एफ.सी.आय. आणि शासकीय संस्थांकडून तांदळाची थेट खरेदी होते. आंध्रमधील तांदळ उत्पादकांना राईस मिलर्सच्या लहरींवर विसंबून राहावे लागते. धान्य वसुलीबाबत म्हणूनच विविध राज्यांत एकवाक्यता हवी.

धान्य वसुलीशीच निगडीत आहे तो गोदामांच्या कमतरतेचा प्रश्न. धान्य साठ्यांच्या अपुऱ्या व्यवस्थेचा प्रभाव धान्य वसुलीवर होतो आणि त्याचा अंतिमतः फटका शेतकऱ्यांना बसतो. म्हणून मग अधिक संख्येने गोदामनिर्मिती आवश्यक आहे. तशी शिफारसही आंध्रच्या कांडा समितीने आपल्या अहवालात केलीय. अधिक गोदाम उभारणीसाठी केंद्र-राज्यांत सुसूत्रता हवी. सांगायचा मुद्दा एव्हढाच की आंध्रातील पीक बहिष्काराच्या प्रश्नाचा सर्वांगीण अभ्यास संबंधितांकडून व्हावा.

**राज्य व केंद्र शासनांतील कृषिविषयक धोरणांत सुसूत्रता आणल्याविना हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. उदाः सरकार वा सरकारी संस्थांकडून धान्य वसुलीची हमी आणि योग्य आधारभूत मूल्यांची निश्चिती, हा इलाज या बाबत तज्ज्ञांमार्फत सुचविला जातोय. धान्य वसूली आणि आधारभूत मूल्यांची हमी हे दोन विषय अनुक्रमे राज्य व केंद्राच्या अखत्यारीत येतात. आधारभूत मूल्य निश्चिती केंद्रीय धोरणाचा भाग होय.**

राज्यातील पीक बहिष्काराचा प्रश्न आता राजकीय पक्षांनाही सोयीचा वाटू लागला आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष राजनाथसिंग यांनी किनारी भागांचा दौरा केला आणि पीक बहिष्कार आंदोलकांच्या भेटी घेतल्या. चंद्राबाबू नायडूंनी हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर लावून धरण्याची आश्वासने दिली आहेत. डाव्या पक्षांचे राष्ट्रीय नेतेही येऊन गेले. जगनमोहन रेड्डीही पीक बहिष्काराचे भांडवल करण्याच्या प्रयत्नांत आहेत.

मात्र, भारतीय कृषिव्यवस्थेला ग्रासलेल्या एका मूलभूत व व्यापक समस्येचं स्वरूप आंध्रमधील घटनांवरून उघड झालंय. तिचं वेळीच निराकरण गरजेचं आहे. छोट्या-मध्यम शेतकऱ्यांसाठी शेती किफायतशीर राहिलेली नाही. तशी ती व्हावी या दिशेनं दूरगामी धोरणे राष्ट्रीय स्तरावर राबविण्याची इच्छाशक्ती सत्ताधाऱ्यांनी दाखवायला हवी.

(दै. महाराष्ट्र टाईम्स दि. १२ ऑक्टो. २०११ च्या अंकात 'राष्ट्रीय संकटाची चाहूल?' या नावाने प्रकाशित झालेल्या लेखाचा हा विस्तारित भाग. या लेखातील सर्व छायाचित्रे लेखकाने हैदराबाद येथून पाठविली आहेत.)

**धनंजय कुलकर्णी**
हैदराबाद.
dhananjaykulkarni5@gmail.com

■■

# शेतीचे कोलमडते अर्थकारण आणि बहुराष्ट्रीय कंपन्या

**कापूस घरात कुजणे, अन्नधान्य, सरकारी गोदामे, रेल्वेस्टेशन इथे सडणे, पावसात भिजणे, हजारो टन साखरेचे पावसाने पाणी होणे असे नुकसान सर्रास चालू आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हस्तक्षेपामुळे हे सर्व थांबू शकेल; पण न जाणो कुणी स्वदेशीवाला देशभक्त तुमचा मालच बहुराष्ट्रीय कंपन्या पळवून नेतील, त्यामुळे त्यांच्या नादी लागू नका, असे शेतकऱ्यांना सांगेल आणि सगळ्यांवर पाणी फेरील.**

ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली आणि ब्रिटीशांना हिंदूस्तानचे शोषण करण्यासाठी एक व्यवस्था या कंपनीमुळे तयार झाली. तेव्हापासून कंपनी म्हटले, की भारतीयांच्या मनात धडकी भरते. सध्या परदेशी कंपन्याच भारतात कारभार करतात असे नव्हे, तर भारतीय कंपन्याही परदेशात अगदी इंग्लंड, अमेरिकेतसुद्धा कारभार करीत आहेत. काही कंपन्यांची तर युरोप आणि अमेरिकेच्या शेअरबाजारात नोंद झाली आहे. तरीही ३०० -३५० वर्षांपूर्वीची इस्ट इंडिया कंपनी आणि शोषण ही भीती भारतीयांच्या मनातून गेलेली नाही. आपले मर्द मराठे जेव्हा सह्याद्रीच्या कडेकपारीत तलवारीने आणि बिछव्याने लढत होते, तेव्हा इस्ट इंडिया कंपनीने आपला कारभार जवळजवळ संपूर्ण हिंदुस्तानभर पसरविलेला होता. त्यामुळेही कदाचित आपण पुन्हा एकदा पारतंत्र्यात जाऊ की काय? अशी भीती भारतीयांच्या मनात आजही कायम आहे.

१९९१ नंतर जागतिकीकरणाला सुरुवात झाल्यानंतर स्वदेशीवाल्यांनी त्यात- प्रवीण तोगडीया, स्वदेशी मंच, भाजप आदींनी स्वदेशीचा फार मोठा प्रचार केला. राम मंदिराच्या उभारणीबरोबरच स्वदेशीही भाजपच्या अजेंड्यावर होती; पण सत्तेत आल्यानंतर मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत काँग्रेसने सुरू केलेल्या खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणात आम्ही तसूभरही बदल करणार नाही, असे अटल बिहारींनी जाहीर केले. आपली स्वदेशी ही अशी कचखाऊ आहे. आपण एकाच वेळी आधुनिक काळात आणि अडीचशे-तीनशे वर्षांपूर्वीच्या इतिहासात जगत असतो. आपल्या तोंडात स्वदेशीचा जयघोष असला तरी त्या जयघोषासाठी वापरली जाणारी सर्व साधने अत्याधुनिक आणि परदेशी असतात,

शेतीच्या बाबतीत विचार करायचा झाला, तर दोन-तीन क्षेत्रांमध्येच जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शिरकाव झालेला आहे. बियाण्यांच्या कंपन्यांमध्ये कंपन्या भारतीय असल्या तरी तंत्रज्ञान मात्र परदेशी आहे. बियाणे केवळ हायब्रीड करायची होती त्यावेळी देशी तंत्रज्ञानही चालून गेले. कारण ती प्रक्रिया फारशी किचकट नव्हती. आता मात्र जैव तंत्रज्ञानाचा उपयोग उगवण क्षमता, वाढणे कीड नियंत्रण, अधिक उत्पादन यांसाठी करण्यात येत आहे. हे संशोधन कोण्या एका शेतकऱ्याला आपलेच मागील वर्षीचे बियाणे थोडेसे बरे निवडून पुढच्या वर्षी वापरावे अशी परिस्थिती नाही. जैव तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर वैज्ञानिक सुविधा, तंत्रज्ञान, कुशल मुनष्यबळ, भांडवल यांची गरज असते. हे फक्त कंपन्यांनाच शक्य होते. तेही एका कंपनीला शक्य नाही म्हणून भारतीय कंपन्यांना भांडवल, मनुष्यबळ स्वतःचे, तर तंत्रज्ञान परदेशी असा मार्ग अवलंबवावा लागतो. त्यालाच आपण बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणतो. एकाच वेळी, अनेक देशांमध्ये कारभार करणाऱ्या कंपन्यांना बहुराष्ट्रीय कंपन्या असे म्हटले जाते.



ज्ञानेश्वर शेलार

देशामध्ये येणारे तंत्रज्ञान हे युरोपीय देशांतून येण्यासाठी किमान २० वर्षे लागतात, असे आपण म्हणतो. तिकडे वापरण्यात येणाऱ्या मोटारींचे संगणकाचे, विमानांचे मॉडेल्स २० वर्षांनंतर आपल्याकडे येतात. शेतीच्या बाबतीत तर हे अंतर ४० ते ५० वर्षांचे आहे. कॅनडा, अमेरिका, रशिया, इस्त्रायल या देशांत कापूस वेचणीसाठी यंत्रांचा वापर ५० वर्षांपूर्वीपासून करतात. आपल्याकडे ते अद्यापही आलेले नाही. उतारवयाला लागलेल्या लोकांना त्यांच्या भूगोलाच्या पुस्तकात रशियात आणि अमेरिकेत यंत्राने कापूस वेचणी केली जाते याची चित्रे त्यांनी लहानपणी बघितल्याचे आठवत असेल. अद्याप असे यंत्र भारतात आलेले नाहीत. पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखान्यांनी मजूर मिळत नाहीत म्हणून ऊसतोडणी यंत्रे आणली आहेत. त्यालाही एका बाजूला मजूर मिळत नाहीत, शेतकरी आपला ऊस स्वतः पूर्णपणे तोडून कारखान्याला घालून शकत नाही, अशा परिस्थितीतही विरोध चालू आहे. गव्हाचे खळे ही बाब गेल्या चार-पाच वर्षांत दिसेनाशी झाली आहे. बैलांनी खळे लावणे, मळणी करणे, वाहतूक करणे, त्यानंतर वाऱ्यावर रास उफणणे हे तर आठवेनासे झाले आहे. त्यात बदल करून वाऱ्यावर विसंबून राहण्याऐवजी सर्वप्रथम उपणेर हे अतियश प्राथमिक स्वरूपाचे यंत्र लोक कित्येक वर्ष वापरत होते. नंतर त्यात बदल होऊन एकाच जागी मशिनवर चालणारे थ्रेशर सुरू झाले. आता कोठे सर्व कामे करणारे हार्वेस्टर शेतात फिरू लागले. शेतकऱ्यांचे कितीतरी कष्ट कमी झाले. अजूनही काही सुधारणांना विरोध

करणारे पूर्वीच्या खळ्याचे गोडवे गाताना दिसतात. पूर्वीसारखे आता खळे नाहीत, बैल-बारदाना नाही. महिना- महिना खळ्यावर चालणारा माणसांचा राबता नाही, याचे त्यांना मोठे वैषम्य वाटते. केवळ एक यंत्र आल्यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टांमध्ये मोठा फरक पडला आहे.

अशाच पद्धतीने नवीन तंत्रज्ञान शेतीमध्ये आले तर शेतकऱ्याच्या कष्टामध्ये, उत्पादनात आणि वाया जाणाऱ्या शेतमालामध्ये मोठा फरक पडणार आहे. सर्वच शेतकऱ्यांची सध्यातरी त्यांचे भले करतो म्हणणाऱ्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्या शेतीत उतरल्या तर हळूहळू तुमच्या शेतीची मालकीच त्या काढून घेतील, अशा प्रकारची दिशाभूल चालवली आहे. शेतीमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेतीची मालकी शेतकऱ्यांकडेच ठेवून काम करण्यास मोठा वाव आहे. अन्नप्रक्रिया उद्योगात बहुराष्ट्रीय कंपन्या उतरल्या तर, शेतीमालाचा नासाडी होऊन आणि शेतकऱ्यांना केवळ आपला कच्चा माल विक्रीसाठी नेणे यावर उपाययोजना होऊ शकते. उद्योगाचा अर्थच असा आहे की, नाशवंत कच्च्या मालाचे अधिक उपयुक्त आणि टिकाऊ पक्क्या मालात रूपांतर करणे. छोट्या छोट्या तुकड्यांत विखुरलेल्या आणि कुटुंबात चालणाऱ्या शेतकऱ्यांना घाऊक प्रक्रिया उद्योग उभारणे शक्य नाही.

यासाठी केलेला सहकाराचा प्रयोग किती फसवा होता आणि त्यात पुढाऱ्यांचेच कसे उखळ पांढरे झाले हे आपण साखर उद्योग आणि सुतगिरण्यांच्या उदाहरणांवरून बघतोच आहोत. शेतकऱ्यांच्याच खिशातील पैसे काढून त्यावर डल्ला मारणाऱ्या पुढाऱ्यांपेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रक्रिया उद्योगात उडी घेतली तर, शेतकऱ्यांना शेतीमालाला भाव मिळण्यासाठी निश्चितपणे फायदा होणार आहे. एवढेच नव्हे, मॉलसारख्या मोठ्या दुकानांतून शेतकऱ्यांना आपला माल निश्चित भावाला आणि कायमस्वरूपी पुरवण्याची संधी मिळाली, तरी त्यांचे भले होणार आहे, असा प्रयत्न रिलायन्स फ्रेश या नावाने भाज्या, फळे आणि इतर प्रक्रिया केलेली शेती उत्पादने यासाठी मोठ्या शहरांतून रिलायन्स कंपनी दोन वर्षांपूर्वी केला होता. उत्तरप्रदेशमध्ये मायावतींनी-रिलायन्सला आम्ही उत्तर प्रदेशात पायसुद्धा ठेवू देणार नाही, अशी धमकी देऊन बाहेर हाकलले. महाराष्ट्रातही काही जातीयवादी पक्ष, पर्यावरणवादी आणि समाजवादी मंडळींनी अशी दुकाने काढण्यास विरोध केला. शेतकऱ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्वतःला जोडून घेण्याची मोठी संधी त्यामुळे हुकली.

सध्या देशात अन्नधान्य, कापूस आणि साखरेचे मुबलक उत्पादन झालेले आहे. शेतकरी स्वतःच्या घरात कापूस साठवून ठेवतात, अन्नधान्य साठवून ठेवतात. साखर कारखाने आपल्या गोदामांमध्ये किंवा मोकळ्या मैदानात प्लॅस्टिकच्या तावदानात साखर झाकून पावसाळ्यात संरक्षण करीत आहेत. हाच माल मोठ्या प्रमाणावर शास्त्रीय पद्धतीने साठवायचा असेल, तर बहुराष्ट्रीय कंपन्या पुढाकार घेऊ शकतात. शेतकऱ्यांनी साठवलेल्या मालावर त्यांना तात्काळ कर्जही मिळू शकते. ज्या कंपन्यांचे अशा मालाचे, आयात-निर्यातीचे किंवा प्रक्रियेचे उद्योग आहेत. त्यांना वेळेत आणि भरवशाने माल मिळवणे आणि आपल्या ग्राहकांच्या विश्वासाला पात्र राहणे शक्य होईल. जागोजाग विखुरलेला शेतमाल असल्यामुळे कुठे किती माल आहे आणि कोण घेणार? कुठे साठवायचा? विकणार कोण? याची कोणतीही साखळी तयार झालेली नाही. कापूस घरात कुजणे, अन्नधान्य, सरकारी गोदामे, रेल्वेस्टेशन इथे सडणे, पावसात भिजणे, हजारो टन साखरेचे पावसाने पाणी होणे असे नुकसान सर्रास चालू आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हस्तक्षेपामुळे हे सर्व थांबू शकेल; पण न जाणो कुणी स्वदेशीवाला देशभक्त तुमचा मालच बहुराष्ट्रीय कंपन्या पळवून नेतील, त्यामुळे त्यांच्या नादी लागू नका, असे शेतकऱ्यांना सांगेल आणि सगळ्यांवर पाणी फेरील.

शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा, असे सर्वांचेच म्हणणे आहे. उद्योगामध्ये येणारे मोठे भांडवल, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ हे शेताच्या बांधावरही पोहोचलेले नाही, तरीही आज सर्वकाही जे घडते आहे, ते जागतिकीकरणामुळे आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या शिरकावामुळे घडते आहे, अशी ओरड केली जाते. यातील कुठलीच गोष्ट शेतीपर्यंत आलेली नाही. जी आली आहे ती शेतीतील आदानांमध्ये आलेली आहे. बियाणे, खते, ट्रॅक्टर्स, हार्वेस्टर्स यांसारखी यंत्रे ही फक्त देशी किंवा विदेशी कंपन्यांकडून शेतात येतात. शेतातून बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे किंवा त्यांच्यामार्फत देशात किंवा विदेशात काय विकले जाते, असा प्रश्न उपस्थित केला तर उत्तर शून्य येईल. मग कुठे आहेत बहुराष्ट्रीय कंपन्या. उद्योगामध्ये मोठे उद्योग सर्व काही स्वतः तयार करत नाहीत. त्यांच्या उद्योगांसाठी आवश्यक छोटेछोटे सुटे भाग छोट्या उत्पादकांकडून आपल्याला आवश्यकतेनुसार व गुणवत्तेचे तयार करून घेतात. हीच पद्धत शेतीचे औद्योगिकीकरण करायचे तर, शेतीसाठीही वापरता येईल. ज्या कोण्या कंपन्यांना भाज्या, फळे, प्रक्रिया केलेला शेतीमाल, अन्नधान्य, इत्यादी देशात किंवा परदेशांत विक्री करायचा आहे, ते छोट्या शेतकऱ्याकडूनही बनवून घेऊ शकतात; पण शेतीत हे होऊ द्यायचे नाही अशी सर्वांनीच खुणगाठ बांधलेली आहे. सरकार तर शेतीत काही नवीन तंत्रज्ञान येणार असे दिसताच दोन-तीन हजार वर्षांपूर्वीच्या शेतीत वापरले जाणारे जैविक शेती, गांडूळ शेती वगैरे प्रकार हे किती चांगले आहेत, याचा प्रचार करण्यासाठी सर्व शेती खात्यातील यंत्रणा आणि सरकारी पैसा वापरून गावोगाव शिबीरे, सभा, मेळावे घेऊन प्रचार केला जातो. रासायनिक खतांचा वापर धोकादायक आहे, असे शेतकऱ्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी शेणखताचा वापर, गोमुत्राच वापर, पालापाचोळ्याचा वापर, गांडुळ खत तयार करणे, याचा सरकार प्रचार करीत आहे. रासायनिक खतांचा वापर करणे हे चूक नाही. अतिरिक्त वापर होत असेल, तरच जमिनींचा पोत बिघडणे, जमिनी खारवट होणे, नापीक होणे अशा समस्या उपस्थित होऊ शकतात. आजकाल प्रत्येक पिकाला त्याच्या वाढीनुसार एवढेच नव्हे तर प्रत्येक झाडाला किती खत द्यायचे, हेसुद्धा ठरवता येणे आणि त्या प्रकारे ते देणे शक्य आहे. तरीही प्रचारमात्र उलटा चालू आहे.

सर्व शेतकरी बाजारांतूनच बियाणे विकत घेतात. तरीसुद्धा गावरान बियाणे आणि पिके किती सकस होते असा प्रचार केला जातो. काही पर्यावरणवाद्यांनी तर शेतकऱ्यांचे बियाण्यांचे हक्क हिरावले जातील यासाठी त्यांनी बाजारातून बियाणे विकत घेऊ नये म्हणून बियाण्यांच्या बँका तयार करण्याचा सपाटा लावला आहे. गावरान ते उत्तम असा प्रचार करीत असतानाच कोणतीही फळे, भाज्या मात्र गावरान मिळत नाहीत. तोंडात मात्र सतत गावरान गावरान असा मंत्रोच्चार चालू असतो. बीटी कॉटन भारतात येणार त्यावेळी तो म्हणजे पर्यावरणाचा विनाशच अशी ओरड करण्यात आली. आज शेतकरीच स्वतः रांगा लावून बीटी बियाण्यांची मागणी करीत आहेत. कोठे गेले ते पर्यावरणवादी आणि

**पान क्र. ९ पाहा**

# अजूनही वेळ गेली नाही

## आपण रोखू शकतो शेतकऱ्यांच्या आत्महत्या!!

**[ ही गोष्ट खरी आहे, की संघटनांमध्ये भाऊबंदकी आहे. काही भाऊ झाले गेले विसरून परत एकत्र येऊ शकतात. काहींची इच्छा नाही, त्यांनी ती लपवूनही ठेवली नाही; पण सगळ्यांचा बाप अजून जिवंत आहे. मेल्यावर वाटेहिश्शाचं बघू. वाटणीचं बघू किंवा इच्छापत्रांचा मान ठेवू. आजच घर फोडणाऱ्यांना शेतकरी क्षमा करणार नाहीत हे नक्की. किमान समान कार्यक्रमांवर आधारित एकत्रितपणे आंदोलने लढविली जाऊ शकतात. ]**

संघटना शेतकऱ्यांच्या की नेत्यांच्या? या शीर्षकाखाली संतोष डुकरे यांनी श्री. शरद जोशी यांच्याविषयी विधान केले आहे की, शरद जोशी यांनी कार्यकर्ते घडविले मात्र त्यांच्या क्षमतांना वाव देण्यात ते अपयशी ठरले. शरद जोशींनी बाजूला केलेल्या कार्यकर्त्यांच्या जंत्रीत विजय जावंदिया, शंकर धोंडगे, रघुनाथ पाटील यांची नावे आहेत. या सगळ्यांनी चळवळीसाठी मोठे योगदान दिले आहे यात शंका नाही. या जंत्रीत आणखी काही नावांचा समावेश करायला हरकत नव्हती. श्री. अनिल गोटे, माधवराव खंडेराव मोरे, चंद्रकांत वानखेडे, लक्ष्मण वडले, नरेंद्र अहिरे, सदाभाऊ खोत इत्यादी.

वरील पैकी अनेक जण शेतकरी संघटनेचे अध्यक्ष होते. ज्या अर्थी ते अध्यक्ष होते त्या अर्थी शरद जोशींनी त्यांच्या क्षमतांना वाव दिला होता व जवळपास सर्वांनीच आपापल्या कर्तृत्वाला शिखरावर नेऊन ठेवले हा इतिहास आहे. यातील कुणाला जाहीररीत्या बाजूला केल्याचा अपवाद फक्त रघुनाथदादा पाटील यांच्या बाबती घडला आहे. इतरांच्या बाबतीत त्या त्या वेळची परिस्थिती कारणीभूत ठरली असावी. यात दोष एकट्या शरद जोशींचा नाही. कार्यकारण भावाचाही विचार मोठा आवश्यक आहे.

शेतकरी संघटना सोडल्यानंतर श्री. अनिल गोटे आमदार (धुळे शहर), शंकर अण्णा धोंडगे (आमदार), पाशा पटेल (आमदार, बीजेपी विधान परिषद), राजू शेट्टी (खासदार) या खंद्या व झुंजार कार्यकर्त्यांनी राजकीय यश मिळवले. संघटनेच्या सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात मात्र राजकारण गेलं चुलीत चळवळ मोठी झाली पाहिजे. हाच घोषा आजही कायम आहे. संघटनेच्या मांडवाखालून जी मंडळी गेली, वेगळी झाली त्यांच्याविषयी संघटनेला कृतज्ञता व आदर वाटते. राजकीय महत्त्वाकांक्षा असणं हा दोष नाही. यातली बरीच मंडळी संघटनेत राहिली असती तर कदाचित राजकीयदृष्ट्या यशस्वी झालीही नसती. चळवळीचा अजेंडा शेतकऱ्यांचे बाजारपेठेचे स्वातंत्र्य हा आहे. एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीला आमदार/खासदार करणं हा नव्हे. त्यामुळे अनेकांच्या राजकीय स्वप्नांचा चुराडा झाला. ही वस्तुस्थिती आहे. अशी मंडळी नाराज असणं स्वाभाविक आहे. श्री. माधवराव नाना, श्री. भास्करराव बोरावके, रामचंद्र बापू पाटील, श्री. श्रीरंग नाना, जयपाल अण्णा फराटे, तुकाराम निरगुडे, सरोजताई काशीकर, वामनराव चटप, शैलाताई देशपांडे, गोविंद जोशी, अनंत उमरीकर, यांच्या कर्तृत्वाला वाव तर मिळालाच आणि ही मोठ्या मनाची माणसं संघटनेतही राहिली. सगळ्यांकडून ही अपेक्षा ठेवता येणार नाही.

कोल्हापूर, सांगली, सोलापूर ऊस उत्पादक पट्ट्यात राजू शेट्टींनी झुंजारपणे शेतकरी धुमसत ठेवला. शरद जोशींनी एनडीएशी जुळवल्यामुळे राजू नाराज झाला असे म्हणतात. अटलबिहारी वाजपेयींसारख्या उदारमतवादी नेत्याकडे पाहून व शेतकऱ्यांना उणे नव्हे तर अधिक सबसिडी त्याकाळी मिळण्याच्या शक्यतेमुळे संघटनेने एनडीएशी जवळीक केली. एनडीएने ती दिलीही. आज राजू शेटी, सदाभाऊ खोत, पाशा पटेल, गोपीनाथ मुंडे यांचे छुपे संबंध लपून राहिलेले नाहीत. शरद जोशी या व्यक्तिचा स्वभाव याहीपेक्षा त्यांनी दिलेला स्वतंत्रतावादी विचार इतिहासात व भविष्यात याच विचारांची कदर होणार आहे. मी तर स्वतः या व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वोच्च गरिमा प्राप्त करून देणाऱ्या विचारावर फिदा आहे. वेळोवेळी असलेला कार्यकारणभाव तसेच संशयकल्लोळ, कार्यकर्त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा या सगळ्यांचे खापर शरद जोशींवर फोडणे अन्यायकारक आहे.

गेल्या वर्षभरात शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावर सोडून गेलेल्या कार्यकर्त्यांत उणीदुणी काढलेली नाही. याचा अध्यक्ष म्हणून मी साक्षीदार आहे. पिंपळगाव बसवंत येथे कांदा आंदोलनात श्री. राजू शेट्टी, पाशा पटेल, सदाभाऊ खोत हे आंदोलनात होते. मीही होतो. शरद जोशींना नेते मानणारे ९९% कार्यकर्ते आंदोलनात होते. ॲग्रोवनने जाणीवपूर्वक श्रेय स्वाभीमानीला दिले. यालाच कुरघोडी म्हणतात. अटकते चारशे होते. त्यात स्वाभिमानीचा बिल्ला लावलेले चार लोकही नव्हते. तरी याचे भांडवल आम्ही केले नाही. शेवटी शरद जोशींच्या शेतकरी



रवी देवांग

संघटनेला बिग ब्रदरची भूमिका बजावायची आहे आणि ती आमची क्षमता आहे.

कांद्यावर निर्यातबंदी लादल्यावर पिंपळगाव बसवंतला चक्क राज्य कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीत 'सर्वपक्षीय' आंदोलन झाले. इच्छा नसताना संघटनेचे कार्यकर्ते त्यात सामील झाले. अपशकून नको म्हणून! पदरात काय मिळालं? ४७५ डॉलरचे किमान निर्यात शुल्क! निर्यात अशक्य...

समीर भुजबळ, शिरीष कोतवाल, राधाकृष्ण विखे पाटील हे 'झुंजार आंदोलक' मूग गिळून बसले! आता कुठं आहेत ही मंडळी?

कोरडवाहू शेतकऱ्यांना संघटनेने वाऱ्यावर सोडले हा आरोप म्हणजे प्रस्तुत लेखकाचा अभ्यासाचा अभाव दर्शवितो. परभणीची ज्वारी परिषद हा एखाद्याला अभ्यासाचा विषय ठरावा. धुळे जिल्ह्यातले दूध आंदोलन आणि अलीकडे पुण्यात संघटनेने कृषी आयुक्तालयावर काढलेल्या मोर्च्यातील 'मक्यापासून इथेनॉल निर्मिती करू द्या' हा लक्षवेधी फलक कसा कुणाच्या लक्षात आला नाही? जरा थोडी ज्वारीपासून, 'दोन-चार पेग' दारू बनविली तर सोलापूरला ३५ रु. किलो ज्वारी विकली गेली. कोरडवाहू शेतकरी संघटीत करणं ही गोष्ट सोपी नाही; पण संघटनेने जिद्द सोडली नाही. जिज्ञासूंनी अजित नरदेंचं 'स्वतंत्र ज्वारीस्तान' लेख जरूर वाचावा. (संदर्भ पाक्षिक शेतकरी संघटक)

शेतकरी संघटनांतील अधिवेशनातील ठरावांचा अभ्यास पत्रकारांनी नीट डोळसपणे करावा. भूसंपादनाविषयी संघटना सोडल्यास कुणाही शेतकरी नेत्याची अभ्यासपूर्ण मांडणी नाही.

धुळ्यात संघटनेच्या कार्यकर्त्यांनी १४ एप्रिल २०११ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतिदिनी शेतकऱ्यांना मालमत्तेचा मूलभूत अधिकार नाकारणारे घटनेतील परिशिष्ट (९) जाळून टाकले. ही घटना महत्त्वपूर्ण असूनही मीडियाने त्याची दखल घेतली नाही. मीडियाचे आपले काही हितसंबंध असतात; पण म्हणून संघटनेने समाजिक कायदेशीर बाबी मात्र वाऱ्यावर सोडल्या हा आरोप मात्र बिनबुडाचा ठरतो. संघटनेने प्रकाश आंबेडकरांना नांदेड लोकसभा मतदार संघातून लढविले, गावठाण व राजवाडा एकत्र आणण्याचा प्रयत्न केला हे कशाचे द्योतक आहे? जनशक्ती वाचक चळवळीने संघटनेचे 'विचार दर्शन' किमान २० ग्रंथांत उपलब्ध करून ठेवले आहे. ते बारकाईने अभ्यासल्याशिवाय संघटनेवर लेखणी चालवणे हे 'बुमरँग' ठरू शकते. ही गोष्ट खरी आहे, की संघटनांमध्ये भाऊबंदकी आहे. काही भाऊ झाले गेले विसरून परत एकत्र येऊ शकतात. काहींची इच्छा नाही, त्यांनी ती लपवूनही ठेवली नाही; पण सगळ्यांचा बाप अजून जिवंत आहे. मेल्यावर वाटेहिश्शाचं बघू. वाटणीचं बघू किंवा इच्छापत्रांचा मान ठेवू. आजच घर फोडणाऱ्यांना शेतकरी क्षमा करणार नाहीत हे नक्की. किमान समान कार्यक्रमांवर आधारित एकत्रितपणे आंदोलने लढविली जाऊ शकतात. सत्ताधाऱ्यांचे हेतू शेतकरी कल्याणाचे अजिबात नाही. ते फोडा आणि झोडा नीती अवलंबिणारच! पंडित नेहरूंनी बाबासाहेब आंबेडकरांपेक्षा बाबू जगजीवन राम यांची रेषा मोठी काढण्याचा प्रयत्न केला. आम्ही सकारात्मक आहोत. याल तर तुमच्यासह... न याल तर तुमच्याशिवाय... उभे ठाकले तर आडवे करून बळिराज्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. बळिराज्य म्हणजे सरकारी नियंत्रण मुक्त शेती व्यवस्था, तूर्त इतकेच.


**रवी देवांग**

अध्यक्ष, शेतकरी संघटना. मो. ९४२२२९६३५८

ravi.metta@rediffmail.com



**कांद्यावर निर्यातबंदी लादल्यावर पिंपळगाव बसवंतला चक्क राज्य कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीत 'सर्वपक्षीय' आंदोलन झाले. इच्छा नसताना संघटनेचे कार्यकर्ते त्यात सामील झाले. अपशकून नको म्हणून! पदरात काय मिळालं? ४७५ डॉलरचे किमान निर्यात शुल्क! निर्यात अशक्य... समीर भुजबळ, शिरीष कोतवाल, राधाकृष्ण विखे पाटील हे 'झुंजार आंदोलक' मूग गिळून बसले! आता कुठं आहेत ही मंडळी?**


■■


**पान ७ वरून पुढे**


बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध करणारे. सध्या बीटी वांग्याला विरोध केला जात आहे. तीन वर्षांपासून बीटी वांग्यांना परवानगी मिळावी यासाठी प्रयत्न चालू आहेत, ते अजूनही मिळत नाही. ते अडवून ठेवण्यासाठी आता बीटी वांग्यांत काही आयुर्वेदीक घटक सापडतात का? याचे संशोधन चालू आहे. काही दिवसांनी नक्कीच बातमी येईल, की बीटी वांगे म्हणजे आयुर्वेदिकच! परंतु त्यावेळी या वांग्यांना भारतीय शेतात येण्यासाठी किमान पाच ते सात वर्षे उशीर झालेला असेल.

शिक्षण, उद्योग, बँकींग, दूरसंचार या सर्व क्षेत्रांत जागतिकीकरण अवरतले आहे. आता त्याला विरोध करणारेही थंडावले आहेत. एवढेच नव्हे तर ते यावे यासाठी त्या त्या क्षेत्रातील मंडळी मोठी धावपळ करीत आहेत. विरोध आहे तो फक्त शेतीत येणाऱ्या जागतिकीकरणाला अर्थात जागतिकीकरण येणार ते बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमांतूनच आणि बहुराष्ट्रीय कंपन्या तर तुमची शेती गिळंकृत करायलाच बसले आहेत, शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्यासाठीच त्या येणार आहेत, असा प्रचार करून २० वर्षांपासून बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेताच्या बांधावर येऊ दिलेले नाही.

शेतकरी आत्महत्या करीत आहेत, त्यालाही जबाबदार जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्याच आहेत, असा शोधही काही देशी अर्थतज्ज्ञांनी लावला आहे. अजून बहुराष्ट्रीय कंपन्या शेतात उतरलेल्याच नाहीत, तर त्याचा एवढा जहाल परिणाम झालेला त्यांना दिसून येत आहे. प्रत्येक वेळी शेतीमध्ये काही नवीन येत असेल, तर त्याला विरोध करायचा आणि नाहीच जमले तर उशीर तरी करायचा, हेच आजची शेतीची कोलमडती अवस्था ही बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे आलेली आहे असे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.


**ज्ञानेश्वर शेलार**

मो. ९२२६७९७०१८


■■

# गेला मोहन कुणीकडे!!

स्थळ -धुळे शहर, राणा प्रताप चौक, स्वस्तिक टॉकीज चौकही म्हणतात त्याला. दिवस स्वातंत्र्योत्तर मंतरलेले. भारलेले. कुमार केतकरांच्या भाषेत अस्वस्थ दशकानंतरचे दशक शेतकरी संघटनेच्या झंजावाताचं दशक. त्याचा पूर्वार्ध अनिल गोटे नावाच्या वादळानं धुळे जिल्ह्यात मांडलेल्या तुफानी आंदोलनी प्रचाराचा उच्छाद... तशात संघटनेचा नाशिक जिल्ह्यातील ढाण्या वाघ, गौरवर्णाचा, गरुड नाकाचा, करड्या नजरेचा, अंगात ओपन शर्ट, जीन पँट, छातीवर दिमाखदार लाल बिल्ला तळपणारा नरेंद्र बापू. शरद जोशींचा सल्ला डावलून कोपरगावच्या ना. स. फरादे विरुद्ध 'पदवीधर'साठी उभा ठाकलेला. आज बापूच्या प्रचाराचा नारळ फुटणार होता. प्रमुख वक्ते होते शेकापचे स्थानिक नेते प्राचार्य मा. य. वैद्य. सभा रंगात आली होती, कुणीतरी कुजबुजलं... मोहन आला, मोहन आला. तो दूरवर उभा ठाकलेला. म्युनसिपाल्टीसमोरील पानटपरीजवळील रेलिंगवर रेललेला होता. खादीचा झब्बा, ढगळ लांब इतका, की विजार जेमतेम एकदीड फूट दिसावी. रंग सावळा, चेहरा रापलेला, उन्हातान्हात, वैशाखवणव्यात काळी आई तळावी तसा. तब्येत बऱ्यापैकी गुटगुटीत. दाढी घोटलेली. सिगारेट, शबनममध्ये खूप कोंबलेली अवजड प्रचारपत्रके. मध्येच कुठेतरी आकाशात अनंताकडे लावलेली नजर, धूम्रवलयं बेफिकिरीची साखर टाकावी आणि कुठून कुठून मुंग्या धावत याव्या जणू चुंबकाकडे लोह आकर्षित व्हावे तसे कार्यकर्त्यांचे मोहोळ त्याच्याभोवती जमले तो शुद्ध मराठीत बोलत होता. आम्ही एकमेकांशी बोललो नाही. मी किंचित कार्यकर्ता. फुलटायमर कार्यकर्ता कसा असावा याचं मूर्तीमंत दर्शन मोहन गुंजाळ या नावाच्या व्यक्तिमत्त्वात मला होत होतं. माझ्या मनात आलं, इयत्ता तिसरी (अ)पासून मी सेवादलातल्या शाखेवरचा सैनिक. धुळ्याचा बाबा देशपांडे, पुढे तो येवल्याला देना बँकेत जाईपर्यंतचा मित्र. मोहनसुद्धा सेवादलाचा. मग माझ्या भविष्यकालीन मैत्रीच्या जीवाशिवाची गाठ व्हायला एवढा उशिर का व्हावा? आपल्याला दिसतो तो हाच का मोहन ज्याला सेवादलात मानाचं पान मिळावं म्हणून निळूभाऊ फुले, एसेम गोरे यांच्याशी भांडायला तयार झाले. सेवादलातील ब्राह्मणशाहीचा फटका या बहुजनाला फार तरुणपणीच बसला तर...

त्या दिवशी एम.वाय. सरांच भाषण खूपच रंगलं; पण लक्षात राहिला तो मोहनच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव. तर मी सांगत होतो, की तो कार्यकर्त्यांच्या कोंडाळ्यात बोलत होता. आंदोलनाची धग त्याच्या रोमारोमात भिनली होती. त्याची बॉडी लँग्वेज- देहबोली सांगत होती तो हाडाचा कार्यकर्ता आहे; पण त्याची बोलीभाषा सांगत होती त्याचं वाचन प्रगल्भ असावं. बरोबर आलेल्या कार्यकर्त्यांबरोबर मात्र तो लफ्फेदार हेल काढीत अस्सल गावरान दखनी भाषेत बोलत होता. 'तद्नंतर' किंवा 'त्यानंतर' याला समानार्थी शब्द 'मग' आहे; पण 'मग'च्या एवेजी तो 'मंग' अनुस्वारासहित म्हणायचा. त्याचं गावराणीपण कधी त्यानं लपवून ठेवलं नाही. आत तसं बाहेर- पारदर्शी. अशा या जिवापाड कार्यकर्त्याचं साक्षात दर्शन पावून मी मनाशी खूणगाठ बांधली, यांचं आपलं जमू शकते हे नक्की, ही त्याची माझी पहिली नजर भेट...

तसं त्यापूर्वीही तो कानावरून गेला होता. ऐकला होता. आणीबाणी पूर्व काळ होता. स्थळ खोलगल्ली. सभांचे फड जिथं डॉ. लोहिया व गंगेच्या आघोसारखं झरझरत भाषण बॅ. नाथ पैंनी जिंकले तो राममंदिर चौक व त्या मागची बोळ. लाल टोपीधारी साथी राम मोरे यांची ओसरी टेलरिंग फर्म. दुनियाभरच्या समाजवाद्यांचा अड्डा. दिवसभर चहा चालायचा. जिथं एक गोरापान किडकिडीत, काळ्याकुट्ट दाढीचा, पाहिल्याबरोबर फिडेल कॅस्ट्रो किंवा कमीत कमी विचारवंत तरी वाटावा असा कुमार शिराळकर दे दणादण दे दणादण ओसंडून वाहत होता. त्याच्या तोंडत एक दोनदा नाम्या, लतीफ ही नावं आली. नाम्या म्हणजे गोलपीठाकार 'या सत्तेत जीव रमत नाही'वाला नामदेव ढसाळ तर... आणि लतीफ म्हणजे चक्क फोरास रोडवरील हिजड्यांचा मोर्चा संघटीत करणारा लतीफ खाटीक होता; पण त्याच्याही बोलण्यात मोहन, मोहन सारखं यायचं. ते दिवस भारलेलेच होते. 'साधना', 'माणूस', ग.वा. बेहेरचं 'सोबत' यायचा अवकाश- अधाशी माणसानं अन्नावर तुटून पडावं तसे आम्ही ते वाचून फस्त करायचो. ग्यानबाचे अर्थशास्त्र किंवा संघटक अजून यायचा होता. सगळेच तरुण कुठेही का असेना एकंदरीत डावेच होते. नरहर कुरुंदकरसर समोर बसून स्वातंत्र्य या मूल्याचे धडे देत होते. दुसऱ्या बाजूला बंदचा बेबंद बादशहा जॉर्ज आकर्षण होता. तशात जेपींनी छात्र युवा संघर्षामार्फत तरुणांना साद घातली.

साहजिकच मोहन शहादे तालुक्यातील प्रकाशाला आदिवासींच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवयाला गेला. एसेम आण्णांना आदिवासींच्या जमिनी त्यांना न्यायलयीन लढाईच्या मदतीकरता रानोमाळ पायी भटकणाऱ्या युवकांची तलाश होती. त्यांच्या आवाहनाला हात वर करून प्रतिसाद देणारा अख्ख्या महाराष्ट्रातून एकमेव मोहनच होता आणि मग त्याची सातपुड्यातील भटकंती सुरू झाली. रात्री-अपरात्री खळग्यातून ट्रकने प्रवास सुरू झाला आणि भविष्यातल्या मानेच्या आणि कमरेच्या वेदनामय स्पाँडिलिसीसची मुहूर्तमेढ रचली गेली.

शरद जोशी इकडे चाकणच्या कांदा आंदोलनातून, निफाडच्या ऊस आंदोलनांतून शेतकरी आणि शेतीमालाच्या शोषणातून भांडवलाची निर्मिती होते म्हणून शेतकरी संघटीत करीत होते. मोहनला कसं राहवलं असेल. धुळे जिल्ह्यातील शेतकरी पदयात्रा दिंडीत शरद जोशींचं स्वागत करायला पाच हजार आदिवासी स्त्री-पुरुष मिरवणुकीने सामोरे जात मोहनने या दोन शरदांची गाठभेट घालून दिली. ज्यांनी हे पाहिले ते धन्य झाले. एकंदरीत धुळ्याच्या अधिवेशनाचं विलोभनीय दृश्य हा प्रसिद्धी पराङ्मुख मोहनचा चमत्कार होता तर...

संघटनेचा अंगार माझ्या सारख्याला झेपणारा नव्हता. मी बांधावरचा शेतकरी. शाखेवर 'सदैव सैनिका पुढेच जायचे' म्हणत गरिबीचे उदात्तीकरण करणारा. समृद्धीचे समाजवादी वावडे असणारा. संघटक वाचून वाद घालायचो. अचंबीत व्हायचो. तशात रशियन साम्राज्याचे तीन-तेरा वाजले. भल्याभल्या डाव्यांची बोलती बंद झाली. शेतकरी संघटनेचा सूट सबसिडी




**शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष कै. मोहन गुंजाळ यांचा १५ ऑक्टोबर हा स्मृतिदिन. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एका संदर्भग्रंथाचे प्रकाशन दि. १० नोव्हेंबर २०११ रोजी येवला येथे मा. शरद जोशी यांच्या हस्ते होणार आहे. या ग्रंथातील शेतकरी संघटना अध्यक्ष- श्री. रवी देवांग यांनी जागवलेल्या या हृद्य आठवणी...**

नाकारणाऱ्यांचा वैचारिक विजय झाला होता. तशात संघटनेचे पाशा, शंकरआण्णा, वहिनी, मोहन धुळे दौऱ्यावर आले. रमाकांत देसले माझं बखोटं धरून मला बैठकीला घेऊन आले. खुल्या व्यवस्थेच्या झुळका वाहू लागल्या होत्या. व्यक्तिगत मत मी मोहनला सांगितलं. संघटनेतले सगळेच बंडखोरवृत्तीचे असल्यामुळे तो विचार मांडण्याचं माझं धाडस झालं नाही.

मोहनवर गॅट, डंकेलसंबधी संपूर्ण खान्देशची प्रचार धुरा होती. मी सज्ज होतो. हिरोहोंडासह शांतू, गुलाबसिंगभाऊ, हिरामण पुढे जाऊन ७०-८० शेतकऱ्यांना जमवून ठेवायचे. मोहन समजावून सांगायचा तो भाषण करायचा नाही. संवाद साधायचा. शेतकऱ्यांच्या अंत:करणाला भिडायचा. मोहन निरोप देत होता. शेतकरी प्रतिसाद द्यायचे. दिवसभरातून १५-२० बैठका, सभा. सकाळपासून-संध्याकाळपर्यंतचा असा त्याचा धडाका. तो कधीच राणा भीमदेवी थाटात भाषण करायचा नाही. 'आपणासी ठावे ते सांगावे, शहाणे करूनी सोडावे सकल जना' असा तो तुकारामी आविष्कार होता. ती शैली अस्सल देशी वाणासारखी होती. जणू गावरान विचार...

मोहनसाठी मॉब सेट करायचं काम माझ्याकडें असायचं. एकदा कापडणेच्या झेंडा चौकात सभा होती. लांबलचक पल्लेदार वाक्यं फेकायची मला भारी हौस! वाक्य फेक कशी शॉटगन शत्रूघ्नसारखी असावी. भाषणात विचार कमी फुलोराच जास्त असा माझा खाक्या. सभा स्तब्ध होऊ लागली. मंत्रमुग्ध. मी फार्मात. शेतकऱ्यांनो, साने गुरूजी म्हणायचे, तुझ्या घामांमधून उद्या पिकल सोन्याचे रान. चल होऊन हुशार, चल उचल कुठार तुला नव्या जगाची आण, इ. पण... सोन्याचं रान कधी पिकलं नाही, पिकलं फक्त सोसायटीचं कर्ज इ. टाळ्या मिळाल्या.

घरी आल्यावर जेवताना मोहन शांतपणे म्हणाला, रविभाऊ ती कविता गुरुजींची नाही. वसंत बापटांची आहे. मी हिरमुसलो. चुकणाऱ्या कार्यकर्त्याला सरळ करायची ही पद्धती. तेव्हापासून आहे. कार्यकर्ता घडवणं हा त्याचा छंद होता. मोहनचं घर म्हणजे येणाऱ्या कार्यकर्त्यांचा राबता. नोकरी सांभाळत नवऱ्याचा कामाचा पसारा आवरत, याला चहा दे, त्याला पाणी दे करत वहिनी दमायची. कूणीतरी विडी कामगाराची पत्नी भाऊने न्याय दिला म्हणून डोळ्यांत कृतज्ञता दाटवून भेटायला यायची. शाळेची कामं, तशात मार्केट कमिटीचं विलेक्शन सगळं कसं हाताशी असावं म्हणून खोलीभर पसारा आणि मोहनच्या डोक्यात कामचा पसारा.. संघटनेला बिनीच्या शिलेदारांची गळती लागलेली. आंदोलनाला पोषक भूमी नव्हती. मी मोहनला म्हटलं इगतपुरीला जाऊन विपश्यना करुन ये, तो ओपन माइंडेड होता. जाऊन आला. मला म्हणे, माणसाच्या मनातला सेक्स गेल्याशिवाय हे काही खरं नाही. ही आपल्या बसची बात नाही. त्याची मतं ठाम असायची. सगळा रोखठोक मामला. सांगलीच्या आधिवेशनात तर त्याने माझ्या काळजाचा ठोकाच चुकवला.

मोहन महाराष्ट्र राज्य शेतकरी संघटनेचा अध्यक्ष होता. पाशा बीजेपीत गेलेला. बंगारू लक्ष्मण लाख मोलाचा माणूस पण लाखभर रुपयांच्या मोहात पडला. सगळा खेळ मोडला. पाशा म्हणायचा, मला साहेबांनी पाठवलं. तो श्रोत्यांमध्ये माझ्या शेजारी. व्यासपीठावर जाण्याच्या तयारीत. आता बोलावतील, तेव्हा पुकारतील म्हणून वाट बघत होता. माझ्या कानात म्हणाला, हे सगळे खरं, तर ही जत्रा बीजेपीत येणार. मी खिन्न. युती समजू शकतो; पण विलिनीकरण! प्रतिनिधी सभामंडप खचाखच भरलेला. एक प्रकारचा तणाव. त्याचं सावट पसरलेलं, मोहन उभा राहिला. गरजला, 'हे व्यासपीठ पाशा पटेल यांच्यासाठी नाही.' पिनड्रॉप सायलेन्स क्षणभर शरद जोशीही अवाक्. मोहनने कार्यकर्त्यांची नस ओळखली होती. स्वतंत्र भारत पक्षाचा जन्म झाला होता. मोहन ठाशीवपणे बोलला. पाशाचा नाईलाज झाला. क्षणभर मला लो. टिळक, शेंगा, टरफले सारं आठवलं. प्रसंगी शरद जोशींना डोकं लावणारा, शंकाचं निरसन झाल्यावर समर्थन करणारा मोहन निर्मळ मनाचा माणूस होता. तसाच निर्भिडही होता. संघटनेच्या कोणत्याही अधिवेशनापेक्षा नुकत्याच झालेल्या औरंगाबादच्या अधिवेशनात तंत्रज्ञानविषयक चर्चा खूप खोलवर झाली. मोहनने ऊर्जा स्वातंत्र्याची सुबक मांडणी केली. मध्यंतरी स्थानिक प्रश्नांचा विशेषत: पिण्याचे पाणी, रस्ते व सिंचन या प्रश्नांवरून. त्याच्यावर बहुजन प्रेम दाटून तो छगन भुजबळांच्या समीप गेलेला. संघटनेच्या अधिवेशनात ठरावाचं वाचन हा एक सन्मान असतो. मला क्षणभर वाटलं. ऊर्जा स्वातंत्र्याच्या ठरावाचं वाचन करायला शरद जोशी मोहनला टाळतील... पण माझा अंदाज चुकला. मोहननेच ठराव वाचला.

त्याचा अनेकविध बहुअंगी आजारपणाबद्दल काय म्हणावं. किशोर ढमाले म्हणतात, त्याप्रमाणे आदिवासी भागांतील खराब रत्यांवरून रात्री-अपरात्री खाचखळग्याने भरलेल्या रस्त्यावरून ट्रकने केलेला प्रवास त्याला मानेचा-कमरेचा स्पाँडीलीसीस देऊन गेला. साने गुरुजींच्या हयातीत तो इतका युवक असता तर धडपडणाऱ्या संवेदनशील पोरांमध्ये तो हिरो ठरला असता. तिरका उभ्या असलेल्याशी बोलाताना पिछे मूड करीत तो अख्खा फिरताना पाहिला की गलबलायचे. तो कानसेन होता. हृदयविकार बळावलेला असताना ब्रॉसबँडच्या मागे मागे पायी रपेट करताना देहभान विसरलेला मोहन आम्हा सगळ्या सवंगड्यांना कायमचा सोडून जाईल अशी कल्पना नव्हती. अवघं ५४ वर्षे वय... ही अधुरी कहाणी कशी पूर्ण होणार. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, नक्षलावाद, आतंकवाद, बेरोजगारांच्या आत्महत्या, कर्जबाजारीपण, मोहनच्या आठवणीनेही पापण्या ओलावतात, कंठ दाटून येतो.

मोहन तुला सलाम.

रवि देवांग.
अध्यक्ष, शेतकरी संघटना. मो. ९४२२२९६३५८
ravi.metta@rediffmail.com

■■

# दारिद्र्य रेषेची दरिद्री चर्चा

**कुटुंबाच्या अन्न-धान्यावरील खर्चाच्या आधारे दारिद्र्यरेषा निश्चित केली तर आणखी एक विदारक सत्य उघडकीस येईल की सर्वाधिक महाग धान्य त्याचा उत्पादक असलेल्या शेतकऱ्यालाच खावे लागते. आपल्या शेतात पिकवलेले धान्य खाण्यात गांधीवादी व पर्यावरणवादी यांना जो अतुलनीय आनंद वाटतो त्याचे कारण शेतीतील हे उफराटे गणित त्यांच्या ध्यानीमनी नसते. ते कल्पित स्वप्नानंदात तल्लीन असतात! धान्य उत्पादन करण्याचा जो खर्च येतो त्याच्या कितीतरी कमी किमतीत शेतकऱ्याला आपले धान्य बाजारात विकावे लागते. याचा अर्थ ग्राहक म्हणून टाटा-अंबानी स्वस्त धान्य खातात आणि उत्पादक शेतकऱ्याला स्वतःच्या शेतातील महाग धान्य खावे लागते!**

गेल्या पंधरवाड्यात दारिद्र्य रेषेवर दरिद्री नारायण सोडून सुखी माणसाचा सदरा घातलेल्या सभ्य जनांत घनघोर वाद आणि चर्चा झडली. निमित्त होते योजना आयोगाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात दारिद्र्य रेषेसंबंधी सादर करण्यात आलेले प्रतिज्ञापत्र. दारिद्र्यरेषा निर्धारित करण्याशी सर्वोच्च न्यायालयाचा काय संबंध असा प्रश्न आता कोणालाच पडत नसणार. कारण मनमोहन सरकार कोमात गेल्याने राज्य चालविण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःकडे ओढून घेतल्याचे सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळे सध्या न्यायालयात संवैधानिक प्रश्ना ऐवजी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नावर विचार आणि निर्णय होत असतात. अशाच प्रकारे न्यायालयात दारिद्र्य रेषेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सरकार नावाच्या संस्थेचे अस्तित्व नसल्याने किंवा त्या संस्थेला महत्त्व देण्याची गरज सर्वोच्च न्यायालयाला न वाटल्याने न्यायालयाने सरळ नियोजन आयोगाला दारिद्र्य रेषेसंबंधी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश दिला. या आदेशानुसार सादर प्रतिज्ञापत्रात योजना आयोगाने शहरी भागासाठी प्रतिमाणसी प्रतिदिन ३२ रुपये आणि ग्रामीण भागासाठी २६ रुपये या उत्पन्नाच्या खालील लोक दारिद्र्य रेषेखाली मोडत असल्याचे सांगितले. हे प्रतिज्ञापत्र सादर होताच काहीतरी नवीन, अघटीत आणि अभद्र घडल्याच्या थाटात विद्वान अर्थशास्त्री, समाजशास्त्री आणि समाजसेवक यांनी त्या प्रतिज्ञापत्राविरुद्ध दंड थोपटले. विषयातले काहीच कळत नसलेल्या राजकारणी आणि माध्यम प्रतिनिधींनी कोल्हेकुई सुरू केली. वास्तविक यात नवीन असे काही नव्हते. अर्थशास्त्री तेंडूलकर यांनी २००९ सालीच काही नवीन निकषांच्या आधारे ही दारिद्र्य रेषा निश्चित केली होती आणि सरकारने तेव्हाच ती ग्राह्य मानली होती. या दारिद्र्य रेषेच्या योग्य-अयोग्यतेबद्दल आपण पुढे चर्चा करू; पण ही दोन वर्षांपूर्वी निर्धारित केलेली दारिद्र्य रेषा होती हे लक्षात घेतले तर आजचा वाद या वाक्पटूची दिवाळखोरी दर्शविते. राजकारणी आणि माध्यमे आपल्या उथळपणासाठी प्रसिद्ध असल्याने त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करता येईल; पण अरुणा रॉयसारख्या सिव्हिल सोसायटीच्या लोकांकडे दुर्लक्ष करता येत नाही. अण्णा आंदोलनामुळे अनेक सिव्हिल सोसायटीच्या सदस्यांनी आपले अस्तित्व दाखविण्यासाठी या मुद्द्याचे भांडवल केले असेच म्हणावे लागेल. दुसऱ्या बाजूने नियोजन आयोग २६ व ३२ रुपयाची दारिद्र्य रेषा म्हणजे फार मोठा क्रांतिकारी निर्णय असल्याच्या थाटात या रेषेचे समर्थन करीत होते. दोन्हीही बाजूंनी दारिद्र्य रेषेवर जी चर्चा झाली त्यात दारिद्र्याची चीड आणि दारिद्र्य निर्मूलनाचा विचार याचा संपूर्ण अभाव होता. दरिद्री माणसांऐवजी सगळी चर्चा आकड्यांभोवती फिरवून दोन्ही बाजूनी आपली असंवेदनशीलता तेवढी दाखवून दिली. भरल्यापोटी किती खमंग चर्चा होऊ शकते याचे हे बीभत्स उदाहरण!



सुधाकर जाधव

**आकड्यांचा खेळ**

सगळी चर्चा ऐकून सामान्य लोकांना अर्थशास्त्री तेंडूलकर हे खलनायक वाटत असतील. दुर्दैवाने आज ते हयात नसल्याने आपल्याला त्यांच्याकडून स्पष्टीकरण मिळणार नाही; पण तेंडूलकर यांचे आधी दारिद्र्य रेषा ठरविण्याचा जो निकष होता तो अमानवीयच होता. माणसाला जिवंत राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी जी उर्जा लागते तेवढे उष्मांक जेवढ्या अन्नातून निर्माण होतील तेवढे अन्न मिळणारा मनुष्य हा दारिद्र्य रेषेच्या वरचा

मानला जायचा. माणसाला जनावराच्या पातळीवर आणणारा हा दारिद्र्य रेषा ठरविण्याचा निकष १९७० च्या दशकापासून ते अगदी २००९ सालापर्यंत अबाधित होता. ७० च्या दशकात अर्थपंडित दांडेकर आणि रथ यांनी लिहिलेल्या 'भारतातील गरिबी' या मूळ इंग्रजी पुस्तकावरून तेव्हा मोठे वादळ उठले होते. त्यानंतर अन्नातून मिळणारे उष्मांक किंवा कॅलरी हा गरिबी ठरविण्याचा 'शास्त्रीय' आधार मनाला गेला! महाराष्ट्रात जेव्हा रोजगार हमी योजना सुरू झाली व न्याय्य मजुरी निश्चित करण्यासाठी थोर थोर विचारवंत व समाजसेवकांची एक समिती महाराष्ट्र सरकारने गठीत केली होती. या समितीनेसुद्धा उष्मांक किंवा कॅलरीची आवश्यकता लक्षात घेऊन मजुरीचे दर निश्चित केले होते. कुक्कुटपालन व्यवसाय करणारे जसे कोंबड्यांना त्यांचे वजन वाढावे म्हणून शास्त्रीय निकषाच्या आधारे जसा आहार देतात त्याच पद्धतीने माणसाच्या उष्मांकाचा विचार गरिबी ठरविताना किंवा रोजंदारी ठरविताना केला गेला. जनावरासारख्याच माणसाच्या गरजा मानण्याचा हा माणुसकी शून्य निकष रद्द करण्याचे काम तेंडूलकर यांनी केले. दारिद्र्य रेषा निश्चित करताना अन्नधान्यासोबत कुटुंबाच्या आरोग्यविषयक आणि शैक्षणिक-सांस्कृतिक गरजा याचा विचार केला पाहिजे हे सुरेश तेंडूलकर यांनी मांडले व त्या आधारे त्यांनी दारिद्र्यरेषा निर्धारित करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनी दारिद्र्य रेषा निर्धारण ज्या २६ आणि ३२ रुपयांच्या आधारे केले ते बघता त्यांनी मानलेल्या निकषाला त्यांनी न्याय दिला असे म्हणता येणार नाही; पण आज जो प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे, की या पैशांत जगता येईल का? तो परिस्थितीबद्दल अज्ञान दर्शविणारा आहे. माणसाच्या बाकी गरजांकडे दुर्लक्ष करून या पैशांत त्याला जगविता येते आणि अशा पद्धतीने कोट्यवधी लोक जगतही आहेत. प्रतिव्यक्ती प्रतिदिवशी २६ व ३२ हा आकडा ऐकताना फार छोटा वाटत असला तरी सरासरी ५ सदस्यांचे कुटुंब गृहीत धरून कुटुंबाचे मासिक उत्पन्न काढले तर २६ व ३२ पेक्षा सन्मानजनक आकडा पुढे येतो. शहरी भागातील मासिक उत्पन्न ४८०० तर ग्रामीण भागातील ३९०० रुपये येते. एवढे उत्पन्न मिळणे तर सर्वसामान्य शेतकरी कुटुंबासाठी लॉटरी लागण्यासारखे आहे! पण वस्तुस्थिती अशी आहे की हे आकडे त्याच्यासाठी निव्वळ मृगजळ आहे. निव्वळ रोजंदारी करणाऱ्याचे नशीब बलवत्तर असेल तर त्याला अखंड रोजगार मिळून मासिक उत्पन्नाचा हा आकडा गाठताही येईल; पण स्वतःच्या शेतीवर राबणाऱ्याला कधीच हा आकडा गाठता येत नाही. सर्व विद्वानांचे गरिबीचे जे गणित चुकते ते इथेच! रोजगारावर आधारित उत्पन्न गृहीत धरून गरिबीची आकडेमोड शास्त्रीय भासविता येते; पण अशा आकडेवारीतून अर्धी लोकसंख्या आधीच बाजूला पडते आणि गरिबांची मोजदाद होते ती उरलेल्या अर्ध्या लोकसंख्येतून. म्हणूनच मग गरिबीचे ३२ टक्क्यांसारखे फसवे आकडे निघतात. निकष वास्तव नसल्याने आपल्या सोयीनुसार ही टक्केवारी वाढविता किंवा कमी करता येते. अशाच प्रकारे सक्सेना समितीने भारतात गरिबांची संख्या ५० टक्के असल्याची, तर अर्जुन सेन या काँग्रेसी समाजवादी अर्थतज्ज्ञाने भारतात ७७ टक्के लोकसंख्या गरीब आहे असा निष्कर्ष काढला आहे. शेतकऱ्यांची गरिबी लक्षात घेतली तर अर्जुन सेन समितीचा आकडा सत्याच्या जवळ वाटेल; पण त्यांच्या आकडेवारीतही शेतकऱ्याच्या गरिबीला स्थान नसल्याने ती आकडेवारी विश्वसनीय व उपयोगी मानता येत नाही.



**इतक्या वर्षांपासून लक्षावधी कोटी रुपये गरिबी निर्मूलनावर खर्च होत आहेत तरी गरिबी कमी होण्याऐवजी का वाढत आहे? याचे सोपे उत्तर असे आहे की गरिबी निर्मुलनाचे बजेट दरवर्षी वाढते राहावे यासाठी गरिबांची संख्याही वाढती राहिली पाहिजे. शासन आणि प्रशासन यांची रुची बजेटमध्ये आहे. गरिबी निर्मुलनाचे बजेट हे त्यांच्या चैनीसाठीचे व श्रीमंतीचे कारण आहे; पण याच कारणाने गरिबी संपत नाही असे निदान करणे म्हणजे गरिबीचा प्रश्न न समजण्यासारखे आहे. केवळ भ्रष्टाचारामुळे गरिबी संपत नाही, असे नाही, गरिबीनिर्मितीचा कारखाना जोरात चालू ठेवून गरिबी निर्मूलनावर उधळपट्टी सुरू आहे. राजकारणी लोकांसाठी दारिद्र्य हा पैसा आणि मते मिळविण्याचा सर्वात मोठा फायदेशीर व्यवसाय बनला आहे.**

**सहाव्या वेतन आयोगाच्या आधारे दारिद्र्य रेषा**

या चर्चेमध्ये एक प्रश्न सातत्याने उपस्थित करण्यात आला आहे, की इतक्या वर्षांपासून लक्षावधी कोटी रुपये गरिबी निर्मूलनावर खर्च होत आहेत तरी गरिबी कमी होण्याऐवजी का वाढत आहे? याचे सोपे उत्तर असे आहे की गरिबी निर्मुलनाचे बजेट दरवर्षी वाढते राहावे यासाठी गरिबांची संख्याही वाढती राहिली पाहिजे. शासन आणि प्रशासन यांची रुची बजेटमध्ये आहे. गरिबी निर्मुलनाचे बजेट हे त्यांच्या चैनीसाठीचे व श्रीमंतीचे कारण आहे; पण याच कारणाने गरिबी संपत नाही असे निदान करणे म्हणजे गरिबीचा प्रश्न न समजण्यासारखे आहे. केवळ भ्रष्टाचारामुळे गरिबी संपत नाही, असे नाही, गरिबीनिर्मितीचा कारखाना जोरात चालू ठेवून गरिबी निर्मूलनावर उधळपट्टी सुरू आहे. राजकारणी लोकांसाठी दारिद्र्य हा पैसा आणि मते मिळविण्याचा सर्वात मोठा फायदेशीर व्यवसाय बनला आहे. म्हणूनच दारिद्र्य रेषेच्या या साऱ्या चर्चेत देशातील दारिद्र्य कसे कमी होईल हा विचार कोणी करीत नसल्याने तो

मांडला जात नाही. उलट दारिद्र्य रेषे खाली अधिकाधिक लोक यावेत असा प्रयत्न उत्साहाने होत आहे. दारिद्र्य रेषेवरील प्रतिक्रिया लक्षात घेऊन नव्या पाहणीच्या आधारे नवी दारिद्र्य रेषा निश्चित करण्याची नियोजन आयोगाची उपरती हा याच उत्साहाचा परिपाक आहे. दारिद्र्याच्या मूळावर घाव घालण्याचा आजवर प्रयत्न झाला नाही व पुढे होईल असे आश्वासक चित्रही दिसत नाही. फसव्या निकषाच्या आधारे दारिद्र्य रेषा वर खाली करण्याचा किंवा दारिद्र्य रेषेखालील संख्या कमी जास्त करण्याची शास्त्रीय हातचलाखी बंद करायची असेल तर दारिद्र्याच्या मूळावर घाव घातल्या शिवाय गत्यंतर नाही. आज शेती हाच दारिद्र्य निर्मितीचा खरा कारखाना असल्याने शेतीचे रुपांतर सुबत्ता निर्माण करण्याच्या कारखान्यात करण्याची गरज आहे. शेती फायदेशीर झाल्या शिवाय दारिद्र्य निर्मिती थांबणार नाही आणि सुबत्ता निर्माण होणार नाही. दारिद्र्य निर्मूलनासाठीचा सगळा पैसा शेतीसाठी भांडवल आणि मूलभूत सोयी निर्माण करण्यासाठी वापरला तर एका दशकाच्या आत दारिद्र्य निर्मूलन शक्य आहे. उद्योग जगताला कोणत्याही मदतीची विशेष गरज नसताना कर्जमाफी व कर सवलतींच्या माध्यमातून जी खिरापत वाटल्या जात आहे त्यातून उद्योगजगत समृद्ध व संपन्न होत असले तरी गरिबी निर्मूलनासाठी त्याचा काडीचाही उपयोग होत नाही; पण हाच पैसा शेतीक्षेत्रात ओतला तर झपाट्याने दारिद्र्य कमी होईल. आपल्याकडील दारिद्र्य निर्मूलन योजनांचा मत प्राप्तीशी आणि उद्योगजगताला वाटल्या जाणाऱ्या खिरापतीचा संबंध मत प्राप्तीसाठी पैशाचा स्रोत निर्माण करण्याशी संबंध असल्याने दारिद्र्य निर्मूलन हा प्रश्न आर्थिक न राहता राजकीय बनला आहे. दारिद्र्य निर्मूलनाची राजकीय इच्छाशक्ती असलेल्या राजकीय नेतृत्वाची यासाठी देशाला गरज आहे, असे नेतृत्व समोर येत नाही तोपर्यंत काही गोष्टी करणे सहज शक्य आहे. दारिद्र्याचा प्रश्न संवेदनशील पद्धतीने हाताळायचा असेल तर अर्थशास्त्रज्ञ व आकडेवारी यांवर निर्भर राहणे सोडून दिले पाहिजे. सहाव्या वेतन आयोगाचा प्रमुख अर्थशास्त्री नसल्याने ढोबळ निकष लावून आयोगाने कुटुंबाला जगविण्यासाठी किमान १० हजार रुपये मासिक उत्पन्न पाहिजे असा हिशेब मांडला होता. याच आधारावर सहाव्या वेतन आयोगाने सर्वात खालच्या कर्मचाऱ्याचे प्रारंभीचे वेतन १० हजार रुपये निश्चित केले होते. हा अहवाल स्वीकारून सरकारने तो लागूही केला आहे. सरकारी कर्मचाऱ्याला जगण्यासाठी किमान दहा हजार आणि ग्रामीण गरिबाला जगण्यासाठी ३९०० रुपये हे कोणते गणित आहे. सरकार जनतेमध्ये असा भेदभाव कसा करू शकते? जानेवारी २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू झाला तेव्हा १० हजार रुपये सुरुवातीची प्राप्ती असणारा कर्मचारी आज जे मिळवीत आहे तीच आजची दारिद्र्य रेषा मानली तर न्यायसंगत होईल. आज या कर्मचाऱ्याची प्राप्ती १२००० रुपये आहे असे गृहीत धरले तरी प्रति माणसी प्रतिदिनी मिळकत फक्त ८० रुपये होते आणि देशाचा आर्थिक विकासाचा वेग व वाढते सकल राष्ट्रीय उत्पन्न लक्षात घेतले तर ही मिळकत जास्त होत नाही हे समजून घेतले पाहिजे. खैराती योजनांच्या माध्यमांतून नव्हे तर कोणत्याही कुटुंबाला महिन्याकाठी एवढी रक्कम मिळेल असे रोजगार उपलब्ध केले तरंच गरिबी निर्मुलन होईल. शेतीमालाचे भाव निश्चित करताना मजुरीचे हेच मूल्य गृहीत धरले नाही तर सगळाच खटाटोप व्यर्थ होईल. एवढा मोबदला देण्याचे सामर्थ्य फक्त आर्थिक उदारीकरणात आहे हे या निमित्ताने लक्षात घेतले पाहिजे. मात्र केवळ आर्थिक निकषांच्या आधारेच दारिद्र्य रेषा निर्धारित करायची असेल आणि त्यातून गरिबीचे सम्यक् चित्र उभे करायचे असेल तर त्यासाठी सर्वांत सोपा, विश्वसनीय आणि सर्वसमावेशक असा निकष कुटुंबाचा अन्नधान्यावरील खर्च हा आणि हाच असू शकतो. कारण हा निकष लावला तर त्यातून इतरांसोबत शेतकऱ्यांचेही दारिद्र्य स्पष्ट होईल. ज्यांचे उत्पन्न जास्त त्यांची अन्नधान्यावरील खर्चाची टक्केवारी कमी असणार आणि ज्यांचे उत्पन्न कमी त्यांचा अन्नधान्यावरील खर्च अधिक असणार हे उघड आहे. अर्थात हा खर्च बाजारभाव गृहीत धरून काढावा लागेल. हा निकष लावला तर आपल्या असे लक्षात येईल, की संपन्न लोकांचा अन्नधान्यावरील खर्च हा त्यांच्या उत्पन्नाच्या १० ते १५ टक्के पेक्षा अधिक असत नाही. या उलट गरिबांची अन्नधान्यावर आपल्या मिळकतीच्या जवळपास दोन तृतीयांश रक्कम खर्च होते. माणसाच्या इतर गरजा आणि त्यावरील वाढता खर्च लक्षात घेतला तर अन्न धान्यावर मिळकतीच्या ३५ ते ४० टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम खर्च होते अशी सगळी कुटुंबे दारिद्र्यरेषेच्या खालील मानली पाहिजेत. कुटुंबाच्या अन्नधान्यावरील खर्चाच्याआधारे दारिद्र्यरेषा निश्चित केली तर आणखी एक विदारक सत्य उघडकीस येईल, की सर्वाधिक महाग धान्य त्याचा उत्पादक असलेल्या शेतकऱ्यालाच खावे लागते. आपल्या शेतात पिकवलेले धान्य खाण्यात गांधीवादी व पर्यावरणवादी यांना जो अतुलनीय आनंद वाटतो त्याचे कारण शेतीतील हे उफराटे गणित त्यांच्या ध्यानीमनी नसते. ते कल्पित स्वप्नानंदात मग्न असतात! धान्य उत्पादन करण्याचा जो खर्च येतो त्याच्या कितीतरी कमी किमतीत शेतकऱ्याला आपले धान्य बाजारात विकावे लागते. याचा अर्थ ग्राहक म्हणून टाटा-अंबानी स्वस्त धान्य खातात आणि उत्पादक शेतकऱ्याला स्वतःच्या शेतातील महाग धान्य खावे लागते!

नियोजन आयोगाच्या प्रतिज्ञापत्राच्या निमित्ताने ज्यांनी ज्यांनी सरकारवर तोंडसुख घेतले त्यांनाही जाता जाता आरसा दाखविण्याची गरज आहे. सरकारी संस्थांत काम करणारे सर्व - कृषी विद्यापीठात शेतीचे काम करणारे मजूरसुद्धा - दारिद्र्य रेषेच्या वर आहेत; पण मध्यमवर्गीय, उच्चमध्यम वर्गीय आणि श्रीमंत लोकांकडे काम करणारे बहुतांश लोकांची मिळकत ही दारिद्र्य रेषेखालची आहे! दारिद्र्य दूर करण्याची इच्छा व भावना प्रामाणिक असेल तर या वर्गांनी आपल्या खिशाचा भार हलका केला पाहिजे. अन्नधान्याची भाववाढ आनंदाने सहन करण्याची तयारी या वर्गाने दाखविली तर गरिबी निर्मूलनात त्यांचे योगदान मोलाचे ठरेल.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# स्वच्छ समृद्ध जीवन हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवीनच!

## पूर्वार्ध

[ आपल्या जीवनाला सर्व बाजूंनी वेढणारा भ्रष्टाचार आटोक्यात आणता येईल का आणि तो कसा आटोक्यात आणायचा हे माझ्या समोरचे प्रश्न आहेत. भ्रष्टाचारमुक्त समाजाचे स्वप्न कितीही उदात्त, आकर्षक वाटले तरी ते स्वप्नच राहणार हे ओळखण्याइतकी परिपक्वता, प्रौढता आता माझ्यामध्ये आलेली आहे. त्यामुळे काही व्यवहार्य शक्यतांचा विचार करणे एवढेच माझे उद्दिष्ट आहे. ]

सत्य आम्हां मनी । न हो गाबाळाचे धनी ।।
ऐसे जाणा रे सकळ । भरा शुद्ध, टाका मळ ।।
देतो तीक्ष्ण उत्तरें । पुढे व्हावयासी बरें ।।
तुका म्हणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ।।

**एक**

आपल्या जीवनाला सर्व बाजूंनी वेढणारा भ्रष्टाचार आटोक्यात आणता येईल का आणि तो कसा आटोक्यात आणायचा हे माझ्या समोरचे प्रश्न आहेत. भ्रष्टाचारमुक्त समाजाचे स्वप्न कितीही उदात्त, आकर्षक वाटले तरी ते स्वप्नच राहणार हे ओळखण्याइतकी परिपक्वता, प्रौढता आता माझ्यामध्ये आलेली आहे. त्यामुळे काही व्यवहार्य शक्यतांचा विचार करणे एवढेच माझे उद्दिष्ट आहे.

या विषयावर लिहिण्याचा माझा अधिकार फारच मर्यादित आहे. त्याची कारणे दोन. मी स्वतः पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त जीन जगलेलो नाही हे प्रमुख कारण. इच्छा कधीच नव्हती पण मलाही भ्रष्टाचारात भाग घ्यावा लागला होता. असे प्रसंग मोजकेच हो असे म्हणून मला जबाबदारी टाळायची नाही. लाच देणे-घेणे, सरकारला कर द्यावा लागेल म्हणून व्यवहारातल्य खऱ्या रकमा कागदोपत्री न नोंदवणे, कर सरसकट चुकवणे हे माझ्यासारख्या आर्थिकदृष्ट्या सामान्य माणसाच्यास हातून घडणारे भ्रष्टाचाराचे तीन प्रकार मानले तर मी लाच दिली होती (घेतली कधीच नव्हती आणि घेणारही नाही), कागदोपत्री एकूण रकमेच्या निम्तीच रक्कम दाखवली होती; हे दोन प्रकार माझ्या वाट्याला आलेच होते. जेव्हा जेव्हा माझे वैयक्तिक उत्पन्न करपात्र होते- अशी वर्षे माझ्या आयुष्यात जेमतेम १५ होती- त्यावेळेला कर मात्र भरला होता कारण वेतन घेतानाच त्यातून कर वजा करण्याची व्यवस्थाच होती. किरकोळ लाच देण्याचे प्रकार नेहमीचेच होते-ट्राफिकविषयक अपरध घडला तर चटकन सोडवणूक करून घेणे व सरकार ऑफिसातले काम दलाला (एजंटा) कडून करून घेणे. हेही सांगणे नलगे की रक्कम कमी दाखवणे वा मुळीच न दाखवणे हे प्रकार अर्थातच स्थावर मालमत्तेच्या व्यवहारात- जमीन खरेदी करणे, भाड्याची जागा घरमालकाला परत देणे- करावे लागले होते. या व्यवहारांचे तपशील सांगत नाही कारण दुसऱ्या बाजूच्या व्यक्ती जनरीत म्हणूनच तसे करत होत्या. गंमतीचा भाग असा की यातही एक न्याय होता- त्याला आपण भ्रष्ट न्याय (Corrupt justice ) म्हणू शकू ; कारण जमीन खरेदी करता माझे जेवढे पैसे या देशातल्या काळ्या पैशात जमा झाले होते, साधारण तेवढेच मला भाड्याची जागा सोडताना मिळाले होते! त्यातली बरीच मोठी रक्कम मी धर्मादाय संस्थांना चकने दान दिली यातही कठोर नियम लावून पाहिले तर-भ्रष्टाचार झाला असेही म्हणता येईल.



विनय हर्डीकर

दुसरे कारण जास्त महत्त्वाचे आहे. नोकरदार माणसाने आयकर भरणे हे नैतिकतेचे प्रमाणपत्र नाही कारण तो संपत्ती निर्माण करत नाही, दुसऱ्याने निर्माण केलेल्या संपत्तीच्या निर्मितीमध्ये किंवा व्यवस्थापनामध्ये तो काम करत असतो. तेही त्याने सचोटीने केले नाही तर भ्रष्टाचाराचा आपखी एक प्रकार तयार होतो-ज्यात आपली शासकीय यंत्रणा पूर्णपणे बुडालेली आहे. मात्र स्वतःची बुद्धी, प्रतिभा, व्यवहार ज्ञान, व्यवस्थापन कौशल्य, बाजारपेठा शोधून त्या ताब्यात ठेवण्याची चाणाक्ष दूरदृष्टी कामाला लावून संपत्ती व रोजगार निर्माण करणारे जेव्हा कर चुकवण्याची अहोरात्र धडपड करताना दिसतात तेव्हा त्याला भ्रष्टाचार म्हणायचे की नाही हा प्रश्न फार जटिल आहे. त्यातच ज्या शासन/राज्य ( State) या संस्थेला हा कर द्यायचा ती यंत्रणाच जर भ्रष्ट असेल, तिच्या अब्रूची लक्तरे रोजच्या दिवसाला वेशीवर टांगली जात असतील तर अशा यंत्रणे/संस्थेला कर न देण्याकडेच ओढा राहणार हेही उघड आहे. या संपत्ती आणि रोजगार निर्माण करणाऱ्या अवाढव्य, बहुआयामी प्रक्रियेशी माझा

फारसा संबंध आलेला नाही; मी एक तर नोकरी केलेली आहे; कंवा ती सांभाळून - काही वेळा पूर्णपणे सोडून- सामाजिक/राजकीय/माध्यमे या क्षेत्रात काम केले आहे. उत्पादक आर्थिक क्षेत्राचा माझा अनुभव नगण्य आहे.

स्थावर मालमत्तेची खरेदी व विक्री, करपात उत्पन्न न दाखवणे या यांप्रमाणेच सरकारी कामांची कंत्राटे मिळवताना प्रचंड भ्रष्टाचार होतो हे उघडे गुपित आहे. 'इतका भ्रष्टाचार असतानाही तुम्ही बांधलेले पूल आणि धरणे इतकी वर्षे टिकतात कशी?' या प्रश्नाचे उत्तर देणारा एक प्रामाणिक सरकारी अधिकारी मला भेटला होता. ' आम्ही प्रस्ताव तयार करतानाच मूळ किंमत तिप्पट करतो; १/३ भाग वाढणाऱ्या किंमतीसाठी तर १/३ भाग भ्रष्टाचारासाठी' असे त्याने मोकळेपणाने सांगितले होते. याही क्षेत्राची मला स्वानुभवातून मिळणारी माहिती नाही; शोध-पत्रकारिता करताना काही प्रकरणे समजावून घेतली होती एवढेच. भ्रष्टाचाराचे चौथे कुरण म्हणजे पोलीस खाते. प्रतिष्ठित घरातल्या गुन्हेगारांना लपवणे, सराइत गुन्हेगारांकडे काणाडोळा करणे आणि रोजच्या खर्चासाठीची वरकड रक्कम किरकोळ गुन्हेगारांकडून वसूल करणे- यातल्या तिसऱ्या प्रकारात मी काही सहभाग घेतला होता, हे सांगितलेच; मात्र गंभीर गुन्हा मी किंवा माझ्या जवळच्या कोणाकडून न घडल्यामुळे त्याही क्षेत्राची माहिती शोध-पत्रकारिता करताना मिळाली तेवढीच !

माझ्या मर्यादा मोकळेपणाने सांगितल्या; त्यामागे प्रमाणिकपणा होताच पण अजून एक महत्त्वाचे कारण होते. भ्रष्टाचाराने अस्वस्थ होणारी, त्याच्या समूळ उच्चाटनासाठी उपाय सुचवणारी बहुतेक सर्व मंडळी माझ्यासारखीच असतात; स्वतःचे अज्ञान लपवण्यासाठी अव्यवहार्य आदर्शांचया काव्यमय भाषेत बोलत असतात. त्यांना तसे बोलू देण्यात भ्रष्ट व्यवस्थेची सोयही असते. भ्रष्टाचार करणारे उद्योजक, व्यापारी, सरकारी अधिकारी-कर्मचारी, राजकारणी आणि त्यांना अवैध संपत्ती लपवण्यासाठी युक्त्या-प्रयुक्त्या सुचवणारे कर सल्लागार या चर्चेत कधीच सामील होत नाहीत. उद्योजक/व्यापारी सरकारी कायदे व यंत्रणेकडे बोट दाखवतात, सरकारी यंत्रणा 'आम्हाला हे पैसे वरपर्यंत पोचवण्यासाठी गोळा करणे भाग पडते' अश निर्लज्ज कबुली देते, राजकारणी 'मी आणि माझा पक्ष यांच्यापेक्षा तो आणि त्याचा पक्ष जास्त भ्रष्ट आहेत', हे सिद्ध करण्यात धन्यता मानतात. त्यांची कर-सल्लागारांची फौज 'नाटकात दुःशासनाची भूमिका वाट्याला आली तर द्रौपदीचे वस्त्रहरण तन्मयतेने करणे भागच आहे' म्हणत, 'भूमिका जगत असते. त्यामुळे भ्रष्टाचार निर्मूलनाची सगळी चर्चा एका भाबड्यापातळीवर फिरत राहते. गुंतागुंतीचे खटले सोडवताना आरोपीपैकी एकाला 'माफीचा साक्षीदार केल्याशिवाय मार्ग सापडत नाही. त्याच प्रमाणे यांपैकी कोणीतरी 'वाल्याचा वाल्मिकी' होण्याचे ठरवल्याखेरीज भ्रष्टाचाराच्या दुखण्यावर प्रभावी उपाय सापडणार नाही. सरकारी अधिकारी व राजकारणी हाडे ढिली झाल्यावर आत्मचरित्र लिहून काही गौप्यस्फोट करतात खरे पण तोपर्यंत भ्रष्टाचाराची नवी प्रकरणे चर्चेसाठी उपलब्ध झालेली असतातच!

गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकात आपण आर्थिक उदारीकरणाच्या जागतिक प्रक्रियेत सहभागी झालो, थेट परकीय भांडवली गुंतवणूकीसाठी दरवाजे उघडले आणि भ्रष्टाचार व त्यातले आकडे आकाशाएवढे मोठे झाले. माझ्यासारख्याला सुद्धा टू जी स्पेक्ट्रम घोटाळ्याची रक्कम चटकन आकड्यात लिहीता येणार नाही तर सर्वसाधारण, नोकरी/व्यवसाय करून, कुटूंबाचा चरितार्थ चालवणाऱ्यांची बातच सोडा ! हे आकडेच इतके भयानक आहेत की भ्रष्टाचाराच्या प्रश्नावर जागृती निर्माण न होता ऐकणाऱ्या/वाचणाऱ्यांना एक बधिताच यावी ! बोफोर्स प्रकरणी भ्रष्टाचार झाल्याच्या सांगोवांगी मधून जी राजकीय उलथापालथ झाली तशी उलथापालथ मात्र हे भयानक आकडे घडवू शकले नाहीत. संबंधित मंत्र्याचा राजीनामा आणि चौकशी-समिती (तीही सर्वपक्षीय-संसदीय समिती नेमली की विरोधी पक्षामधले भिक्षुक संतुष्ट !) एवढीच पावले माध्यमांनी प्रचंड गदारोळ केल्यावर उचलली गेली की पुढच्या प्रकरणाची वाट पाहण्याचा कोडगेपणा संपूर्ण देशाच्या अंगी बाणतो आहे की काय? (निवृत्त न्यायमूर्तींची मात्र या प्रकरणात चंगळ होते-काही दिवसांनी प्रकरणे पडून आहेत कारण स्वच्छ न्यायमूर्ती चौकशीसाठी उपलब्ध नाहीत, अशीही अवस्था ओढवेल.) आपला देश उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या घरच्या/बाहेरच्या दहशतवाद्यांच्या तोंडाला पाणी सुटावे अशी परीस्थिती कशी निर्माण झाली ? आपले कायदे खरोखरच इतके निरर्थक आणि दुबळे आहेत काय?

या विषयावर यावर्षी लिहावे असे ठरले तेंव्हा श्री. अण्णा हजारे यांची दोन उपोषणे आणि मुख्यता दुसऱ्या उपोषणाच्या वेळी पाहायला मिळालेला व्यसापक जनसहभाग या घटना भविष्य काळात होत्या; ज्या आता आपल्या नजीकच्या भूतकाळात जमा झालेल्या आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार-नियंत्रणाची व्यवहार्य भूमिका मागे पडून 'भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन शक्य आहे. सत्ताबदल हा त्याचा मार्ग आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध व्यापक जनक्षोभ देशात आहेच. त्याला स्वच्छ, निरलस, त्यागी नेतृत्वाची जोड मिळाली की वयोवृद्ध लोक पूजित नेता आणि त्याच्या मागून जायला तयार असणारे बेभान युवक असा बदल घडवून आणतील !' अशी खात्री पटल्याच्या नादात सर्वजण आहेत. चालू काळाची पावले चटकन ओळखून त्या काळासाठी आपली जुनी भाषा पटकन बदलणारे 'पंडित' ही क्रांती, दुसरे स्वातंत्र्ययुद्ध, नव्या संस्कृतीची पहाट, घोर अंधःकारातला आशेचा किरण (अंधेरेमे एक प्रकाश ?) वगैरे शाब्दिक फटाके उडवण्यात मग्न आहेत.

म्हणजे भ्रष्टाचार निर्मूलनाची संकल्पनाच भ्रष्ट होत चालली आहे काय? अव्यवहार्य व्याच्यांच्या गदारोळात मूळ रोगाकडच दुर्लक्ष होईल की काय? गेल्या ६० वर्षांकडे एक नजर टाकली तरी महान पुढारी, राजकीय चातुर्य आणि युवाशक्ती हे तीन घटक परत परत समोर येताना दिसतात. १९४७ मध्ये आपण स्वतंत्र झालो, १९५० मध्ये राज्यघटना स्वीकारली, १९५२ मध्ये (सरकारी) समाजवादी नियोजन पद्धतीने धोरणे ठरवणे व राबवणे सुरू झाले, दहा वर्षांतच नेहरूंचे पंजाबमधले उजवे हात प्रतापसिंग कैरॉं यांच्या भर राष्ट्रीय हमरस्त्यावरील खुनामुळे भ्रष्टाचाराचा मुद्दा प्रथम ऐरणीवर आला (नेहरूंना या धक्क्यामुळेच अर्धांगवायू झाला असेही बोलले गेले), त्यानंतर १०/१२ वर्षातच जयप्रकाश नारायण संपूर्ण क्रांतीची घोषणा घेऊन देशभर फिरू लागले, आणीबाणीनंतर सत्ताबदल झाला खरा पण भ्रष्टाचाराचे उच्चाटन सोडा, नियंत्रणही करता आले नाही, पुन्हा दहा वर्षांनी बोफोर्स तोफा व स्विस पाणबुड्यांच्या निमित्ताने व्यापक जनक्षोभ निर्माण झाला, सत्ताबदलही झाला पण भ्रष्टाचाराचे भूत मानगुटीवरून उतरले नाही- त्यानंतर दहा वर्षांनी गो.रा. खैरनार, मध्ये किरण बेदी वगैरे किरकोळ सेनापती आणि आता अण्णा हजारे ! तोच माध्यमांनी पसरवलेला उन्माद (हिस्टेरिया), तोच जनक्षोभ, तीच क्रांतीची चाहूल, तेच दुसरे स्वातंत्र्य (काही वर्षांनी

दुसरे स्वातंत्र्य क्र.१, क्र.२, क्र.३ अशी यादी करावी लागेल !) तेच बेभान, उत्कट युवकांचे चेहरे आणि तीच भ्रष्टाचार नावाच्या आचार/ प्रवृत्ती/ दुखण्याची चिवट तितिक्षा ! आपण प्रश्नाचे उत्तर खरोखरच शोधतो आहोत का?

### दोन

एकास एक अशी तुलना केली तर जयप्रकाश नारायण आणि अण्णा हजारे यांच्यात प्रचंड फरक आहे, राजकारणाच्या प्रत्यक्ष अनुभवाबद्दलही तेच म्हणता येईल. जेपींच्या व्यक्तिमत्त्वामुळे १९७७ मध्ये बिगर काँग्रेस पक्षांची तात्पुरती एकजूट होऊ शकली होती आणि आणीबाणी हटवण्याचे ऐतिहासिक काम पार पडले होते. मर्यादित अर्थाने ती लढाई स्वातंत्र्यासाठी होती. अण्णांची लढाई तशी नाही- देश स्वतंत्र आहे, सार्वभौम आहे, आर्थिक क्षेत्रात प्रगती पथावर आहे कोणत्याही प्रकारची सक्ती वा सेन्सॉरशिप देशात लागू केलेली नाही- सरकार दुबळे आहे एवढे एकच कारण त्यामागे नाही; हे लक्षात घेण्याची गरज आहे. मात्र राजकीय परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे; बिगर काँग्रेस पक्षांच्या एकजुटीची शक्यता नाही. विश्वानाथ प्रतापसिंग पंतप्रधान तेव्हा तसा एक क्षीण प्रयोग झाला होता व तो वर्षभरही टिकला नव्हता. तरीही सत्ताबदल हाच एकमेव मार्ग असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेतच. नुकतीच टाइम्स ऑफ इंडियाने एक जनमत चाचणी घेतली. त्यात काँग्रसच्या मतांत लक्षणीय घट झाली आ भाजपाच्या मतांत तेवढीच वाढ झाल्याचे चित्र दिसले. इंग्रजी वृत्तपत्राचा कौल प्रातिनिधीक मानायचा की नाही हा प्रश्नही विचारलाच पाहिजे.

अण्णांना सत्ताबदल हवा आहे का व ती प्रक्रिया सांभाळण्याची त्यांची कुवत आहे का, हे प्रश्न बाजूला पडून जत्रेचे युवक परिषदेचे, कॉलेजच्या गॅदरिंगचे वा सांस्कृतिक महोत्सवाचेच होते !) लादले जात आहे. सत्ताबदल म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या चेहऱ्यात बदल नव्हे, त्यांच्या आयडिऑलॉजीत बदल-ही व्याख्याही मागे पडली आहे. या महोत्सवाचा वापर दोन प्रकारे झाला. भाजपा प्रमुख विरोधी पक्ष असल्यामुळे त्यांनी नेहमीप्रमाणे अण्णांच्या सर्व मागण्या मान्य करून टाकल्या (इतरांची बोचकी डोक्यावर घेण्याची त्यांची परंपरा/वैचारिक दिवाळखोरी जुनीच आहे) आणि मनमोहनसिंग व काँग्रेस सरकारला आपले टार्गेट बनवून सर्वत्र कंठशोष चालू ठेवला- ही वरवरच्या सत्ताबदलाची बटबटीत प्रक्रिया म्हणता येईल.

दुसरी प्रक्रिया अधिक सूक्ष्म आणि बेमालूम म्हणावी लागेल. काँग्रेसमधल्या राहुल गांधींच्या समर्थकांनी या आंदोलनाला हायजॅक केले हाते हे प्रथम लक्षात आले नाही; पण राजकारणात मुळीच न मुरलेल्या भोळसट अण्णांनी 'मी फक्त मनमोहनसिंग किंवा राहुल गांधींशी चर्चा करायला तयार आहे' असे जाहिर विधान करून सगळेच पत्ते उघडे पाडले. एरवीही एका रात्रीत देशीर अण्णांचे कट-आऊटस्, पोस्टर्स, बॅनर्स, 'मै अण्णा' म्हणणाऱ्या गांधी (!) टोप्या, दिल्लीकडे माणसांचा ओघ चालू ठेवण्याची साधनक्षमता या साठी लागणारे सर्वात प्रभावी नेटवर्क व साधन श्रीमंती काँग्रेस सोडून दुसऱ्या कोणाकडेही नव्हती, हे स्पष्ट आहे. त्यामुळे मनमोहनसिंग सरकारची अब्रू धुळीला मिळत असताना हा गट पक्षांतर्गत सत्ताबदलाची रणनीती आखत होता. अण्णा-राहुल गांधी यांच्या चर्चेमधून तोडगा निघाला की मनमोहनसिंग आणि इतर वृद्ध मंडळींना दूर सारायला काहीच करावे लागणार नाही. पुन्हा एकदा नेहरू५गांधी घराण्यामधून नवा मिस्टर क्लीन (१९८५-८६ साल आठवून पाहावे) देशाच्या बोकांडी बसणार होता व त्याची/ त्याच्या सहकाऱ्यांची सुमार कुवत चव्हाट्यावर येईपर्यंत सत्ताबदल झाला म्हणजे प्रश्न सुटला; आता नवे युग अवतरेल या भ्रमात कदाचित लोकपाल/जनलोकपाल विधेयक पुन्हा एकदा बासनात जाणारही होते.

सत्ताबदलाचा हा सूक्ष्म डाव दोन कारणांनी उलटला; राहुल गांधीने लोकसभेत अतिशय उतावळे, आक्रस्ताळे भाषण करून त्याच्या समर्थकांची पंचाईत करून टाकली. त्या भाषणाचा आशय वाईट नव्हता पण राहुल गांधी राजीव गांधींइतकाही सुसंस्कृत नाही हे साऱ्या देशाला दिसलेच पण मुख्यतः काँग्रेसमधल्या त्याच्या चमच्यांना दिसले. (दि. ७ सप्टेंबरच्या दिल्ली हायकोर्टाजवळच्या बॉम्बस्फोटातील जखमींना भेटायला राहुल गांधी गेला तेंव्हा जमलेल्य ागदीने त्याची हुर्देवडी केली, हे भारतीय लोकशाहीसाठी सुचिन्हच आहे). त्यातच त्या भाषणात संसदेचे स्थान अण्णांपेक्षा महत्त्वाचे ( हा मुद्दा योग्य होता पण भाषा चूक होती) हे मांडून त्याने 'टीम अण्णां'कडून ( अनेक धेडगुजरी शब्दांत आणखी एक नवीन भर !) चर्चेचे संकेत मिळण्याची/आमंत्रण येण्याची शक्यता नष्टच करून टाकली.

दुसरीकडे मनमोहनसिंग बावळट/दुबळे दिसत असले तरी भोळसट नव्हते; मुरब्बी प्रणव मुकर्जींना हाताशी धरून त्यांनी संपूर्ण लोकसभेलाच चर्चेत ओढले; अण्णांच्या उतावळ्या चमच्यांनी संसदेची असभ्य टर उडवून तिला हास्यास्पद बनवल्यामुळे संसदेचे सार्वभौमत्व जपण्याचा मुद्दा सर्वांना मांडणे भागच पडले. मर्यादा सोडून पक्षीय अभिनिवेश त्या चर्चेत ज्यांनी आणला त्यांचा बालिशपणाही देशाने पाहिला आणि अण्णांची कोणतीही मागणी मान्य करताही सगळे भिजत घोंगडे सभापतींच्या गळ्यात टाकून अण्णांची उपोषणातून सुटका केली. शेवटच्या टप्प्यात मेधा पाटकरांनी महत्त्वाची भूमिका बजावणेही योग्यच होते कारण एकाच मागणीसाठी पुनःपुन्हा अयशस्वी उपोषणे करण्याचा अनुभव त्यांच्याइतका दुसऱ्या कोणाकडे आहे? सत्ताबदल झालाच नाही-मग तो विरोधी पक्षांच्या सोयीचा असो वा काँग्रेसअंतर्गत असो- झालाच नाही; हेही योग्यच झाले कारण तो भ्रष्टाचार आटोक्यात आणण्याचा उपाय नव्हता आणि असणारही नाही !

### तीन

अण्णांनी आजपर्यंत तीन वेळा उपोषणे/आंदोलने केली. प्रथम काही भ्रष्ट मंत्र्यांची चौकशी व्हावी म्हणून, नंतर माहितीच्या आधिकारासाठी आणि आता (जन) लोकपाल विधेयकासाठी. (यांपैकी पहिल्या उपोषणाच्या वेळी मीही तीन दिवस उपोषण केले होते. मात्र मी आळंदीत थांबलो नव्हतो.) पहिल्या आंदोलनामुळे भ्रष्ट मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला (आणि दुसऱ्या मंत्र्यांना भ्रष्ट होण्याची संधी मिळाली !) माहितीचा अधिकार मिळणे आणि प्रत्यक्षात खरी माहिती मिळणे यातले अंतर व्यवस्थेच्या धुरिणांना माहित होतेच; त्यामुळे माहिती-आयुक्तांची नेमकूणक झाली (त्यात काही 'कायम पोलिटिकली करेक्ट' असणारांची वर्णीही लागली.) राज्य पातळीवरच्या दोन आंदोलनांच्या यशस्वितेमुळे अण्णांनी राष्ट्रीय पातळीवरचा प्रश्न हाती घेणे क्रमप्राप्त/अपेक्षित होतेच.

अण्णांच्या (जन)लोकपाल विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट भ्रष्टाचार संपविण्याचे नसून भ्रष्टाचाराच्यांना कडक शासन करण्याचे- मग त्यामधून पंतप्रधानांचीही सुटका नाही- आहे हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजे ही

भ्रष्टाचार घडून गेल्यानंतरची तरतूद आहे! कायदा कडक असला की भ्रष्टाचार करायला बिचकण्याइतकी या देशातली भ्रष्ट व्यवस्था मूर्ख नाही आणि सत्प्रवृत्तही नाही-किंबहुना निबुद्ध माणसे भ्रष्टाचार करूच शकत नाहीतस ती प्रामाणिकपणाच्या मार्गाने जगत असतात ! (या वाक्याचा व्यत्यास खरा नसतो हेही लक्षात ठेवले पाहिजे.) याच विधेयकाला जोडून अण्णांनी तीन मागण्या संसदेसमोर ठेवल्या होत्या. सर्व सरकारी कार्यालयांमधून नागरिकांच्या हक्कांच्या याद्या लावणे- ही मागणी लगेच मान्य व्हावी. कार्यालयाच्या भिंतीवरचा मजकूर रोज वाचून जर भ्रष्टाचार थांबणार असेल तर ते काम सर्व सरकारी कार्यालयात लावलल्या धुरंधर नेत्यांचे फोटो पाहून याआधीच व्हायला हवे होते ! दुसरी मागणी प्रत्येक राज्यात लोकपाल नेमण्याची-सध्या याच मागणीच्या संदर्भात गुजरातमध्ये चाललेल्या चालढकलीमुळे संसद ठप्प करण्याचे उद्योग-काँग्रेसकडून सुरू आहेत. ही मागणीही मान्य होऊ शकेल-मात्र त्यातून लोकपालांची एक राष्ट्रीय उतरंड (hierarchy) तयार होईल; त्यांच्या नेमणुकांसाठी दोन पातळ्यांवर समित्या तयार कराव्या लागतील; त्यात पुन्हा निदान पन्नास टक्के राजकीय प्रतिनिधी असतीलच म्हणजे भ्रष्ट व्यवस्थेचे प्रतिनिधी भ्रष्टाचार मिटवणारी अधिकारी व्यक्ती नेमतील असा अनावस्था प्रसंग ओढवेल ! त्यामुळे ही दुसरी मागणी राबवायला किचकट आहे. शिवय केंद्रातला (जन)लोकपाल व राज्यांमधले (जन)लोकपाल यांचे कायम मतैक्य असेलच असे नाही; दोन वाअधिक राज्यांमधल्या (जन) लोकपालांतही मतभिन्नता असू शकेल. यावर उपाय म्हणून या मंडळींसाठी आचार संहिता निश्चित करावी लागेल; त्यासाझी पुन्हा देश व राज्य पातळीवर समित्या गठित करणे भाग पडेल ! त्या समित्यांवर पुन्हा राजकारणी/नोकरशहा किती व सर्वसामान्य नागरिकांचे प्रतिनिधी किती याबद्दलही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील; सारांश हा मार्ग गोल-गोल फिरत राहणारा आहे.

राज्यांमधलया सर्व सरकारी अधिकाऱ्यांना (जन)लोकपाल विधेयकाच्या जाळ्यात ओढावे अशी अण्णांची तिसरी मागणी आहे- हीदेखील संयुक्तिकच वाटते; मात्र प्रत्येक राज्यात अँटी करप्शन ब्यूरो आहेतच -एकतर ते पूर्णतः अयशस्वी ठरले आहेत हे मान्य करून बरखास्त करावे लागतील किंवा एकाच कामासाठी दोन समांतर व्यवस्था तयार होऊन त्यातील अधिक शक्तिमान कोण असा प्रश्न उपस्थित होईल-त्यासाठी पुन्हा नवा कायदा करावा लागेल. काही वेळा एका यंत्रणेने निर्दोष ठरलेला अधिकारी दुसऱ्या यंत्रणेकडून दोषी ठरू शकेल! व्यक्तिशः माझी अशी खात्रभ आहे की भ्रष्टाचार विरोधी कारवाई करण्याचे सर्व कायदे अस्तित्वात असताना इतका भ्रष्टाचार करणारी मंडळी नवा कायदाही-मग तो कितीही कडक असाल तरी -पचवून आपले भ्रष्ट ध्येय कधीही सोडणारनाहीत. त्यांच्या इतकी अविचल ध्येयनिष्ठा दुसऱ्या कोणाकडे आहे?

पंतप्रधानपदही (जन)लोकपाल विधेयकाच्या कक्षेत असावे ही मागणी शुद्ध असली तरी धोकादायक आहे- अव्यवहार्यही आहे. आपल्या पोरकट लोकशाहीमध्ये तिचा गैरवापर होण्याची जास्त शक्यता आजतरी वाटते. अमेरिकन राज्यघटनेमध्ये प्रत्यक्ष राष्ट्राध्यक्षांची इंपीचमेंट करण्याची तरतूद आहे हे खरे; मात्र इंपीचमेंटच्या कड्यापर्यंत राष्ट्राध्यक्षाला घेऊन जायचे आणि नंतर त्याला राजीनामा द्यायला भाग पाडून राष्ट्रीय राजकारणातून बाजूला काढायचे हेच तंत्र रीगन आणि क्लिंटन यांच्याबाबतील वापरले गेले. व्यक्तीला शासन झाले पण पदाची प्रतिष्ठा कायम राहिली. असासंयम दाखवणाऱ्या जबाबदार लोकप्रतिनिधींच्या भरवशावरच अमेरिकन संसदेमध्ये इंपिचमेंटच्या चर्चा पार पडतात. आपल्या संसदेत आजतरी अशांची संख्या फारच मर्यादित आहे आणि ते वेगवेगळ्या पक्षांत विखुरले आहेत. शिवाय माझा प्रतिस्पर्धी पंतप्रधान झाला म्हणून (जन)लोकपालाकडे एक अर्ज करून त्याच्या पाठीमागे चौकशीचे शुक्लकाष्ट परस्पर तिसऱ्या व्यक्तीकडून लावून देण्याचे चातुर्य आपल्या राजकारण्यांमध्ये शिगेला पोचलेले आहेच-काही पे निगाहे- कहीपे निशाना ! यात सुक्याबरोबर ओले जळेल. कदाचित असेही होईल की (जन)लोकपालाने दोषी ठरवलेला मुख्यमंत्री/पंतप्रधान, 'ही कारवाई राजकीय हेतूंनी प्रेरित होती, मी जनतेच्या कोर्टात जाऊन न्याय मागू इच्छितो' म्हणत स्वतःचा नवा पक्ष काढून निवडणूक लढवेल-बहुधा निवडूनही येईल; कारण असे बिनधास्त, नंगे पुढारीही मतदारांना आवडतात-हीरोपेक्षा व्हिलनच जास्त लोकप्रिय असतो- तो व्हिलन आहे हे माहीत असूनही!

सर्वोच्च पदावरची व्यक्ती जर स्वच्छ असली तर तिने कोणत्याही चौकशीला सामोरे जायला का घाबरावे असे एक बिनतोड वाटणारे वाक्य वारंवार कानावर येते पण ही भूमिका बालीश आहे. भ्रष्ट व्यक्ती सर्वोच्च काय किंवा सामान्य काय कोणत्याच पदापर्यंत पोचू शकणार नाही, अशी संस्कृती निर्माण करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. सध्या सत्ताधाऱ्यांबद्दलचा तिरस्कार पराकोटीला पोचल्यामुळे या मागणीमध्ये काही 'मर्द' (macho) पणाचा भासही होतो परंतु या पद्धतीने आपण सर्व लोकशाही व्यवस्थेचा पायाच खिळखिळा करून टाकू याचे भान राहात नाही. रामशास्त्री बाण्याचे किंवा थॉमस बेकेट सारखे न्यायाधीश-आर्चबिशप इतिहासामध्ये अपवाद होते, लोकपालपदी बसण्यासाठी त्यांच्यास सारख्याच व्यक्ती हव्यात- तशा व्यक्ती सापडणे सध्या दुरापास्तच आहे कारण ती व्यक्ती नुसती स्वच्छ, तळमळीची (जसे अण्णा स्वतः असू शकतील) असून भागणार नाही, भारतीय संसदीय लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या राज्य कारभाराच्या गाड्याचे सखोल ज्ञान व त्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता असल्याखेरीज (जन)लोकपालांना एवढी मोठी जबाबदारी निभावणे अशक्य होईल! तेव्हा आजच्या घडीला तरी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभेचा सभापती, संपूर्ण सेनादलाचा प्रमुख, सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश अशा काही पदांना या बिलाच्या कक्षेमधून वगळेच श्रेयस्कर ठरेल.

एकेकट्या व्यक्तीने स्वतःच्या मानसिक, बौद्धिक, शारीरिक सामर्थ्यांच्या जोरावर धर्मपंथ, तत्त्वज्ञान, लष्करी सामर्थ्य यांच्या माध्यमातून इतिहास घडवण्याचे/बदल्याचे दिवस मध्ययुगात होते- आजचे युग प्रभावी यंत्रणा (system) निर्माण करून त्या राबवून त्या सतत निर्दोष ठेवण्याची तरतूद करून समाजाचे नियमन करण्याचे व त्यातून उत्कर्ष साध्याचे आहे, हे अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी, स्तुतिपाठकांनी समजून घ्यावे. अण्णांचा या क्षेत्रामधला अनीव मर्यादित असला तरी केवळ तळमळ आणि उपोषणाची हट्टाग्रही रणनीती वापरून ते यशस्वी होतील, या भ्रमामधून बाहेर यावे; निदान मेधा पाटकारांप्रमाणे आपली उपोषणे ही जनतेच्या, माध्यमांच्या सवयीची बाब होऊन त्यांचे गांभीर्य कमी होण्याची वा सर्वोच्च न्यायालयाकडून समज/कानपिचक्या ऐकून घेण्याची केविलवाणी स्थिती अण्णांनी ओढवून घेऊ नये.

एक प्रश्न अण्णांनी स्वतःला विचारावा-सध्याचे सत्ताधारी आपले शत्रू आहेत, हे जनतेला पटेल का? जनतेनेच त्यांच्या हाती सत्ता दिली

होती ना? अण्णांना गांधीचा अवतार म्हणून नाचणाऱ्यांनी असाच एक प्रश्न स्वतःला विचारावा- स्वतः गांधी हयात असते तर लोकनियुक्त स्वदेशी सरकार विरुद्ध त्यांनी उपोषण रूपी नैतिक दहशतवादाचाच मार्ग स्वीकारला असता? तसे सरकार यायच्या आधीही-पण सरकार भारतीय होते म्हणून-गांधी फाळणीविरूद्ध उपोषणाला बसले नव्हते !

**चार**

पंतप्रधान, घटक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्र व राज्य सरकारांमधील इतर मंत्री, मंत्रीपदाचा दर्जा असणाऱ्या पदांवरचे राजकारणी, अगणित महामंडळांचे अध्यक्ष आणि उच्चपदस्थ सरकारी अधिकारी यांना धडा शिकवून भ्रष्टाचाराचे उच्चाटन करता येईल, ही रणनीती आकर्षक नक्कीच आहे. माध्यमेही अहमहमिकेने अशी रणनीती उचलून धरतात. मोठ्या माणसांवर प्रेम करणे आम जनतेला आवडते त्याचप्रमाणे मोठ्या माणसांना खाली खेचण्यातला आसुरी आनंदही जनतेला हवा असतो- घाण खावी तर हत्तीची खावी ! नैतिक सत्तेच्या स्वघोषित प्रतिनिधींची तर आपण स्वतःसाठी काही मागत नसल्यसामुळे जनतेच्या वतीने कोणासही हटकण्याची सनदच आपल्याला मिळाली आहे अशी शंभर टक्के खात्री असते. भ्रष्ट लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याच्या अधिकाराची मागणीदेखील याच मंडळींकडून केली जाते. त्या मागणीसाठी सहसा मतदानाला न जाणाऱ्या नागरिकांचा विशेष आग्रह दिसून येतो. नकारात्मक मतदान नोंदवून घ्यावे अशीही एक उपमागणी हाच वर्ग करत होता-मात्र तशी नोंद व्हावी म्हणून रांगेत उभे राहून मतदान करावेच लागेल ही शक्यता लक्षात आल्यावर या मागणीमधील हवा निघून गेली. भ्रष्ट व्यवस्थेच्या शिखरावर जोरदार आघात केले म्हणजे आपोआप ते आघात खालपर्यंत झिरपतील आणि जर पंतप्रधानाची गय केली जात नाही तर माझ्यासारख्या किरकोळ कारकून/अधिकाऱ्याने स्वच्छ प्रशासनाचा मार्ग धरणेच श्रेयस्कर अशी मानसिकताही तयार होईल, असा भोळसट आशावाद या सर्व मागण्यांमधून प्रकर्षाने जाणवतो.

लोकप्रतिनिधी वा सत्ताधारी यांना लोकशाहीत खरे शासन एकाच मार्गाने होऊ शकते- त्यांच्या हातून सत्ता जाणे व निवडणुकीत त्यांचा सपाटून पराभव होणे. आणिबाणी नंतरच्या निवडणुकीत इंदिरा/संजय यांना असा धडा मिळला होता. त्याऐवजी परत बोलावण्याची व्यवस्था आणण्याची गरज नाही. साधारण ५ वर्षांची मुदत एका लोकप्रतिनिधीच्या वाट्याला येते. त्यात त्याने भ्रष्टाचार करायचा असेल तर निदान वर्ष-दोन वर्षे जातील; ते प्रकरण उघडकीस येण्यात काही महिने जातील, मग माहिती गोळा करणे, तिची शहानिशा करणे आणि त्याच्या परतीची मागणी करणे ही प्रक्रियाही चटकन संपणारी नाही. ही मागणी करण्याचा अधिकार कुणाला द्यावा- मतदानाचा तिटकारा करणारांना अशी मागणी करण्यचा अधिकार का द्यावा, एका मतदारसंघातील किती टक्के मतदारांचा अशा मागणीला अधिकृत पाठिंबा असला पाहिजे असे इतरही किचकट मुद्दे या मागणीच्या कार्यवाहीमध्ये उपस्थित होणारच. शिवाय एकमेकांचा काटा काढण्यासाठी प्रतिस्पर्धी पक्षातले-काही वेळा तर एकाच पक्षामधले५ राजकारणी वा एकाच खात्यातले सरकारी अधिकारी अशा कायद्याचा गैरवापर करणार नाही, याची हमी कोणीच घेऊ शकणार नाहीत. म्हणजे पुन्हा नैतिक सत्तेचे प्रतिनिधी उपोषणाचा मार्ग अवलंबून मूळ प्रश्नाची धार बोथट करणार-कारण आठवडाभर उपोषण झाले की मूळ प्रश्न बाजूला पडतो आणि उपोषकाच्या (हा नवा शब्द रूढ करावा? सध्या तरी तो वारंवार वापरावा लागण्याची चिन्हे दिसत आहेत) जिवाची काळजी, मग पाठिंबादर्शक साखळी उपोषणे, प्रार्थना, भक्तिसंगीत, मेणबत्त्या इत्यादि प्रतिकांचा सुळसुळाट होतो. भ्रष्टाचार निर्मूलनाच्यासाठी सुरू झालेल्या आंदोलनामधून बुद्धीचे पूर्ण उच्चाटन आणि भावनाशील आवाहनांचा प्रभाव पडून सिंह वाचला पण गड होता तिथेच राहिला! आंदोलनाच्या रेट्यामधून अधूनमधून भ्रष्टाचाराचे शिखर छाटले जाईलही-पण जोवर पाया कायम आहे, तोवर पुनःपुन्हा शिखर तयार होईल ! 'की तोडिला तरू फुटे आणखी भराने' ही कवितेची ओळ दुर्दैवाने या काटेरी झाडालाही लागू आहेच. जनक्षोभाच्या आकस्मिक महापुरात क्वचित मोठी झाडे उखडली जातील, काही वाहूनही जातील पण चिवट लव्हाळ्यांचे काय?

**पाच**

आपल्या देशातली भ्रष्टाचाराची लव्हाळी चिवट तर आहेतच; प्राचीनही आहेत. किंबहुना त्यांची प्राचीनता हा त्यांच्या चिवटपणाचा पुरावाच आहे. शाकुंतल नाटकातल्या एका प्रवेशात रक्षकाला लाच दिल्याचा उल्लेख आहे. कौटिल्याने सुद्धा समाजात भ्रष्टाचार असणारच हे गृहीत धरून करविषयक कायदे सोपे ठेवण्यावर आणि ते कायदे राबवणाऱ्यांच्या वैयक्तिक संपत्तीवर लक्ष ठेवण्याचा उपाय सुचवला होता. आजही याच दोन मागण्या केल्या जातात ही कौटिल्याचा बुद्धिमान दूरदृष्टीची साक्ष तर आहेच पण इतक्या प्राचीन काळातही भारतात एक भरभराटीला आलेली अर्थव्यवस्था वर्धिष्णु होती याचेही ते गमक आहे; उत्पादन होते, व्यापार होता, संपत्ती निर्माण होत होती म्हणूनच कर वसुली करता येत होती. अलीकडे एका ऑस्ट्रेलियन संशोधकाने भ्रष्टाचाराचे मूळ जनुक भारतीय असल्याचे दाखवले आहे; यामुळे बिचकून जाण्याचे, वाईट वाटून घेण्याचे कारण नाही कारण समाधान-आनंद यांचीही मूळ जनुके भारतीयच होती. गरीबातल्या गरीब भारतीय माणसाच्या चेहऱ्यावरच्या हास्याचे कोडे अ-भारतीय संशोधकांना सुटले नाही. तेही याच कारणामुळे. नव्या खगोल-भूशास्त्रीय व वैज्ञानिक संशोधनामधून भारतीय समाज हाच

**भ्रष्टाचार निर्मूलनाच्यासाठी सुरु झालेल्या आंदोलनामधून बुद्धीचे पूर्ण उच्चाटन आणि भावनाशील आवाहनांचा प्रभाव पडून सिंह वाचला पण गड होता तिथेच राहिला! आंदोलनाच्या रेट्यामधून अधूनमधून भ्रष्टाचाराचे शिखर छाटले जाईलही- पण जोवर पाया कायम आहे, तोवर पुनःपुन्हा शिखर तयार होईल! 'की तोडिला तरू फुटे आणखी भराने' ही कवितेची ओळ दुर्दैवाने या काटेरी झाडालाही लागू आहेच. जनक्षोभाच्या आकस्मिक महापुरात क्वचित मोठी झाडे उखडली जातील, काही वाहूनही जातील पण चिवट लव्हाळ्यांचे काय?**

जगात सर्वात प्राचीन व सुखी समाज होता हे सिद्ध झाले आहे; त्यामुळे सर्वच बऱ्यावाईट जनुकांचे मूळ हे भारतीयच असणार. (जनुकांची चांगली-वाईट अशी वर्गवारी/प्रतवारी करता येईल का, हा अडचणीचा मुद्दा सध्या बाजूला ठेवू.) इ.स. १ मध्ये भारताची लोकसंख्या दहा कोटी होती- ही सर्व प्रजा सामाजिक विषयमतेने पछाडलेली असली तरी खाऊनपिऊन सुखी होती, सण-समारंभ उत्साहात साजरे करत होती. स्वत:ची गरज भागवून व्यापार करण्याइतका वाढावा (surplus) या समाजाकडे होता. संपत्ती मिळवण्यासाठी जीव पणाला जावून सातासमुद्रापार जाण्याची गरजच नव्हती हेही सर्वमान्य झालेले आहे.

मग अशा समाजात भ्रष्टाचार कुठून शिरला ? लोकसंख्या मोठी, प्रदेश विस्तार मोठा, जमीनीची उत्पादकताही (त्या काळात) मोठी अशा समाजात श्रम न करताही आपल्याला जगता येईल असा विचार करणारी चतुर माणसेही असणारच होती. ज्या क्षणी पुरोहित आणि रक्षक हे अनुत्पादक वर्ग तयार झाले त्याक्षणीच भ्रष्टाचाराचे बीज रोवले गेले. चातुर्वर्ण्यामधले वैश्य आणि शूद्र यांना श्रम करणे भागच होते; त्यातही शूद्रांना सर्वाधिक! ज्याक्षणी संपत्ती निर्माण करणाऱ्या वर्गावर तिचे संरक्षण करणाऱ्या आणि रक्षकांची भलावण करून त्यांच्या दंडसत्तेला ईश्वरी आधार असल्याची बातवणी करणाऱ्या पुरोहित वर्गाची सत्ता प्रस्थापित झाली त्याचक्षणी भ्रष्टाचाराला सुरवात झाली. कमी श्रमात जास्त मिळवणे ही लाभ-कांक्षा जर योग्य मानली तर शून्य श्रमात सर्व मिळवणे हीच सर्वाधिक सुखाची व्याख्या ठरणेही ओघानेच येते.

रक्षक वर्गाला अधूनमधून तरी संघर्ष करावा लागला असेल, पुरोहित वर्गाला मात्र केवळ अधिकाधिक बौद्धिक श्रम करावे लागले असतील. असे श्रम या वर्गाने श्रम करणारांची उत्पादकता वाढावी म्हणून कधी केले नाही, ही ऐतिहासिक शोकांतिका होती. उलट जे कांही उत्पादन होईल त्यामधून आपली पोळी सतत पिकली पाहिजे एवढाच या वर्गाचा ध्यास होता. परमेश्वर नावाचे सर्वव्यापी/सर्वशक्तिमान गारूड श्रमिकांच्या गळी उतरवून पुराहित वर्ग देव आणि शूद्र यांच्यामधला दलाल बनला. त्याने दक्षिणा उकळायला सुरूवात केली. रक्षक वर्गाची गरज पुराहितांच्या मानाने जास्त असल्यामुळे त्याने व्यापार व शेतकरी यांच्यावर कर लादले; त्यातच व्यापारात नफा मिळवायचा असेल तर खरेदीची किंमत कमी ठेवण्याची दक्षता व्यापाऱ्यांनी घेणे हा अर्थशास्त्राचा नियमच होता. परिणामी सर्वाधिक उत्पादक वर्गावर पुराहित वर्गाची दक्षिणा, रक्षक वर्गाचे कर, व्यापारी वर्गाची नफेखोरी या तिन्हींचा बोजा पडून त्याची गरीबी वाढती राहिली. तिच्यामधून बाहेर पडण्यासाठी परत पुरोहित आणि रक्षक वर्गाला संतुष्ट ठेवून आपला उत्कर्ष जमल्यास साधून घेणे एवढा एकच मार्ग उपलब्ध होता. दलालांनी लादलेल्या गरीबीतून बाहेर पडण्यासाठी दलालांचीच मिनतवारी करणे भाग होते. आजही कायदे करणारे, कायदे राबवणारे, रक्षण करणारे आणि न्यायनिवाडा करणारे दलाल'च (त्या क्रमाने) भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले दिसतातच.

शारीरिक श्रम करून शूद्रांच्यात सामील होण्यापेक्षा पुराहित व रक्षक वर्गांची मर्जी संपादन करून शोषणाचे ओझे शूद्रांवर टाकणे जास्त सोपे आहे, हे ओळखण्याइतकी चतुराई व्यपाऱ्यांकडे नेहमीच होती. त्यामधून या तीन वरिष्ठ वर्गांचे संगनमत असणे राज्य-अर्थकारण (political economy) साठी अत्यावश्यक बनले. पण हे गठबंधनही आजच्या राजकीय गंठबंधनाइतकेच तकलादू होते- अधून मधून व्यापाऱ्यांना असुरक्षित वाटायला लावण्याची चापलूसी पुरोहित आणि रक्षक करतच होते. त्यातूनच 'आम्ही तुम्हाला लुटत नाही, उलट तुमचे दैवी कोप आणि शत्रू यांच्यापासून रक्षण करतो, हे व्यापारी नफा उकळण्यासाठी तुम्हाला लुटतात' अशी श्रमिकांची दिशाभूल करणे आणि व्यापाऱ्यांना सतत असुरक्षित वाटायला लावून त्यांच्याकडून देवळांना देणग्या आणि राज्यकारभारासाठी (सवडीने फेडायचे) कर्ज मिळवणे हे नवे कारस्थान उभे राहिले. त्याचा बोजा पुन्हा कष्ट करणाऱ्या वर्गावरच पडला. एवढे झाल्यावर कष्ट करून उत्कर्ष होत नाही, प्रामाणिकपणा आणि दारिद्र्य ही सख्खी भावंडे आहेत, संपत्ती मिळवायची असेल तर भ्रष्ट सत्ताधाऱ्यांना सामील होणे, त्यांना भ्रष्टाचारात मदत करणे, लुटण्या योग्य सावज त्यांच्याकडे पाठवत राहणे हाच मार्ग आहे, अशी विपरीत मूल्यव्यवस्था निर्माण झाली, आजही असे दलाल समाजात भक्कम पाय रोवून आहेत- काम करणारा माणूस (---) अशी प्रतिमा असल्यामुळे त्यांना प्रतिष्ठा आहे. इतकी की कोणतीही जाहिरात न करताही त्यांच्याकडे गरजू माणसांचा अखंड ओघ चालूच असतो.

हे दलाल परमेश्वराइतकेच सर्वव्यापी, सर्व शक्तिमान असतात. ते सल्ला देतात, तुमचे अर्ज भरून देतात, तुमचाच अर्ज पुढे सरकावा याच्या क्लुप्त्या लढवतात. बदल्या करून देतात- झालेल्या बदल्य रद्द करवून देतात. रिकाम्या प्लॉटवर झोपडपट्टी वसवणे किंवा वसलेली झोपडपट्टी पळवून लावणे ही दोन्ही कामे सारख्याच कार्यक्षमतेने करतात, कॉलेज काढून देणे, कॉलेजात स्टाफ नेमणे, प्राध्यापकांची वर्णी लावणे, तिथे विद्यार्थी आणणे, त्यांच्याकडून प्रवेशासाठी देणग्या उकळणेही त्यांना जमते. पोलीसांच्या खऱ्या-खोट्या पंचनाम्यावर साक्षीदार म्हणून सही कराण्याला हे कायमच तयार असतात म्हणूनच हवा तसा पंचनामा लिहिला जाण्याची व्यवस्थाही करू शकतात, राजकीय पक्षात प्रवेश, पद, निवडणुकीचे तिकीट मिळवून देणे यांच्या हातचा मळ असतो, तुमच्या पक्षांतर्गत प्रतीस्पर्ध्याविरुद्ध माध्यमांना उठवून त्याची भंबेरी उडवतात किंवा विरोधी पक्षियांना माध्यमांचा वापर करून दे माय धरणी ठाय करू शकतात. रेल्वेचे आरक्षण (दलालांची मदत घेऊनच झालेल्या) आमदार-खासदाराकडून मिळवून देतात, शेतकरी असाल तर बँकेकडून तुमच्यावर जप्ती येऊ नये हा चमत्कारही घडवू शकतात. सरकारी परवाने हे तर यांचे हक्काचे क्रीडांगण असते. कलाकार-नटांना योग्य निर्माता मिळवून देणे, क्रिकेटपटूंना प्रायोजकाच्या किंवा जाहिरातीच्या ऑफर्स आणणे, नवीन व्यावसायिकांना क्लाएंटस् पुरवठा करणे, निरनिराळे पुरस्कार बेताच्या योग्यतेच्या व्यक्तींच्या हवाली करणे, त्या त्या काळात त्या हीरोची व तुमची गाठ घालून देणे, आरटीओ मधून तुम्हाला हवा तो वाहन नंबर प्राप्त करणे... ही साधी यादी झाली. दलालांच्या सर्वदूर संचाराचा, सुरस आणि चमत्कारिक उचापतींचा छडा लावणे माझ्या आवाक्या बाहेरचे आहे.

काही वेळा एक अस्वस्थ करणारा प्रश्नही मनात येतो- हे दलाल जर सर्वव्यापी असतील तर ते दलाली नष्ट करण्याच्या लढ्यातही घुसणार नाहीत काय? अगदी अण्णा हजारेंच्या भोवती स्वत:ला कोणताही जनाधार नसणाऱ्यांची जी टोळी जमाती आहे तिचा अजेंडा काय आहे?

**क्रमश :**

**विनय हर्डीकर**
vinay.freedom@gmail.com

■■

# सिंदखेडच्या ओव्यांमधील जिजाऊ

**[ कावऱ्या किनऱ्या आवाजात जात्याची घरघर तांबडं फुटतानांच्या वातावरणात झिरपू लागते. जात्याच्या चालीवर ओव्यांचे साज चढतात.**
***सकाळच्या पहारी सडा गाईच्या शेणाचा / मपल्या दारावून रथ जाई नारायणाचा //***
**सुर्यनारायण उगवले आहेत. सगळीकडं गुलाल टाकावा तसा कोवळा सुर्यप्रकाश पसरला आहे. सगेसोयरे, गुरंढोरं, शेतीवाडी यातच आपलं जीवन सामावून टाकलेल्या शेतकरी कुटुंबातल्या मायाबहिणी. इथल्या मातीचे, इतिहासाचे संस्कार गर्भात असल्यापासूनच त्यांच्यावर झालेले. इथल्या सांजवातीचा गंध रात्रंदिवस राबणाऱ्या मनाला लागलेला. या मायबहिणींचे मन जात्यावर दळताना, धामाचं पीठ होताना मातीआडच्या बियाला कोंभ फुटावे तसे अंकुरते. ]**

सिंदखेडराजा, राहेरी या आमच्या गावापासून पंधरासोळा मैलांवरचं गाव. सिंदखेडराजा म्हणजे शिवाजी महाराजांचं आजोळ. जिजाबाई या मूळ सिंदखेडराजाच्या लखुजी जाधवांच्या कन्या. ही माहिती साऱ्यांबरोबर मलाही होती. असा हा सिंदखेडराजा म्हणजे आपला तालुका आहे. याचाही गर्व झाला. थोडा अहंकारही, की आपण जिजामातेच्या कुलातले. म्हणजे आपण किती भाग्यवान आहोत.

सिंदखेड आणि आसपास, राजा या नावानं शेवट होणारी अनेक गावं. किनगाव राजा, आडगाव राजा, देऊळगाव राजा, पिंपळगाव राजा. या गावांच्या नावात हे राजेपण कुठून आलं? या गावात राजे, जाधव या आडनावाची खूप मंडळी राहत असलेली. इतर मराठ्यांपेक्षा यांचं वागणं थोडं भारी, म्हणजे आपण आजही राजे आहोत अशा प्रकारचं. तसं पाहिलं तर हा सारा दुष्काळी परिसर. कुठल्याही पातळीवर कसल्याही प्रकारची समृद्धी दिसेल असं काही नाही. मराठवाड्याला जोडून असणारा बुलडाण्याचा सर्वांत शेवटचा विदर्भातला तालुका. त्यामुळं धड मराठवाड्याचाही नाही आणि विदर्भाचाही. सगळीकडं पसरलेला कुणबाऊ समाज. स्वत:ला कुणबी म्हणण्याची लाज वाटणारा. त्यांची नावं राजे, जाधव, देशमुख अशी असली तरी उद्याची खाण्याची काळजी वाटावी अशी एकूण परिस्थिती; पण इतिहासातून जो एक प्रकारचा ताठा येतो तो शतकानुशतके कायम असतो. काळ बदलतो. परिस्थिती बदलते. माणसं येतात जातात. राज्याचे स्वरूप बदलते. निसर्ग बदलतो. सहसा निसर्गाचा बदल हा अवनतीच्याच दिशेनं असतो. बेमुर्वतपणानं केलेलं निसर्गाचं शोषण हेच त्याचं मूळ कारण असतं.

इतिहासाचं हे ओझं वाहत वाहत आपण इथवर आलो आहो आणि पुढेही जाणार आहोत. त्यामुळं वर्तमान समृद्ध होण्यास किती मदत होणार आहे, हे मात्र सांगता येणार नाही.

प्राथमिक शाळेत असताना अक्कांबरोबर सिंदखेडराजाला आलो होतो. किनगावराजाच्या नूतन शाळेचे सराफ नावाचे हेडमास्तर मूळचे सिंदखेडचे. त्यांची मुलगी ही अक्काच्या वर्गात होती. त्या साऱ्या मैत्रीणी सिंदखेडला गेल्या. लहान भाऊ म्हणून मीही अक्कांबरोबर. त्यावेळी सिंदखेडचं एक खूप जूनं ऐतिहासिक चित्र समोर आलेलं. रामेश्वराचं लखुजी राजाच्या किंवा त्याही आधीच्या काळातलं मंदीर, काळा कोट, पुतळा बारव, लखुजी जाधवांचा मोठ्ठा वाडा, त्याची तळघरं, जिजामातेचा जन्म झाला ती वर छत नसलेली नुस्त्या भिंती उभ्या असलेली खोली. जिजाबाईनं लहानपणी शहाजीराजांवर गुलाल फेकला ती खोली, रंगमहाल, गावाबाहेरच्या न्हावारोडवरचा जुना तलाव, त्याच्या काठावरची एका मोठ्या दगडी घरातली विहीर, असं बरंच काय काय मनावर कोरल्या गेलेलं. त्यावेळीही तळ्यातलं पाणी विहिरीतून पाटानं तळ्याखालच्या शेतांना सोडलेलं. लखुजी जाधवांच्या काळातली म्हणजे चारशे वर्षांपूर्वीची ही पाणी देण्याची यंत्रणा अजूनही जिवंत होती. एखाद्या चिरेबंदीसारखा काळाकोट अजूनही ताठ उभा होता. वाड्यातलं वैभव कित्येक शतकांपूर्वी ओसरलं तरी वाडा उभा, जिवंत वाटत होता. आत गेलं की, नकळतपणे मनही तीनशे चारशे वर्षे मागं गेलेलं.

रात्रीमागून रात्री येतात. काळ कोणासाठी थांबत नाही. फटफटायला लागतं आणि रात्रीच्या पोटातून दिवसाची सुरुवात होते. कावऱ्या किनऱ्या आवाजात जात्याची घरघर तांबडं फुटतानांच्या वातावरणात झिरपू लागते. जात्याच्या चालीवर ओव्यांचे साज चढतात.

**सकाळच्या पहारी सडा गाईच्या शेणाच्या**
**मपल्या दारावून रथ जाई नारायणाचा**

सुर्यनारायण उगवले आहेत. सगळीकडं गुलाल टाकावा तसा कोवळा सुर्यप्रकाश पसरला आहे. सगेसोयरे, गुरंढोरं, शेतीवाडी यातच

आपलं जीवन सामावून टाकलेल्या शेतकरी कुटुंबातल्या मायाबहिणी. इथल्या मातीचे, इतिहासाचे संस्कार गर्भात असल्यापासूनच त्यांच्यावर झालेले. इथल्या सांजवातीचा गंध रात्रंदिवस राबणाऱ्या मनाला लागलेला. या मायबहिणींचे मन जात्यावर दळताना, घामाचं पीठ होताना मातीआडच्या बियाला कोंभ फुटावे तसे अंकुरते.

**गाव सिंदखेड दुरून दिसे चौकेबंदी**
**शहाजीराजा खेळे गुलाल हवेली मंदी ।**
**गाव सिंदखेड दुरून दिसतं लटक**
**जाधव भोसल्याची कोण्या रस्त्याला बैठक ।**
**गाव सिंदखेडदुरून दिसे हिरवगार**
**माळाईच्या तुळशिला आता बार ।**
**सिंदखेड सिंदखेड दुरून दिसे पवळा**
**चौकामंधी उभी जिजा नेसली चंद्रकला ।**
**सिंदखेड सिंदखेड गावा आली भरती,**
**सांजच्या येळला रामेश्वराला आरती ।**

आक्का बरोबर खूप लहानपणी सिंदखेडला गेलो होतो, त्या आठवणी मनावर कायम कोरलेल्या. बीएसाठी जालन्याला प्रवेश घेतला. वाचनालेखनाशी संपर्क आला. एका दिवाळीच्या सुटीत गावी आलो तेव्हा काय वाटलं कुणास ठाऊक. वही पेन घेतला आणि अनेक गावांतून शाळेत शिकत असणाऱ्या मित्रांच्या ओळखीने फिरलो. रात्रीला बायकांच्या गराड्यातून घरोघर फिरलो. त्या काय काय म्हणतात, गातात ते लिहून घेतलं. खरं म्हणजे या भोळ्या भाबड्या, शेतीवाडीत रात्रंदिवस राबणाऱ्या बायकांचा इतिहासाशी काय संबंध? आपलं आयुष्य त्यांनी कायम मातीशी जोडलेलं, तरीही त्यांच्या ओव्यांतून चारशे वर्षांपूर्वीचं पाणी वाहत आलेलं.

**सिंदखेड गावामंदी पाखराला नव्हतं पाणी**
**जाधवरावांनी हौद बनवले दोन्ही**

हा कुठेतरी राजानं पिण्याचं पाणी प्रजेला पुरवलं याचा संदर्भ. राजाच्या दिमतीला भरपूर सैन्य, वाडे, महाल, रंगमहालाची माहिती एक माऊली सहजपणे आपल्या ओवीतून देते. लग्नाची बोलणी जाधव आणि भोसल्याची कोणत्या वाड्यात याची ओढ तिला लागली आहे. चौकामध्ये उभी असलेली, चंद्रकला नेसलेली जिजाही तिला दिसत आहे.

शाळेत शिकत असताना माझा एक मित्र होता. उंबरद हे त्याचं गाव. उंबरदची सारी पोरं नूतन शाळेत शिकायला येत. रशिद हे त्याचं नाव. रशिदशा बापूशा फकीर. दहाविची परीक्षा जवळ आली. तशी मास्तरांना अभ्यास करण्यासाठी एक खोली आम्ही मागून घेतली. नूतन शाळा ही गावापासून दोन मैल. उंबरदपासूनही तेवढीच. किनगावराजाची ही शाळा एकदम माळाच्या करपाडाला. दोन्ही बाजूनं दोन ओढे, एका बाजूनं थोडी लांब नदी. मास्तरांनी एक खोली आम्हा सात-आठ पोरांना दिली. आम्ही तिथंच मुक्कामी राहू लागलो. त्या खोलीत बरंचसं अडगळीतलं, वाया गेलेलं सामान. एका कोपऱ्यात फाटलेल्या नकाशाचा मोठा ढिग. वर नुस्ती धुळ साचलेली. त्यातला एकेक नकाशा मी उकलून पाहू लागलो. पातळ कापडावर नकाशाच्या चिकटवलेल्या कागदाचे पापुद्रे उडून गेलेले. जगातल्या आदवासी जमातीवरचा एक नकाशा बऱ्यापैकी होता. त्यावर पिग्मी लोक. त्यांचं इग्लू नावाचं घर, बर्फाचं घर. आम्ही फक्त आईसकांडीचं रंगीत बर्फ पाहिलेलं. गवताळ प्रदेश, सदाहरीत अरण्याचे प्रदेश, अमेरिका खंड, त्यावरचे ते रेड इंडियन्स. रशिदच्या भाकरीच्या गठ्ठा सकाळी यायचा तोच संध्याकाळी आणि दुसऱ्या दिवशी न्याहारीला कामी पडे. काळ्या रंगाचा, डोक्यावर कायम तिरपी टोपी असलेला रशिद मला रेड इंडियन्ससारखा वाटत असलेला. या फाटक्या नकाशातली काही चित्र मी ब्लेडनं फाडून घरी नेली. मधल्या काळात रशिदचा संपर्क तुटला. तो दहावी नापास होऊन घरी रोजमजुरी करू लागला. मी बीएला गेलो. ओव्या गोळा करायला उंबरदला रशिदकडे गेलो तर हा पठ्ठ्या पार ढोरक्या झालेला. टोपी तशीच. चड्डी ऐवजी पायजमा. मी भेटलो तर त्याचे डोळे भरून आलेले. रात्रीला मग तो गावातल्या ओव्या म्हणणाऱ्या बायांकडे मला घेऊन गेला.

**सिंदखेड गडावरी दिवा जळतो लोण्याचा**
**असा पडला उजेड जिजाऊच्या लेण्याचा**
**सिंदखेड गडावरी दिवा जळतो तुपाचा**
**असा पडला उजेड जिजाऊच्या रूपाचा**

ज्यांच्या घरात कोरड्याशात टाकायलाही तेल मोठ्या कष्टानं मिळायचं अशा मायमाऊल्या ओव्या म्हणत होत्या. जात्याच्या पाळूत ज्वारी टाकली की पीठ होऊन बाहेर येतं तसं दुःख गाळ होऊन गेलेलं. कंदिलाच्या मिणमिण उजेडात या बाया शोधत होत्या, हळवे सुखाचे क्षण, पाखडलेल्या ज्वारीसारखे. दुःखाला, कष्टाला मुरड घालून. जात्यावरची ओवी, निंदताना शेतातली ओवी, माहेरच्या वाटेची, सासरच्या तापाची ओवी, चारजणी मिळून रात्रीला थोडा विसावा म्हणून ओट्यावर बसून गायीलेल्या ओव्या. साऱ्यांची जातकुळी एकच. अवघ्या जन्माचा भार मूठभर दाण्याच्या ओंजळीत पेलून धरल्यासारखा.

**हौस गं मोठी सिंदखेडीला जायाची**
**जिजाऊ मंदिरी ताक करून पाह्याची**
**देवळगावापासून सिंदखेडला जायाचं**
**सोन्याचे रईदोर ताक करून पाह्याचं**

जिजाऊचं माहेर या माऊल्यांना आपलं वाटतं. गळ्यात गुंजभर सोनं, कपाळीच्या कुंकवाचा प्रतिपाळ म्हणून पण तिला सिंदखेडचे रईदोर सोन्याचे वाटू लागतात. कितीतरी शतकांआधी या धरित्रिला शिवाजीसारखा राजा दिलेल्या जिजामातेशी आजही तिनं आपलं नातं कायम जोडलेलं. जिजाऊच्या चिरेबंदी वाड्यात कशाचिच कमतरता नाही. विशेष म्हणजे सतत राबणाऱ्या या कुणबी बायांचा भाऊ जिजाऊच्या वाड्यात नोकरीला आहे.

**जाईन माहेराला बसायला बाज**
**बोलती भावजय तुह्या बंधवाचं राज**

भावाच्या आठवणीनं हरखलेली ती त्याचं कौतुक सांगतानाच जिजाऊचही कौतुक सांगू लागते.

**जिजाऊ मंदिरी बत्ती जळती ताराची**
**बंधवाची मह्या दिवटी तहसिलदाराची**
**काय करती गोरी चांदी सोन्याच्या देवाला**
**मोठे मोठे लोक माता जिजाऊ सेवेला**

तिचा भाऊ जिजामातेच्या वाड्यावर तहसिलदार असतो. तिचा भाऊ म्हणजे तोही कुणबीच असणार; पण जिजामातेनं त्याला आता राज्यउभारणीच्या कामातही घेतलं आहे. ती त्याला सोळाव्या सतराव्या शतकातला मामलेदार करून टाकते. त्याचबरोबर आपल्या भावाला जबाबदारीचं भानही देते. तिला जिजाऊसमोर सोन्या चांदीचे देवही फिके वाटू लागतात. तिच्या ओवीतून देऊळगावराजाचा संदर्भ येतो. या देऊळगावला बालाजीचं मंदिर आजही आहे. तिरूपती बालाजीचंच विदर्भात हे प्रतिरूप मानलं जातं. देऊळगावाहून ताक करून पाहायला सिंदखेडला जाण्याचा संदर्भ कदाचित बालाजीपेक्षाही जिजाऊचं श्रेष्ठत्व सांगण्यासाठीच ती सांगत असावी.

गावगाड्यात शेताशिवारात राबणाऱ्या या माऊल्यांच्या अक्षरांशी संबंध आलेला नसतो. कुठल्याही कागदावर ऐतिहासिक कागदपत्रे चाळून, त्यांचे संदर्भ देऊन नोंदविलेला इतिहास त्यांना ठाऊक नसतो. कुठल्या शाहिराची शाहिरीही ऐकलेली नसते. कुठल्या शाळेतल्या वर्गात बसून इतिहासाचा पेपरही सोडवलेला नसतो. जगण्याचा पसारा सावरताना हे सारे उद्योग करायला सवडच मिळालेली नसते. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली, गळ्यातल्या आणि मनातल्या गाण्याची, ओवी भारूडाची परंपरा फक्त तिनं कष्टाला लावलेल्या एखाद्या टेकुसारखी आयुष्य कोलमडून पडू नये म्हणून नकळतपणे सांभाळलेली असते. एखाद्या निर्मळ वाहत्या नदीसारखं हे लोकसाहित्य. नदीला आलेलं पाणी कुठल्या डोंगरातून, कुठलय ओढ्यानाल्यातून मिळालेलं आहे, हे कोणालाही सांगता येणार नाही. दिसते फक्त निवळशंखी खळाखळा कधी झुळूझुळू वाहणारी धार. धारेच्या बुडातले शंख-शिंपले, वाळूचे निळे सावळे, पांढरे हळूहळू धारेसोबत सरकणारे, कधी एकाच जागेवर मुक्काम करणारे कण. इतिहासाच्या आठवणीत वर्तमानाला बिलगून चालणाऱ्या या गावगाड्यातल्या हजारो माऊल्यांनी इतिहासाचे औपचारिक खरेखोटेपण न तपासता हा इतिहास जिवंत ठेवला आहे. कागदपत्रांआधारे आणि संशोधकांच्या तपासाच्या पलीकडे जावून त्यांनी सांभाळलेला प्रामाणिक, संवेदनशील अस्सलपणा अधिक महत्त्वाचा आहे.

रशिद त्यावेळी मला म्हणाला, आपल्या शाळेतल्या पुस्तकापेक्षा या काकूला जास्ती माहितीहे. तोही या माऊल्या ओव्या म्हणताना रमून गेला. तो जातीनं मुसलमान असला तरी पूर्ण मराठमोळं जीवन जगणारा. सारं कुणबीपण हाडामासात साठवलेला. शिवाजी राजांनी मराठा, बिनमराठा, मुसलमान, हिंदू हा फरक कधी केला नाही. हे तोही मला त्याच्या अडाणी भाषेत मला सांगत असे.

या माऊल्यांना आजही दिसते ती रंगमहालातली बैठक. बाल शहाजी आणि परकर पोलक्यातली जिजा एकमेकांवर गुलाल फेकताहेत. बैठकीतली जाणती मंडळी कौतुकानं हा सोहळा पाहताहेत. या बैठकीचं काय होणार हे शहाजी आणि जिजा यांनीच नकळतपणे नक्की केलं आहे.

**झाडलोट करी, सडा टाकाया चुकले**
**रथ रामाचे थोपले**

जात्याची घरघर वाढायला लागते. नुसतं दळण झालं की संपलं नाही. झाडलोट सडासारवण सारंच बाकी आहे. जात्याची पाळू पुन्हा खूप घाई झाल्यासारखी पळू लागते. घामाने चोळी पावसात भिजल्यासारखी भिजून जाते. निढळाचा घाम अधूनमधून माळूवर, कधी पिठावरही गळू लागतो. एक एक दाण्याचा घास तोंडात टाकताना जीव गळून जातो. गळा दाटतो.

**सिंदखेड सिंदखेड दुरून दिसे हिरवंगार**
**टिळा लेली जिजा चमकतं पितांबर**

थोडासा विसावा म्हणून ती थांबते. गारव्यातही अंगातून घामाचे ओघळ कपाळावर उतरतात. कुंकवाचं कपाळ घामानं चिंब होतं. माहेरचा आधार तर लाखमोलाचा. चंद्रसुर्य दोघे बंधू, बाप आभाळ, माय धरणी. लग्नात नेसलेलं पितांबर नटायमुरडासाठी नाही, तर माहेरच्या, जीवाभावाच्या माणसांच्या आठवणींनी डोळे पुसायसाठी तर नाही? जिजामातेच्या भावांची, बापाची तिला येणारी आठवण अशीच जिभाळी लागल्यासारखी

**इथून दिसते सिंदखेडीची आखर**
**चौघ्या भावाचं नवं बांधलं शिखरं**
**इथून दिसते सिंदखेडीची तुळस**
**लखुरायाचं देऊळ दिसे इथूनं कळसं**

सारं माहेरी एका एकी उपवल्यासारखं नाहीसं झालं. बाप गेला, भाऊ गेले. हे कधी जिजानं स्वप्नात तरी पाह्यलं होतं का? दैवानं एकाएकी घाला घातला. सासरमाहेर हा जोडशब्द एकाएकी तुटला. वाईटात वाईट अजून काय व्हायचं असतं? माहेराचा चिरेबंदी वाडा एकाएकी स्मशानासारखा झाला. साडीचोळीचा, जिवाभावाचा आधार संपला. लेकीला आधार असावा माहेराचा, लेकराला आजोळाचा. यातलं काहीही उरलं नाही. हे सारं कळलं असेल तेव्हा संसाराला लागलेल्या जिजाला काय वाटलं असेल? पोरक्या झालेल्या शब्दांतून इतिहासातल्या दुःखाची कहाणी एक माऊली सांगून जाते. त्यावेळी चारशे वर्षे आधीच्या या आठवणीनं उजवलेल्या जीजाबाईंच्या कुसेची तिला आठवण येते. माहेर सरलं तरी पोटी जन्मलेला हा अंकूर जपायला हवा म्हणून ती कंबर कसते. खतपाणी देऊन या अंकुराचा एक मोठा वृक्ष तिला उभा करायचा, वाढवायचा असतो. जो शतकानुशतके पीकपाण्याला, पीकपाणी पिकवणाऱ्याला सावली देईल. सभोवताली दाटलेला अन्यायाचा, दुःखाचा अंधार दूर करेल. साऱ्या लेकीबाळी, कुणबी, कष्टकरी सुखानं नांदतील. मातीचं सोनं करेल. सोन्यासारखी माणसं सोबतीला घेऊन एका नव्या राज्याची उभारणी करेल.

**सोन्याच्या नांगरानं पिरथमी नांगरली**
**जिजाई मातानं जागा धन्याला केली ।**
**सोन्याचा नांगर त्याला चांदीची शिवळ**
**जिजाईमाताचा आला यज्ञा जवळ ।**
**सोन्याचा नांगर त्याला चांदीचा कासरा**
**जिजाईमाताचा पलडा यज्ञाचा पसारा ।**

सोन्याच्या फाळानं शिवबाच्या हातानं जिजामातेनं पृथ्वी नांगरल्याची गोष्ट ती मन भरून सांगते. पुण्याला कोणत्या पाप्यानं लोखंडाची पहार पुरून ठेवली होती म्हणे. साऱ्या जंजाळातून ही भुई मुक्त करायची आहे. सारी जळमटं काढून एक नवा संसार हजारो, लाखोंचा उभा करायचा आहे. त्यासाठी जिजाई कामाला लागली, ती बाळ शिवबाला आणि त्याच्या मावळ्यांना सोबत घेऊन. तिनं आरंभलेला यज्ञ हा लोकयज्ञ आहे. तो काही फक्त कुठल्यातरी वेदपुराणांनी, भटांनी सांगितलेला यज्ञ नाही. एका दिवसात एका वर्षात सपंणारा नाही. वर्षानुवर्षे चालणारा तो महायज्ञ आहे. त्यासाठी कुठलेही अग्नीकुंड केलेलं नाही. होमहवनासाठी कुठल्या कुठल्या वनस्पती आणलेल्या नाहीत.

**सोन्याचा रथ त्याला रूप्याचे चाक**
**जिजाई माताच्या यज्ञाला गेले लोक ।**

हे लोक म्हणजे सारा मावळखोऱ्यातला, दऱ्याडोंगरातला, वाडीवस्त्यावरला कुणबाऊ माणूस. शिवबाच्या हाताला जोडून हजारो हात या यज्ञाच्या पूर्ततेसाठी लागलेले. तिनं आपला भूतकाळ एखाद्या गाडग्यात भरून बाजूला ठेवावा तसा ठेवला आहे. तिच्या समोर, शिवबा समोर आहे आता हा प्रदेश, डोंगरदऱ्या, कामात बुडून गेलेला शेतकरी, आप्तस्वकीय, परकियांचे अन्याय सोसणारी बायामाणसं.

तोरणं आभाळात डुलायला लागली. देवळात सनई चौघडे वाजू लागले. सुरसनईनं आभाळ भरून गेलं. अनेक वर्षांपासून थरथरणारी, विझणारी, दिव्याची ज्योत नंदादिपासारखी जळू लागली.

**पोथ्या पुस्तकानं भरल्या देवळ्या**
**राजाऊ मंदिरी पोथ्या वाची सावळ्या ।**

आपलं राज्य राबणाऱ्यांचं राज्य आहे. सारी वाताहत झाली आहे. अस्मानी सुलतानीनं माणूस बेचिराख झाला आहे. पुरता मोडला आहे. त्याच्या हातावरची चटणी भाकरही त्याला कोणी सुखानं खाऊ देत नाही. कोण राजा आहे काही कळत नाही. उभ्या पिकात सैन्य घुसलं, गावं लुटली, लेकीबाळी पळवून नेल्या की समजतं हा प्रदेश दुसऱ्या राजानं जिंकला. एक राजा गेला. दुसरा आला. दुसरा गेला, तिसरा आला. जगणं दिवसेंदिवस कठीण होत आहे. हे सारं दूर करायचं असेल तर राजा कसा पहाडासारखा असावा. तो कोणी उभा करायचा? खरा न्याय कसा असतो हे जनतेला दाखवणारा राजा हवा. रात्रीला महालात समया जळू लागल्या. रामायण, महाभारतातल्या कथा महालाच्या भिंतीही ऐकू लागल्या. खरं कुणब्याचं आनंदवनभुवन जिजामातेच्या डोळ्यांत तरळायला लागलं. माहेरपण संपवून जिजामाता आता खऱ्या अर्थानं लोकमाता झाली. हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी तिनं चोहोबाजुंनी तयारी केली. त्या राज्याचा मुख्य प्रवर्तक ती घडवू लागली. जो ती इथल्या जनतेला अर्पण करणार होती. तो रयतेचा राजा तिला उभा करायचा असतो.

**ढळे रात कणकण पोथी गुंफिते मन**
**सपनात आला राम मारिला रावण ।**
**ढळे रात कणकण राजा लेला काकन**
**बळी घातला पाताळी येड्या वामनानं।**
**झाली रात ग निम्मी, फडफडे कशी वात**
**शिवबा बाळराजा डोकावतो अंधारात ।**
**शिवाजीच्या गडावरी काय दिसे लालंलालं**
**जिजामाता दळील्या गुलाल ।**

रामाने मारलेला रावण, येड्या वामनानं पाताळात बुडवलेला बळिराजा तिच्या स्वप्नात येतो. राजा काकण लेला आहे म्हणजे राजाने बांगड्या भरल्या आहेत आणि तो पळपुटा झाला आहे असा तिचा संदर्भ नसतो. कुठल्यातरी प्रतिज्ञेचे काकाण त्याने घातले आहे. त्याला वामनाने पाताळात घातलेल्या बळिराजाला पुन्हा वर आणायचे आहे. एवढेच काय बळिचाच नवा अवतार म्हणून त्याला काम करायचे आहे. असा हा बळिराजा आता घडायला सुरुवात झाली आहे. म्हणता म्हणता शिवबाने गडकिल्ले जिंकायला, ताब्यात घ्यायला सुरुवात केली. त्या गडावर जिजामातानं दळलेला लालभडक गुलाल दिसतोय. हिंदवी स्वराज्य अनेक संकटांतून उभं राहू लागलं आहे. राजासमोर स्वकीय परकीय हा भेद नाही. अन्याय करणारा स्वकीय असला तरी त्याची मान उडविली पाहिजे हा दंडक राजाने आपल्या मावळ्यांना घालून दिला आहे. तो फक्त हिंदू प्रतिपालक राजा नाही तो खरा प्रजाप्रतिपालक आहे. नाही तर सोन्याच्या नांगरानं पृथ्वी नांगरण्याचा उपयोग काय? शिवाजीराजांनीच एका पत्रातून लिहिलंय, हिंदू व मुसलमान वगैरे ज्ञाती ईश्वरापाशी एकरंग आहेत. मुसलमान लोक मसुदीत बांग देतात ती भगवंताची स्तुतीच होय आणि हिंदू लोक देवळात घंटा वाजवून स्तुतीच करतात. त्यास जातीधर्मावर जुलूम करणे हे भगवंताशी वैरत्व आणि अपराध व शास्त्राविरुद्ध. जगात अन्याय्य रीतीने जिजिया पट्टी घेणे योग्य नाही व शास्त्रमतेही अयोग आहे.

असा हा लोकोत्तर राजा जिजामातेनं उभा केला. त्याचेजवळ आपपरभाव नाही. साऱ्या पृथ्वीला स्वर्ग करण्याचे काकण त्याने बांधले आहे. शेतकऱ्यांना वाटतं की हा आपला पालनकर्ता आहे. राज्यातल्या लेकीबाळींना वाटते हा आपला पाठचा भाऊ आहे. हिंदू मुसलमान सारेच या राज्यात सुखात आहेत. शेतीबाडीची कामं सांभाळून मावळे या बळिराज्याच्या उभारणीसाठी राजासोबत मुलूखगिरीला जात आहेत. युद्धात मारले जात आहेत. त्यांच्याही संसाराची, लेकराबाळांची, विधवा झालेल्या माऊल्यांची काळजी हा राजा घेतो आहे. स्वतःच्या लेकाचं लग्न बाजूला ठेवून कोंढाण्याचं लग्न आधी करणारा, त्यासाठी बलिदान देणारा मावळा जिजामातेनं, शिवबानं उभा केला आहे. तो एक नाही, हजारोच्या संख्येनं आहे. हे बळीराज्य उभं करणं हे काही एकट्यादुकट्याचं काम नाही. असे हजारो मावळे घरादाराची काळजी न करता या राज्याच्या उभारणीला लागले म्हणून हे राज्य उभं राहिलं आहे. याची मनोमन जाणीवही या

लोकमातेला आणि लोकराजाला आहे.

शेकडो गड शिवबाने घेतले. काही नवे उभे केले. डोंगरमाथ्यावर, समुद्रात. आयाबहिणी आता राज्यात सुखात आहेत. पीकपाण्यातून राजाचे सैन्य धावत नाही. लेकी सुनाची अब्रु कोणी लुटत नाही. एखादाच असा प्रसंग घडला तर कोणीही धजावणार नाही, अशी अद्दल जाहीरपणे घडवल्या जाते. जिजाऊला आता खात्री पटते की, शिवबा आता सर्वार्थानं लोकराजा झाला आहे. या राज्याचा मोठा सोहळा आता पार पडायलाच हवा. एखाद्या चिरेबंदी वाड्यासारखं राज्य आता उभं राहत आहे. खूप कामं बाकी आहेत. रायगडावर राजमातेच्या सावलीतच राज्याभिषेकाचा सोहळा पार पडतो. दाही दिशातून या राज्याचे आणि राजाचे पडघम ऐकू येतात. राजमातेला वाटतं आता आपलं काम संपलं आहे. बाकी सारी आवरासावर करायला लोकराजा आता समर्थ आहे. लखुजीराजाच्या, सिंदखेडीच्या भावंडाच्या, शहाजीराजाच्या आठवणी तिच्या वृद्ध डोळ्यांत तरळून जातात. शिवबाच्या राज्याला आपलंच राज्य समजून धारातीर्थी पडलेले हजारो मावळे, त्यांचे घरसंसार आठवतात. थरथरत्या हातानं खूप मन भरून ती शिवबाला आशीर्वाद देते. राजमाताही आता लोकमाता झालीय, ती राजाला जनतेच्या हाती सुपूर्द करते आणि भरल्या मनानं साऱ्यांचा निरोप घेते.

अंगणात पिवळा उजेड पसरू लागतो. रामाचे थोपलेले रथ अंगणात येतात. आता दळणाचीही सावरा सावर करायला हवी.

**चला जाऊ पाहू राजमाताची बांधणी**
**आन बाई शिवबानं देली मोत्याची चांदणी।**
**चला जाऊ पाहू राजमाताचा वाडा**
**महालात गाजवतो शाहीर पवाडा।**
**वाड्याच्या कोपऱ्यात बहरली तुळस**
**भांगात लेले बाई मोत्याचं कणीस।**

आभाळाहून मोठा राजा उभा करून जिजाऊमाता निघून गेल्या. पोवाड्यात मावणार नाही असं राज्य त्यानं उभं केलं. राज्यातल्या आयाबहिणी तुळशीबिंद्रावणाला निवांत मनानं फेऱ्या मारू लागल्या. असा राजा जो बापही आहे आणि भाऊही. एकीचाच नाही, तर उभ्या राज्याचा, प्रिथमीचा. कुठल्यातरी भावानं बहिणीला इतिहासात अशी ओवाळणी भाऊबीजेला दिली असेल का?

शेकडो वर्षे झाली. या राजमातेच्या, लोकमातेच्या आणि राजाच्या आठवणींनी मायमाऊल्या गलबलून येतात.

**दुरून दिसते सिंदखेडीची पऊळं**
**राजमाताचं नवं बांधलं राऊळं**

तिच्या ओवीतून काळाचा केवढा मोठा पट साकारतो. ती आता पूर्ण भानावर येते. आता फक्त आठवणी. चिरेबंदी वाडे, कमानी पडल्या. काळ्या कोटात मोकाट गुरंवासरं बसू लागली. जाधवांच्या वाड्यासमोरच्या रस्त्यावर पानपट्ट्या, बीयरबार उभे राहिले. पुतळा बारवेचा एक एक चिरा ढिला झाला. दुष्काळामागून दुष्काळ आले. लखुजीराजांनी बांधलेले तलाव कोरडे पडले. गाळानं भरले. ज्या कुणब्यांचं राज्य राजांनी उभे केले त्या राजाचा जन्म सिंदखेडात जन्माला आलेल्या गर्भाशयात झाला. आजही या प्रदेशात आत्महत्या करणारा शेतकरी जन्मतो. शिवबाने याचसाठी हे राज्य निर्माण केलं का? याच मातीत जन्मलेले राज्यकर्ते या मातीचे संस्कार विसरले. तरी बळीचं राज्य पुन्हा अवतरण्याची या माऊल्यांची इच्छा कधी मरणार नाही. म्हणून ती चारशे वर्षांपूर्वीच्या राजाला पुन्हा पुन्हा आयुष्य मागते.

**पहिली माझी ओवी तुळशिला घालू पाणी**
**राजाचे ईघीनं जातीन वाऱ्यावानी**

एवढा मोठा काळ गेला तरी तिचं सिंदखेडराजावरचं प्रेम, माया कमी होत नाही. तिच्यासाठी, साऱ्यासाठीच ते जगातलं सर्वांत श्रेष्ठ असं मातृतीर्थ आहे.,

**सिंदखेड बाजारी बस्ता बांधते उधार**
**बंधवाला मह्या राजा शाहूचा आधार।**
**साळीचे तांदूळ रूपयाचे पावशेर**
**बंधूचे संगती सिंदखेडीची सावकार।**
**गाव सिंदखेड पाणवठा लांबणीचा**
**पाठच्या नेणतीचा आडवा घोळ गुंफणीचा।**
**सिंदखेड वाट लिंबून्या लवल्या**
**गाडीवाल्याला सावल्या।**

असं तिचं भरभरून असलेलं या मातृतीर्थावारचं प्रेम. कधीही कमी न होणारं. या दुष्काळी प्रदेशातही गाडीवानाला सावली धरावी म्हणून लिंबून्या लवल्या आहेत याचा भास तिला होतो. लखुजीरावांनी बनवलेले पाण्याचे हौद कोरडे पडले म्हणून आता पाणवठा लांबणीचा झाला आहे, हेही ती सूचकपणे सांगते. कधी कधी आज या गावात प्यायला पाणी मिळण्याचीही मारामार असते, तरी ती म्हणते,

**चांदीचा गिलास त्याला रूप्याची घासणी**
**राव माझे येतील पानी सिंदखेड ठेसणी।**

या ओव्या गोळा करून आता खूप वर्षे झाली. साधारणपणे तिसेक वर्षे. त्या रात्रीनंतर रशिद मला पुन्हा भेटला नाही. त्याची गावी पोटभरण्याएवढीही शेती नव्हती. तो पोटापाण्यासाठी जालना, औरंगाबाद कुठंतरी गेला. त्याला माझी आठवण आहे की, नाही हे मला सांगता येणार नाही. उंबरदला अंगणात बसून आणि दुसऱ्या गावातूनही रात्रीला मला ओव्या म्हणून दाखवणाऱ्या मायमाऊल्याही आता किती हयात असतील? या जागतिकीकरणाच्या धावपळीत गावगाड्यातल्या नव्या पोरीबाळींच्या ओठावर हा वाहत्या पाण्यासारखा इतिहास वाहत असेल का? आजही खुपदा गावाकडं जातो. येता जाता सिंदखेड राजा दिसतो. लखुजी जाधवांच्या काळातलं शेकडो अवशेष या गावात, गावाच्या भोवती पसरलेले आहेत; पण सिंदखेड दिसलं की, मला रेड इंडियन्ससारखा रशिद आणि खूप नितळ मनानं ओव्या म्हणणाऱ्या उंबरदच्या त्या माऊल्या आणि त्याच शेतीबाडीतलं जगणं आठवतं.

**श्रीकांत देशमुख**
बळिवंत, नरहर नगर, नृसिंह पॅलेसमागे,
काबरा नगर, रिंग रोड, नांदेड-४३१६०५
मो. ९४२२४३६७६९

■■

# सौ सौ चुहे खाय के

**[ तुम्हाला म्हणून एक शिक्रेट सांगतो, निर्यातबंदीचा प्रश्न आला, तेव्हा 'जाणत्या'नं विरोध केला होता. अगदी कडाडून विरोध केला होता. पण तो होता मनातल्या मनात! शेवटी देशभरातले सर्व पार्ट्यांचे नेते, एकत्र येऊन निर्यातबंदी आणतात तेव्हा ते आपल्या देशाच्याच हिताचं असणार, असं समजून जाणता गप्प बसला; पण आता त्याच्या लक्षात आलं- नुकतंच. तेव्हा त्यानं आम्हा कार्यकर्त्यांच्या समोर कितीतरी वेळा राजीनामा देऊन आपला विरोध प्रगट करायचा विचार जाहीर केला; पण आम्हीच साऱ्यांनी महामुश्किलीने तो विचार रद्द करायला लावला. अहो, राजीनामा दिला असता तर सर्व मलाईदार खाती सोडावी लागली असती. दिल्लीतून 'जाणते' सुटले असते, तर गल्लीत आम्हाला कुणी हिंग लावून विचारलं नसतं. मग, आमच्या साखरसम्राट, शिक्षणसम्राट, बँक बहाद्दरांच्याविरुद्ध एन्कायऱ्या लागल्या असत्या. शिबीआय मागे पडली असती. आमच्या बाजारसमित्या, जिपं, पंसं सारं सारं साम्राज्य कोसळलं असतं. तेव्हा आमच्या यनशीपीच्या व्यापक हिताचं लक्षात घेऊन 'जाणत्या'नं तो विचार टाळला. ]**

*थंडा महाराज यांच्या 'उ'संतवाणी या लोकप्रिय सदराला संघटकच्या वाचकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. एक वर्षभर चाललेलं हे सदर, ६ ऑक्टोबरच्या अंकापासून बंद करण्यात आले आहे. त्या सदराच्या जागी बाबू सोंगाड्या यांचे 'मिरचीचे खळे' हे खुमासदार सदर सुरू करीत आहोत. हे सदरही संघटकच्या वाचकांच्या पसंतीस उतरेल अशी आशा आम्ही करतो. महाराष्ट्र 'टाळा'ने सुधरला नाही आणि 'चाळा'ने बिघडला नाही, असं म्हणतात. त्यामुळे महाराजांच्या नंतर आता सोंगाड्या तुमच्या भेटीला येत आहे.*

**- कार्यकारी संपादक**

काही म्हणा राव तुम्ही शेतकरी म्हणजे कृतघ्नच! तुमच्यासाठी कितीही कष्ट करा, तुमच्या हिताच्या कितीही योजना बनवा, तुमची तंगडी आपली वरच! तुमचा सच्चा हितकर्ता, तारणहार कोण? हे काही तुम्हाला कळत नाही आणि तुम्ही आपले अलत्या भलत्यालाच 'किसानों के मसिहा' काय म्हणता?, 'कोटी कोटी शेतकऱ्यांचे पंचप्राण' काय नि 'किसान क्रांती के जनक' काय? काय काय म्हणता!! त्यांचे पोवाडे काय गाता आणि त्यांच्या नादी लागलेल्या एका वेड्या कविने तर कहरच केला- तो म्हणतो काय, ''मरू नको पोरा, आता मारायला शिक, घेतलेली कर्ज आता बुडवायला शिक!'' त्या कविला डोक्यावर घेऊन काय नाचता!! सारा मूर्खांचा बाजार झालं. बापहो, अशी कर्जे बुडविली तर सरकार चालावं कसं? मोठमोठे उद्योजक, साखर सम्राट, बँक महर्षी बघा बरं कसे नाका नीट चालताहेत ते! एकवेळ बँक बुडवतील, साखर कारखाना बुडवतील; पण कर्ज कधी म्हंता कधीच बुडवणार नाहीत. बँका बुडल्या, साखर कारखाने बुडले, तर आम्ही पॅकेजेस देतो, त्यांना वर काढतो, ते परत बुडवता यावं म्हणून; पण तरीही ते कर्ज बुडवत नाहीत. असो, मुद्दा हा की, घेतलेलं कर्ज बुडवायला शिक असे सल्ला देणारे
--- ---

जाऊ द्या झालं. सांगायचं असं की, तुम्ही कृतघ्न आहात आणि तुमच्या सच्च्या कैवाऱ्याला, 'जाणत्या'ला विसरून कुणा आंबेठाण निवाश्याच्या नादी लागलात, हे वाईटच! क्षणभर कांद्यावर निर्यातबंदी काय आली, की लगेच तुम्ही बोंबाबोंब केली तीही यनशीपीच्या बालेकिल्ल्यात. त्यावरही कडी म्हणजे जिपं, पंसच्या निवडणुकांच्या ऐन तोंडवर! बापहो, हे असं आम्हाला यनशीपीवाल्यांच्या पोटावर मारू नका हो, पाठीवर मारा. तुमच्यासाठी कष्ट उपसता उपसता आम्ही किती वजनदार झालो आणि आता तुम्ही हा असा राग राग केलात तर आमचं कसं व्हावं बरं! अहो, 'जळाविना मासोळी अन् सत्तेविना यनशीपी कशी राहील?'

हे बघा, परवा परवा आमचा 'टग्या दादा' म्हणाला तेच खरं. दिल्लीच्या एअर कंडिशनमध्ये बसून 'जाणता' एवढा घाम गाळतो, तो तुमच्यासाठीच, तरी तुम्हाला त्याची कदर नाही. बरं, आजपर्यंत काहीही झालेले असो, भले ऊस, कांदा, कापसानं तुमचं कंबरडं पुरतं मोडलेलं असो; पण दिल्लीपासून गल्लीपर्यंत तुमच्या हिताची मेणबत्ती आमच्या यनशीपीनंच पेटती ठेवली, हे तरी खरं की नाही!

तुम्हाला म्हणून एक शिक्रेट सांगतो, निर्यातबंदीचा प्रश्न आला, तेव्हा 'जाणत्या'नं विरोध केला होता. अगदी कडाडून विरोध

केला होता. पण तो होता मनातल्या मनात! शेवटी देशभरातले सर्व पार्ट्यांचे नेते, एकत्र येऊन निर्यातबंदी आणतात तेव्हा ते आपल्या देशाच्याच हिताचं असणार, असं समजून जाणता गप्प बसला; पण आता त्याच्या लक्षात आलं- नुकतंच. तेव्हा त्यानं आम्हा कार्यकर्त्यांच्या समोर कितीतरी वेळा राजीनामा देऊन आपला विरोध प्रगट करायचा विचार जाहीर केला; पण आम्हीच साऱ्यांनी महामुश्किलीने तो विचार रद्द करायला लावला. अहो, राजीनामा दिला असता तर सर्व मलाईदार खाती सोडावी लागली असती. दिल्लीतून 'जाणते' सुटले असते, तर गल्लीत आम्हाला कुणी हिंग लावून विचारलं नसतं. मग, आमच्या साखरसम्राट, शिक्षणसम्राट, बँक बहाद्दरांच्याविरुद्ध एन्कायऱ्या लागल्या असत्या. शिबीआय मागे पडली असती. आमच्या बाजारसमित्या, जिपं, पंसं सारं सारं साम्राज्य कोसळलं असतं. तेव्हा आमच्या यनशीपीच्या व्यापक हिताचं लक्षात घेऊन 'जाणत्या'नं तो विचार टाळला.

जाणत्याच्या गुरूनं नाही का कोणे एके काळी दुर्गा अम्माच्या विरुद्ध बंड करून पाहिलं होतं. बड्या बड्या नेत्यांच्या सोबत जबर आघाडी केली होती; पण तेव्हा अम्मानं या साऱ्यांना धोबीपछाड दिला होता. त्यामुळे जाणत्याचे गुरू वनवासात गेले होते. त्यांना त्यांच्या पाठीराख्यांची 'उपासमार' बघवेना, मग त्यांनी 'मावळत्या सुर्याला साक्ष ठेवून' अम्माच्या पायाशी एकनिष्ठेची शपथ घेतली आणि मागचे दोर कापून टाकले. त्याच अम्माची सून आता आली आहे. तेव्हा तिच्यासाठीच अन् केवळ व्यापक पक्षहीत लक्षात घेऊन जाणत्यानं कधीही राजीनामा न देण्याचा ठाम निर्णय केला. तेव्हा त्यांच्या वतीनं आणि समक्ष यनशीपीच्या वतीनं आम्ही तुम्हाला आश्वासन देतो, की एकदा जिपं, पंसंच्या निवडणुका होऊन जाऊ द्या, त्यानंतर थेट पुढच्या निवडणुकावेळीच आम्ही, परत निर्यातबंदी उठवण्याची मागणी करू.

तेव्हा 'जाणता' हा तुमच्या हिताचीच बात करतो हे समजून घ्या. त्याचं काय आहे, जाणत्याच्या बोलण्या अन् करण्यामागचं राजकारण खुद्द जाणत्यालाच कळत नाही, तिथं तुम्हासारख्या अडाणी शेतकऱ्याला कसं बरं कळणार? हे बघा, तुम्ही शेतकरी म्हणजे तो कार्ल मार्क्स का कोण म्हणतात ना! आता हा कोण म्हणून काय विचारता? अहो, तो जन्मला जर्मनीत वाढला युरोपात आणि पनपला आशियात. आता ज्याला इथले 'लालीलाल'सुद्धा विसरून गेले, असा तो कार्ल मार्क्स! तर तो म्हणाला होता, की शेतकरी म्हणजे बटाट्यासारखे असतात. त्यांना पोत्यात बांधलं तर ते एकत्र राहतात आणि मोकळं सोडलं तर कुठेही घरंगळत जातात. तेव्हा तुम्ही ऐन मतदान प्रसंगी घरंगळत जाऊ नये म्हणून तुम्हाला यनशीपीच्या पोत्यातच बांधून ठेवावं, या शुद्ध हेतूसाठी जाणता प्रयत्नशील आहे, असं टग्यादादा म्हणाला. तरीही तुमच्या लक्षात आलं नसंल तर उजडून सांगतो.

झालं काय, की वर म्हणजे दिल्लीत किसानविरोधी लॉबी फारच स्ट्राँग आहे, त्याच्याविरोधात हाबूक ठोकून उभे राहणारा एकमेव पठ्ठा, जाणता आहे. आता बाकी कुणी म्हणजे इटालियन काँग्रेस, स्पेक्ट्रमबाधीत दक्षिणी पार्टी, डावे- उजवे एकजात सगळे किसानविरोधी! मग एकटा 'जाणता' काय करणार बरं? बिचारा नाईलाजानं कांद्यावर, कापसावर निर्यातबंदी आलेली डोळे मिटून पाहतो. या बंदीमुळे शेतकरी नागवला गेला तेव्हाच जाणत्याला कळलं. आता लक्षात आलं, ते जिपं, पंसंच्या निवडणुका आल्यावर- हा केवळ योगायोग! म्हणून नाशिक जिल्हा निवडून यनशीपीनं तोफा डागल्या अन् आता तर किसान हिताची सुनामीच आलेली आहे. इटालियन काँग्रेसचे मुख्यमंत्री खुद्द दिल्लीत गेले निर्यात बंदी उठविण्याची मागणी करायला. आता परत निवडणुका तोंडावर आल्या, हाही योगायोगच तरीही त्यांचे हेतू प्रामाणिकच. आता त्यांना हे माहीत होतं. एवढा महत्त्वाचा निर्णय राणीचे प्रधान तर घेऊच शकत नव्हते, तेव्हा राणीच्याच चरणारविंदी मिलिंदाय मान व्हावं म्हणून उशिरा का होईना हा शहाणपणा सूचला. महाराष्ट्रातल्या एकजात यनशीपीवाल्यांनी जोर लावून धरला म्हणूनच मुख्यमंत्र्याला दिल्लीपर्यंत जावं लागलं. तरीही तुमच्यातले कृतघ्न आणि लाल बिल्लेवाले म्हणायला लागले, शेतकऱ्यांचे जाणते राजे म्हणवणाऱ्याला निर्यातबंदीचा फटका बसू शकतो, हे कळायला एवढा उशीर का लागला. भावांनो, असा विचार करू नये, बिचाऱ्या 'जाणत्या'वर केवढं दडपण आहे. त्याच्या पार्टीतल्या एका एका नेत्याची एक एक भानगड बाहेर यायला लागली आहे. स्वतः त्याच्या मागे बलवा, गोएंका, लवासा लागले आहेत. ते सारं विसरून सात पिढ्यांची सोय करण्यासाठी अन् आपल्या बगलबच्च्यांना सांभाळण्यासाठी त्या बिचाऱ्या जाणत्याला वेळ द्यावा लागतो. ते सारं सांभाळून, ही निर्यातबंदी लक्षात यायला थोडा उशीर झाला; पण बापहो, शेतकरी मेल्यावर का होईना मरणाचं कारण तर कळलं!

खरं सांगायचं तर राजेहो, तुम्ही केवढे भाग्यवान आहात! उसाचं मढं घेऊन वारंवार मिरवणारे आणि एका दादांनी तर तुमच्या हितासाठी केवळ तुमच्याचसाठी यनशीपी, शिवसेना, इटालियन काँग्रेस या साऱ्यांच्या आश्रयाखाली मंगल कार्यालयाच्या एका हॉलात 'भव्य' कापूस मेळावा घेतला. तुम्ही कृतघ्न शेतकऱ्यांनी मात्र त्या मेळाव्याला अंगठा दाखवलात. तुमच्या हितासाठी केवळ तुमच्याच हितासाठी हा 'भव्य' मेळावा घेतला होता. तरीही तुम्ही नाही आलात?

आम्हाला ठाऊक आहे, तुम्ही तुमच्या त्या ओरिजिनल लाल बिल्लेवाल्यांच्या गल्ली कोपऱ्यात, उन्हातान्हात, पावसात होणाऱ्या लाखालाखांच्या क्षुद्र मेळाव्यात हजर राहता, तिथून तुम्ही विचारता, साले हो, वर तुमचं सरकार, खाली तुमचं सरकार, जिपं- पंसं तुमचेच अन् मग तुम्ही मग तुम्ही निर्यात बंदी कशी काय घातली हो- म्हणजे चोर बी तुम्हीच अन् पोलिसबी तुम्हीच. त्या मंगल कार्यालयीन मेळाव्याला- शेतकऱ्यांच्या मेळाव्याला, यनशीपीचे मंत्री, कार्यकर्ते, शिवसेनेचे खासदार-आमदार, इटालियन काँग्रेसचे आमदार, कार्यकर्ते अन् समूर पकडू पकडू आणलेले दांडगे दुंडगे 'शेतकरी' यांनी आता तलवार परजली आहे. ती तलवार कृतघ्न शेतकऱ्यांचं पानिपत केल्याशिवाय म्यान होणार नाही. माफ करा, आम्हाला म्हणायचं होतं 'कुणाचं तरी पारिपत्य केल्याशिवाय म्यान होणार नाही. अहो, स्पष्टच आहे, वर-खाली आमचीच सत्ता असल्यामुळे आम्ही कसं बरं 'आमचंच' पारिपत्य करणार? तेव्हा आम्ही शोध घेत आहोत. ही तलवार कुणावर चालवावी याचा. ते काहीही असलं तरी लक्षात ठेवा तुमचे तारणहार आम्हीच. केवळ आम्हीच. आपले सदा नम्र 'जाणते' आणि पिलावळ!

**- बाबू सोंगाड्या**
babu.songadya@gmail.com

■■



## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

भाग सोळा

# गोदान

होरीचं मन विचलीत झालं. तो म्हणाला, ''हो, हे ठीक राहील.''

''ऊसाचं माप होऊन जाऊ द्या. पैसे त्याला हळू न देता घेऊत.'' हिरानं सुचवलं.

''बस बस, असंच करुयात.'' होरीला त्याचं म्हणणं पटलं होतं.

दुसऱ्याच दिवशी गावातल्या अनेक माणसांनी ऊसाच्या कापणीला सुरुवात केली. होरी आणि शोभा सुद्धा ऊस कापणीसाठी शेतात गेले. त्यांचे सोबत पुनिया, धनिया, झुनिया, सोना आणि रूपा याही होत्याच. कुणी ऊसाची कापणी करत होतं, कुणी साळणी तर कुणी बिंडा बांधणी करत होतं. सगळेचजण काही ना काही काम करत होतेच. सर्वच शेतकऱ्यांना ऊसाची कापणी करताना पाहून सावकार लोकांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. सगळे सावकार घेणी वसूल करायला जमायला लागले. म्हातारी दुलारी तर रंग रंगोटी करून, साज शृंगार करून येऊन बसली आणि म्हणायला लागली, ''आधी माझे पैसे द्या मगंच तोडणी करा. मी जेवढी गप्प राहते, तेवढीच तुम्ही टाळाटाळ करता!'' दोन वर्षांत तर तुम्ही व्याज सुद्धा दिलं नाही. केवळ व्याजाचेच तर पन्नास रुपये झाले आहेत.

होरी तिला काकुळतीनं म्हणाला, ''बाई, ऊस विकल्यावरंच तर पैसे मिळतील त्यातून जमेल तेवढे तुम्हाला देतो. मी काही हे गाव सोडून पळून जात नाही आणि एवढ्या लवकर मरतही नाही. शेतात उभा राहिलेला उस तर पैसे देणार नाही.''

त्याच्या हातातला कोयता हिसकावून घेत ती म्हणाली, ''तुमची नियतंच खराब झाली आहे म्हणून तर बरकत येत नाही.''

पाच वर्षांपूवी त्यानं दुलारीकडून तीस रुपये घेतले होते. तीन वर्षांत त्याचे शंभर झाले तेव्हा स्टाम्प लिहिला. दोन वर्षांत त्यावर पन्नास रुपये चढले. होरी म्हणाला, ''बाई माझी नियत कधीच खराब नव्हती. हां, मात्र सध्या अवस्था खूपंच वाईट आहे. हे मात्र खरं; पण खरं सांगतो तुमची पै न् पै मी चुकती करीन.''

दुलारी सावकारीण परतते न परतते तोच मंगरू आला. काळाकुट्ट, दोन दात बाहेर आलेले, कंबरेखाली लटकत असलेली ढेरी, डोईवर टोपी, गळ्या भोवती चादर, वय पन्नासच्या आत तरी काठीचा आधार लागायचा. खोकायचा काठीच्या आधारावर उभा राहत होरीला ते रागवायला लागले. ''आधी आमचे पैसे दे आणि मगंच ऊस काप. आम्ही पैसे कर्जाऊ दिले होते भीक नाही. तीन तीन वर्षांपासून व्याजपण दिलेलं नाही. माझे पैसे पचवता येतील असं समजू नकोस. मी तर तुझ्या प्रेतापासून पैसे वसूल करीन!''

शोभा त्याची थट्टा करत म्हणाला, ''मग घाबरता कशाला सावकार, त्याच्या प्रेताकडूनंच पैसे वसूल करा ना. काय एक दोन वर्षे मागे किंवा पुढे. दोघेही सोबतंच स्वर्ग गाढाल. तिथेच देवासमोर पैसे वसूल करून घ्या झालं!''

त्याला खूप शिव्या घालून मंगरू म्हणाला, ''पैसे घेताना तर खूप लाचार झाला होता आणि पैसे परत द्यायची वेळ आली, की गुर्मीत बोलता का? घरदार, बैल विकायला लावील. शेत हराज करायला लावील.''

परत थट्टा करत शोभा म्हणाला, ''सावकार इमानदारीनं सांगा, किती रुपये दिले होते कर्जात? आणि आता त्याचे तीनशे झाले कसे?''

''तुम्ही वर्षाच्या वर्षांला व्याज नाही दिले तर आपोआप कर्ज वाढणार.''

''मुळात कर्ज किती होतं? पन्नासंच तर होते!''

''कधी घेतले होते पाहून तर घे.''

''पाच सहा वर्षे झाले असतील.''

''पुरे दहा वर्षे झाली आहेत. आता हे अकरावं वर्षे आहे.''

''पन्नासचे तीनशे घ्यायला तुम्हाला काही लाज वाटत नाही का?''

''लाज काय वाटायची? कर्ज दिलं होतं, भीक नाही घातली.''

हातापाया पडून होरीनं त्यालाही कसंबसं वाटी लावलं. दातादीन बटाई केली होती. बी-बियाणं दिलं होतं, अर्धा माल नेणार होते. त्यामुळे यावेळी काही बोलणं इष्ट नव्हतं. झिंगुरानं मिलच्या मॅनेजरला आधीच सांगून ठेवलं होतं. त्यांचे नोकर माल गाडीत लादून नेत होते नदीवर. नदीतून नावेतून माल लादून न्यायचे. नावेत पन्नास गाड्या माल लादता यायचा. नदी गावापासून अर्धा मैल दूर होती. वाहतूक या नदीतील वाहतुकीमुळे किफायतशी होती. ही सारी व्यवस्था करून झिंगुरानं सर्वांना उपकाराखाली दाबलं होतं. माप सुरू झालं आणि झिंगुरा सिंग दारावरंच बसून राहिला. माप झालं, की पावती ते घ्यायचे आणि पैसे खजिनदाराकडून वसूल करायचे. आपले पैसे घेऊन बाकी परत करायचे. आसामी कितीही रडला पडला तरी त्याचं काही एक न ऐकता ते आपलं काम करायचे.

होरीला एकशेवीस रुपये मिळाले. त्यातून आपले पैसे वसूल करून होरीच्या हातात झिंगुरानं

पंचेवीस रुपये ठेवले. ते रुपये हातात घेऊन होरी म्हणाला, ''ठाकूर, मी हे रुपये तरी घेऊन काय करू? ठेवून घ्या. मला फक्त मजूरी द्या!''

ते पंचेवीस रुपये जमिनीवर फेकून झिंगुरी म्हणाला, ''घे, की दे फेकून. मला काय करायचं आहे! तुम्यामुळे मालकाची बोलणी खावी लागली आणि आता रायसाहेब दंडासाठी मागे लागलेत. तुझ्या गरिबीकडे पाहून हे पैसे तरी परत दिले नाही तर एक दमडीही दिली नसती. आता रायसाहेबांनी मागणी केली तर आणखी द्यावे लागतील.''

ते पैसे घेऊन तो बाहेर पडतो तोच नोखेरामनं हटकलं. होरीनं ते पंचेवीस रुपये त्याच्या हातावर टिकवले आणि एक शब्दही न बोलता तो निघून गेला. आता तर त्याचं डोकं फिरायला लागलं.

शोभालाही तेवढेच पैसे मिळाले होते. त्याला लाला पटेश्वरीनं गाठलं. तेव्हा शोभा म्हणाला, ''माझ्याजवळ पैसे नाहीत. तुम्हाला काय करायचं ते करा?''

रागारागानं पटेश्वरी म्हणाला, ''ऊस विकला, की नाही?''

''हो, हो तर?''

''मग का देत नाहीस? बाकी लोकांचे दिलेस का नाही?''

''हो, दिले.''

''मग मला का देत नाहीस?''

''आता माझ्याजवळ जे काही आहे ते पोराबाळासाठी आहे.''

''शोभा, तू पैसे देशील, आत्ताच्या आता आणि तेही हात जोडून. काय बोलायचं ते बोलून घे. एक तक्रार केली तर सहा महिन्यासाठी अंदर जाशील. रोज जुगार खेळतोस असं रिपोर्टात लिहीन. मी जमीनदाराचा, सावकाराचा नोकर नाही. सरकारचा नोकर आहे.'' असं म्हणून पटेश्वरी पुढे गेले. शोभा आणि होरी त्याच्या मागे चूपचाप चालत गेले. पटेश्वरीच्या या धमकीनं दोघेही जणू चेतनाहीन झाले होते.

तेव्हा होरी म्हणाला, ''ऊस जळाला समज आणि त्याचे पैसे देऊन टाक. मी सुद्धा असंच समजून मनाची समजूत घातली.''

दुःखी सुरात शोभा म्हणाला, ''हो बाबा, देऊन टाकतो. न देऊन जाणार कुठं?''

समोरून गिरीधर नशेत धूत होऊन येत होता. दोघांना पाहून म्हणाला, ''झिंगुरीनं तुमचा सारा माल घेतला असेल? चालायला सुद्धा एखादा पैसा ठेवला नसेल. खूनी, डाकू. मी खूप ओरडलो. हातापाया पडलो. एक पैसाही सोडला नाही साल्यानं!''

शोभा म्हणाला, ''ताडी पिऊन आला आहेस आणि म्हणतोस एक पैसाही नाही!''

तेव्हा पोट दाखवत गिरधर म्हणाला, ''गायी शप्पत, संध्याकाळ झाली आहे. सकाळपासून एक दाणा पोटात गेला नाही. एक आणा तोंडात लपवून ठेवला होता त्याची ताडी प्यालो. विचार केला, वर्षभर घाम गाळला आहे, तेव्हा त्या पैशानं काही नाही तरी निदान दारू तरी पिऊ! पण खरं सांगू? नशा नाही आली. एका आण्याच्या दारूनं काय नशा येणार? मात्र मी झुलतो आहे त्यावरून वाटतं मी धूत्त आहे; पण हे छान झालं काका, आपण बे बाक झालो. वीस रुपये घेतले होते त्याचे एकशेसाठ झाले. याला काही सीमा नको?''

होरी घरी गेला तेव्हा रूपा पाणी घेऊन तर सोना चिलीम घेऊन आली. धनियानं चणे आणि मीठ आणून ठेवलं. साऱ्याजणी मोठ्या आशेनं त्याच्याकडे पहायला लागल्या. झुनिया दाराच्या उंबऱ्यावर येऊन उभी राहिली. होरी उदासवाणा होऊन बसला होता. इतका दुःखी जणू कुणाची मौत पाहून आलाय!

धनियानं विचारलं, ''किती भरला ऊस?''

''एकशेवीस झाले; पण सारे सावकारानं लुटले.''

ते ऐकलं आणि तिच्या जीवाची आग आग झाली. तिला वाटलं आपलाच चेहरा ओरबाडून काढावा. रागारागतंच ती बोलली, ''तुमच्यासारखा घमंडी माणूस देवानं रचलाच कशाला कुणास ठाऊक? तुमच्या सहवासात आयुष्याची राख-रांगोळी झाली. देव तरी असा, की मरणही देत नाही. या जंजाळातून सुटका तरी झाली असती. सारे पैसे लोकांना देऊन टाकले. आता बैलजोडी घ्यायला पैसे आणणार कुठून? औताला काय मला लावणार, की स्वतःला जुंपणार? एवढे म्हातारे झालात; पण तुम्हाला एवढी अक्कल नाही, की बैलजोडी पुरते तरी पैसे ठेवून घ्यावेत. कुणी तुमच्या हातातून हिसकावून तर घेतले नसतील. पुसातली ही कहरी थंडी, कुणाच्या अंगावर धड कपडा नाही घेऊन जा साऱ्यांना आणि बुडवून टाका नदीत. असं कुजत कुजत मरण्यापेक्षा एका झटक्यात मेलेलं बरं! किती दिवस हे असं रहायचं? तुम्हाला जमलं तर गवत खा आणि राहा. आमच्यानं गवत खावून राहणं होणार नाही.''

बोलता बोलता अचानक तिच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. तिच्या लक्षात आलं, की पैशासाठी आसूसलेला सावकार डोईवर सवार असला आणि असामीच्या हाती पैसा आला, की त्याचा जीव कसा काय वाचू शकणार?

मान खाली घालून होरी आपल्या नशीबावर रडत होता. तिच्या चेहऱ्यावरचं हसू त्याला दिसलं नाही. म्हणाला, ''मजूरी करून पोट भरू!''

''कुठे आहे या गावात मजूरी? स्वतःला महतो म्हणवता आणि मजूरी कराल हे कसं काय जमेल?''

चिलमीचे अनेक झुरके मारून होरी म्हणाला, ''मजूरी करणं काही पाप नाही. मजूरी करूनंच माणूस किसान होतो आणि किसान बिघडला तर त्याचा परत मजूर होतो. मजूरी करणंच आपल्या भाग्यात नसतं तर ही संकटे आपल्यावर का आली असती? गाय का मेली असती? पोरगा असा नालायक का निघाला असता?''

धनियानं सून आणि मुलीकडे पाहिलं आणि त्यांना म्हणाली, ''तुम्ही का अशा घेरा घातल्यासारखं उभ्या राहिलात? जा आपापल्या कामाला लागा. बाजारातून आपल्या पोराबाळासाठी चीज वस्तू घेऊन येणारी माणसं वेगळी असतात. इथे तर रुपये वाचवावेत कसे असा प्रश्न पडलाय. एक रुपायाही कमी नाही झाला पाहिजे. म्हणून तर यांची बरकत होत नाही. जे खर्च करतात त्यांना मिळतं सुद्धा. जे खाण्यावर, कपड्यावर खर्च करत नाहीत त्यांना पैसा मिळणार कसा? जमिनीत पुरुन ठेवायला!''

होरीनं हसत हसतंच विचारलं, ''कुठे आहे ते पुरुन ठेवलेले धन?''

''जिथे ठेवलं तिथेच असणार. पैसा गाडलेला आहे हे माहित असूनही पैशासाठी मरमर करता आहात याचंच तर वाईट वाटतं. चार पैशाची काही चिज पोरासाठी आणली असती तर पैसा काही पाण्यात गेला नसता. झिंगुरीला तुम्ही म्हणाला असता एक पैसाही देणार नाही, जा आणि कोर्टातून घ्या तर तो गप्प बसला असता!''

होरीला शरम वाटायला लागली. त्यानं पंचेवीस रुपये नोखेरामच्या अंगावर फेकले नसते तर त्यानं काय केलं असतं? फार तर व्याज घेतलं असतं. तेही दोन चार आणे; पण आता तर काय चूक होऊन गेली होती. घरात जाऊन झुनिया सोनाला म्हणाली, ''मला तर दादांची फार किव येते. बिचारे दिवसभर थकून भागून आले तो अम्मा लागली कोसायला.

सावकारानंच गळा धरला तर ते तरी काय करतील?''

''पण मग बैलजोडी कुठून येईल?''

''हे बघ, सावकाराला पाहिजे पैसा. तुमच्या सुख दुःखाशी त्याला काय घेणं देणं?''

''आई तिथे असती तर महाजनला मजा दाखवली असती. हा चोळत बसला असता तो.''

झुनिया गमतीनं म्हणाली, ''इथे पैशाला काय कमी आहे? तू त्या सावकाराशी हसून बोलली असतीस तर त्यानं सारे रुपये माफ केले असते. दादाची सारी दरिद्री दूर झाली असती.''

दोन्ही हातानी झुनियाचं तोंड दाबत सोना म्हणाली, ''तू गप्प बस. मी सांगून ठेवते नाही तर मातादीनची भानगड आईला सांगून टाकीन.''

झुनिया म्हणाली, ''काय सांगशिल आईला? सांगण्यासारखं आहेच काय? ते जर काही कामासाठी येणार असतील तर मी त्यांना हाकलून देऊ काय? बरं माझ्याकडून काही घेऊनही जात नाहीत. काही तरी देऊनंच जातात. गोड गोड शब्दाशिवाय त्यांना काहीच मिळत नाही. गोड गोड बोलून काम काढून घेणं तर मला आजही येतं. कुणाच्या झपाट्यात येण्या इतकी मी काही अडाणी नाही. हा, मात्र तुझ्या भावानं तिथे कुणाला ठेवलं तर गोष्ट वेगळी. त्यावेळी माझ्यावर कुणाचं बंधन राहणार नाही. आता तरी मला पूर्ण विश्वास आहे, की ते माझे आहेत आणि माझ्यामुळेच त्यांना असं घर सोडून भटकावं लागत आहे. हसणं बोलणं वेगळं; पण मी अशी विश्वासघात करणारी नाही. ज्यानं विश्वासघात केला तो कुणाचाच राहू शकत नाही.''

शोभा आला आणि त्यानं होरीला हाक दिली. पटेश्वरीचे पैसे होरीच्या हातात ठेवून तो म्हणाला, ''दादा, तुम्ही जाऊन हे पैसे लालाला देऊन टाका. मला कळेना त्यावेळी मला काय झालं होतं?''

रुपये घेऊन होरी उठतो तोच शंख ध्वनी त्याच्या कानी आला. गावाच्या दुसऱ्या टोकाला ध्यानसिंह नावाचे एक ठाकूर रहायचे. सैन्यात नोकरीला होते ते आणि आता दहावर्षांनंतर रजा घेऊन आले होते. बगदाद, अदन, सिंगापूर बर्मा सगळीकडे ते फिरून आले होते आणि आता त्यांचा लग्नाचा विचार चालला होता. त्यासाठी पूजा-पाठ करून ब्राह्मणांना प्रसन्न ठेवू पाहत होता. शंख ध्वनी ऐकून होरी म्हणाला, ''अध्यायपूर्ण झाला आहे वाटतं. आरती चालली असावी.''

''दिसतं खरं.'' शोभा म्हणाला.

''चला आपण आरतीला जाऊ.''

होरी चिंतीत स्वरात म्हणाला, ''तू हो पुढे. मी मागाहून येतो.''

ध्यानसिंह ज्या दिवशी आले त्याच दिवशी त्यांनी सर्वांच्या घरी सव्वा सव्वा शेर मिठाई पाठवली. ज्या ज्यावेळी त्यांची आणि होरीची रस्त्यात भेट व्हायची ते ख्याली खुशाली विचारायचे. तेव्हा त्यांच्या घरी पुजेला जायचं आणि देवापुढे काही ठेवायचं नाही हे काही त्याला पटेना. परत आरतीची थाळी तर त्यांच्या हातातंच असणार! तेव्हा त्यांच्या समोर होरी रिकाम्या हातानं कसा काय जाणार? त्यापेक्षा न गेलेलंच चांगलं. एवढ्या माणसांच्या गर्दीत होरी नाही आला त्यांच्या काय लक्षात येणार? कुणी रजिस्टर घेऊन आल्या गेल्याची नोंद तर करत नाही. असा विचार करून होरी बाहेर बाजेवर पहुडला. मात्र त्याचं मन त्याला सारखं कुरतडत होतं. आपल्याजवळ एक पैसाही नाही याचं त्याला विलक्षण दुःख होत होतं. आरतीमुळे पूण्य लागतं वगैरे भावना त्याच्या मनात नव्हती. तर आरतीच्या थाळीत टाकायला पैसा नव्हता याची खंत होती. केवळ दर्शनंच घ्यायचं असतं तर त्याला काही वाटलंही नसतं; पण लोकमर्यादा नाही पाळली तर मानहानी होते अशी त्याची भावना होती.

अचानक तो उठून बसला. का आपण मर्यादांना एवढं घाबरतो आहो? मर्यादेच्या नावाखाली आरतीच का डावलायची? लोक हसतील तर हसू दे. त्याची पर्वा नाही. देव आपल्याला कुकर्मापासून वाचवो हीच प्रार्थना. यापेक्षा इतर अपेक्षा नाही आणि असा विचार करून तो ठाकूरच्या घराकडे निघाला.

मिर्झा खुर्शेदचं घर म्हणजे एक क्लब, कचेरी आणि आखाडा सुद्धा होता. दिवसभर माणसांची वर्दळ असायची. त्या गल्लीतल्या पंचायतच्या बैठकाही तिथेच व्हायच्या. कौटुंबिक भांडणातल्या तडजोडीही तिथेच व्हायच्या. त्या भागातल्या सामाजिक आणि राजकीय घडामोडींचं केंद्रही तेच घर होतं. स्वयंसेवकही तिथेच उतरायचे आणि सभाही तिथेच व्हायच्या.

याच घरात रहायला आल्याला गोबरला एक वर्ष झालं होतं. आता तो पूर्वीसारखा सरळ, सीधा, ग्रामीण युवक राहिला नव्हता. त्यानं यावर्षात जगाचे बरेच रंग ढंगही पाहिले होते आणि थोडे बहूत समजूनही घेतले होते; पण मुळात तो होता ग्रामीणच. त्यामुळे पैशाची बचत, स्वार्थीपणा, मेहनत करणं आणि हिंमत न हारणं या गुणांना चिटकून होता. थोडी बहूत शहरी हवा काय ती लागली होती एवढंच काय ते.

त्यानं पहिल्या महिन्यात मोल मजूरी करून अर्ध पोटी राहून थोडी बहूत बचत केली होती आणि त्यानंतर खाण्याच्या वस्तूचा खोंचा लावला होता. त्यात अधिक फायदा होतो हे पाहिल्यावर इतर काम सोडली. उन्हाळ्यात शरबत आणि बर्फ तर हिवाळ्यात गरमा गरम चहा करायला लागला तो. आता रोज अडीच तीन रुपयांची कमाई व्हायला लागली. त्यानं आता शहरी युवकाप्रमाणं केस राखायला सुरुवात केली. चांगले, चुंगले कपडे करायला लागला. अंगावर लाल रंगाची शाल घ्यायची, सिगारेट, पानाची सवय त्याला लागली. सभा ऐकण्याच्या सवयीमुळे थोडं बहूत राजकारणही त्याला कळायला लागलं होतं त्याला. राष्ट्र, वर्ग याचा अर्थही त्याला आता कळू लागला होता. एकूणच सामाजिक रुढी आणि लोकनिंदा याचं भयही त्याचं आता कमी झालं होतं. वारंवार होणारं समाज पंचायतच्या बैठकामुळे त्याचं समाजाचं भयही कमी झालं होतं. ज्या गोष्टीमुळे होऊ शकणाऱ्या लोक निंदेच्या भयामुळे तो इथे पळून आला होता, त्याहीपेक्षा अधिक भयानक गोष्टी इथे घडत होत्या आणि त्या निंदास्पद गोष्टींचं फारसं भयही इथे कुणाला वाटत नव्हतं. मग त्यानं तरी काय म्हणून तोंड लपवावं?

एवढ्या दिवसात त्यानं एक पैसाही घरी नाही पाठवला. आई-वडिलांना पैशाच्या बाबतीत फारसं कळत असं त्याला वाटत नव्हतं. पैसा हातात पडला तर त्यांचे पाय जमिनीवर राहणार नाहीत असंच त्याचं मत होतं. दादा अम्माला पैशाच्या वाटा लावायचा विचार येईल आणि दागिने वगैरे करण्याइतपत पैसा तर त्याच्याजवळ नव्हता. तो स्वतः आता एक छोटा मोठा सावकार बनला होता. शेजार पाजारचे तांगेवाले, गाडीवाले, धोबी यांना तो व्याजानं पैसा देत होता आणि गेल्या दहा बारा महिन्यातंच त्यानं आपल्या मेहणत आणि चातुर्यानं स्वतःसाठी एक स्थान निर्माण केलं होतं आणि आता झुनियाला आणून घ्यायचा विचार त्यानं चालवला होता.

एके दिवशी तिसऱ्या प्रहरी नळावर स्नान करून तो आला आणि रात्रीसाठी बटाटे उकडून ठेवत होता तोच मिर्झा खुर्शेद तिथे आले. गोबर खरं तर आता त्यांचा नोकर नव्हता. तरी त्यांना तसाच आदर द्यायचा आणि त्यांच्यासाठी जीव द्यायलाही तयार होता. मिर्झाला आलेलं पाहून तो

म्हणाला, ''सरकार काय आज्ञा आहे?''

उभ्या उभ्या मिर्झा म्हणाले, ''तुझ्याजवळ काही पैसे असतील तर दे. तीन दिवसापासून प्यायला मिळाली नाही.'' या आधीही त्यानं मिर्झाला काहीवेळा पैसे दिले होते; पण ते पैसे कधीच परत मिळाले नाहीत. परत मागायची त्याला भीतीही वाटायची. त्यांच्या हातात पैसा रहायचाच नाही. माझ्याजवळ पैसे नाहीत असं तर तो म्हणूच शकत नव्हता. तेव्हा त्या ऐवजी गोबरनं शराब कशी वाईट हे सांगायला सुरुवात केली. ''सरकार, ही सवय सोडून का देत नाही? प्याल्यानं काही फायदा होतो का?''

खोलीतल्या बाजेवर बसत मिर्झा म्हणाले, ''तुला काय वाटतं, मला सोडावी वाटत नाही आणि मी शौक म्हणून पितो काय? अरे मी तर हिच्याशिवाय जिवंतंच राहू शकत नाही. तुझ्या पैशाची काळजी करू नकोस. तुझा एकेक पैसा मी देऊन टाकीन.''

गोबरवर त्याचा काही परिणाम झाला नाही. तो म्हणाला, ''सरकार मी खरंच सांगतो, यावेळी माझ्याजवळ खरंच पैसा नाही.''

''दोन रुपयेही नाही देता येणार?''

''आता यावेही नाहीत.''

''माझी अंगठी गहाण ठेव.''

त्याच्या मनात लालसा उत्पन्न झाली. शब्द कसा काय बदलायचा म्हणून तो म्हणाला, ''मालक पैसे असते तर दिले नसते का? अंगठी गहाण ठेवायचा कुठे प्रश्न येतो?''

दिनवाण्या आवाजात मिर्झा म्हणाले, ''मी यापुढे तुझ्याकडे कधीही पैसे मागणार नाही. मला तर उभंही राहता येणार नाही. या शराबच्या व्यसनापायी मी लाखोची प्रॉपर्टी उधळली आणि भिकारी झालो; पण आता तर अशी अवस्था झाली आहे, की भीक मागेन; पण मी पिणारंच!'' तरिही गोबरनं नकार दिला तेव्हा निराश होऊन मिर्झा निघून गेले. शहरात तर त्यांचे अनेक मित्र होते. अनेकजण त्यांच्यामुळेच मोठे झाले होते. कित्येकांना त्यांनी अडचणीच्यावेळी मदत केली; पण अशांना भेटायचं त्यांना आवडायचं नाही. त्यांना तर अशा अनेक युक्त्या माहित होत्या ज्याच्या बळावर ते प्रचंड पैसा उभा करू शकत होते. त्यांच्या हाताला जणू कातर होती. काहीना काही निमित्त करून ते पैसे उडवायचे, तेव्हाच त्यांचं चित्त शांत व्हायचं.

गोबरनं बटाटे सोलायला सुरुवात केली. वर्षभरात तो कामात आणि पैसे जोडण्याच्या कामात आश्चर्य वाटावं एवढा तज्ञ झाला होता. तो रहायचा मिर्झाच्या जागेत. त्या जागेचा किराया पाच रुपये येऊ शकला असता; पण त्याला मिर्झानं कधी किराया मागितला नाही आणि वर्षभरापासून तो मात्र त्या जागेत तसाच राहत होता.

**क्रमशः**

**- अनंत उमरीकर**

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

शेतकरी

महिला आघाडी

शेतकरी संघटना

# शेतकरी संघटना
# विभागीय ऊस व कापूस परिषद

## ऊस परिषद

करमाळा, जि. सोलापूर येथे

दि. २३ ऑक्टोबर रोजी

मा. शरद जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत

## विभागीय कापूस परिषद

१) अमरावती येथे दि. १ नोव्हेंबर २०११

२) धुळे येथे दि. ३ नोव्हेंबर २०११

३) परभणी येथे दि. ५ नोव्हेंबर २०११

४) वर्धा येथे दि. ७ नोव्हेंबर २०११



शेतकरी संघटनेचे डॉ. गिरधर पाटील यांचे कनिष्ठ चिरंजीव आदित्य आणि उदयसिंह नागरस, निवृत्त संरक्षण अधिकारी यांची कन्या श्रद्धा यांचा वाङ्‌निश्चय हॉटेल ग्रीन पार्क, पुणे येथे नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला मा. शरद जोशी यांच्यासह पुण्याचे मा. महापौर दत्ता गायकवाड, नगरसेवक अरुण शिंदे यांच्यासह अनेक निमंत्रित उपस्थित होते. सदरचा विवाह सोहळा दि. २९ नोव्हे. रोजी माऊली लॉन्स, बाणेर रोड, पुणे येथे गोरज मुहूर्तावर आयोजित केला असून शेतकरी संघटनेच्या साऱ्या भावाबहिणींना आग्रहाचे निमंत्रण डॉ. गिरधर पाटील यांनी दिले आहे.

## शेतकरी संघटक स्थिर निधी

*कै. मोहन गुंजाळ यांच्या स्मृतिप्रित्यर्थ*

| | |
|---|---|
| **श्रीमती निर्मला मोहन गुंजाळ** | **रु. १०००** |
| यापूर्वी जमा निधी | रु. ६६,२०० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ६७,२०० |

सर्व देणगीदारांचे **मनःपूर्वक आभार.**
स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे. - **कार्यकारी संपादक**

## शेंद्रा पुनर्विस्थापन प्रकरणी न्यायालयाच्या नोटीसा

**परभणी :** परभणी जिल्ह्यातील शेंद्र या गावच्या पुनर्विस्थापन प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने परभणीचे जिल्हाधिकारी, मराठवाडा कृषी विद्यापी व इतरांना नोटीसा बजावल्या आहेत. शेंद्रा येथील शेतकरी श्री. रामचंद्र हरिभाऊ ढगे व इतर ७० जणांनी या प्रकरणी खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. शेंद्रा या गावाचे शासनाकडून करण्यात येणारे पुनर्वसन अन्यायकारक आहे. या प्रकरणी फिर्यादी तर्फे ॲड. जितेंद्र घुगे यांनी याचिका दाखल केली आहे. शेतकरी संघटनेचे पुरुषोत्तम लाहोटी, शेंद्रा या गावचे माजी सरपंच रामचंद्र ढगे, किशोर ढगे, गणेश ढगे, विलास ढगे, मोहन जोंधळे, कालिदास शिंदे व इतर कार्यकर्ते या प्रकरणी परिश्रम घेत आहेत.

# वाशी बाजारसमितीत शेतकऱ्यांवर अन्याय

**नाशिक :** मुंबईत थेट विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना अडवून त्यांच्याकडून विविध शुल्क आकारणे, वाहने जप्त करण्याचा प्रकार सुरू होता. या विरोधात शेतकरी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर बाजार समितीने १४ ऑक्टोबर रोजी संचालक मंडळ व शेतकऱ्यांची बैठक घेतली. समितीचे अध्यक्ष बाळासाहेब सोळसकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत राज्यभरातील संचालक मंडळ, आडतदार व्यापारी, माथाडी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते. बैठकीतील निर्णयावर शेतकरी संघटनेचे नेते डॉ. गिरधर पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ''वाशी बाजार समितीच्या आवारात शेतकरी स्वतः माल घेऊन जात असतील, तर बाजार समितीने नियमाप्रमाणे शुल्क आकारावेत; पण जे शेतकरी बाजार समितीत माल आणतच नाहीत, त्यांच्यावर बाजारशुल्क आकारणीचा समितीला अधिकारच काय? परस्पर शेतीमालाची विक्री करणाऱ्यांवर कुठलेही नियंत्रण असू नये असा कायदा आहे. तेव्हा नियंत्रण ठेवणे हेच बेकायदेशीर आहे. राज्यातील शेतकरी संघटना या बेकायदेशीर नियंत्रणाविरुद्ध जोरदार आवाज उठवणार आहे.'' असे गिरधर पाटील यांनी सांगितले.

शेतकरी महिला आघाडी

# संयुक्त कार्यकारिणीची बैठक

शेतकरी संघटना

**प्रिय मित्र,**

**स. न. वि. वि.**

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांची संयुक्त कार्यकारिणी मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर पुणे शासकीय विश्रामगृह (इन्स्पेक्शन बंगला) पिंच गार्डन, पुणे रेल्वे स्टेशनजवळ, या ठिकाणी दुपारी १ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे ही विनंती.

*** शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या संयुक्त कार्यकारिणीतील विषय :**

१. कर्जमुक्ती फॉर्म आणि स्वतंत्र भारत पक्ष नोंदणी आढावा घेणे.

२. तंत्रज्ञानातील स्वातंत्र्य मिळावे म्हणून कापसाच्या राऊंडअप बीटी या वाणासाठी रणनीती आखणे व त्याची परवानगी मिळवणे.

३. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये मॉडेल ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी आंदोलन ठरवणे.

कळावे
आपले,

**रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**वामनराव चटप,**
अध्यक्ष, स्वभाप (महाराष्ट्र)

**सौ. जयश्री पाटील,**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**अनिल घनवट,**
अध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी

**सौ. शैलजा देशपांडे,**
अध्यक्षा, स्वभाप महिला आघाडी

**संपर्क:** अनिल चव्हाणे मो. ०९४०५८४७४९३, आबासाहेब ताकवणे मो. ०९६८९७९००४८